सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

आसमंतसह

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, १ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक २५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### एटीएममधून काढता येणार पीएफचे पैसे

**नवी दिल्ली** : केंद्र सरकार आता भविष्य निर्वाह निधीशी संबंधित व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या तयारीत आहे. सरकारचा इपीएफओ ३.० उपक्रमांतर्गत इपीएफओ सदस्यांसाठी सेवा वाढविण्याचा उद्देश आहे. एका अहवालानुसार, या योजनेचा एक भाग म्हणून केंद्रीय कामगार मंत्रालय



कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये योगदान वाढविण्याचा आणि डेबिट कार्डसारखे एटीएम कार्ड जारी करण्याबाबत विचार करीत आहे. यामुळे भविष्यात थेट 'एटीएम'मधून पैसे काढता येतील. ही योजना मे-जूनपर्यंत लागू होण्याची शक्यता आहे. सध्या इपीएफओ सदस्याला पीएफचे पैसे काढण्यासाठी ७ ते १० दिवस वाट पाहावी लागते. हा वेळ पीएफचे सर्व पैसे काढण्याची औपचारिकता पूर्ण केल्यानंतर आणि आवश्यक कागदपत्रे इपीएफओला सादर केल्यानंतर लागतो. यात अधिक वेळ वाया जातो. सध्या पगारदार कर्मचारी दर महिन्याला त्यांच्या कमाईच्या १२ टक्के रक्कम त्यांच्या इपीएफ खात्यात जमा करतात, तर नियोक्ता ३.६७ टक्के रक्कम या खात्यात जमा करतात. उर्वरित ८.३३ टक्के कर्मचारी पेन्शन योजनेमध्ये वितरित केली जाते. नियोक्ता कर्मचाऱ्यांच्या एम्प्लॉइज डिपॉझिट लिंक्ड इन्शुरन्स खात्यात ०.५० टक्के योगदानदेखील देतो. एका अहवालानुसार, केंद्र सरकार कर्मचारी देत असलेल्या पीएफ योगदानावरील १२ टक्के मर्यादा काढून टाकण्याच्या विचारात आहे. हा बदल झाल्यास कर्मचाऱ्यांना त्यांच्या बचतीच्या आधारे अधिक योगदान देण्याचा पर्याय मिळू शकतो.

### झारखंडमधील चकमकीत माओवाद्याचा खात्मा

**चायबासा** : झारखंडमधील पश्चिम सिंघभूम जिल्ह्यात शनिवारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी माओवाद्याचा खात्मा केला, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तेबो पोलिस ठाणे हद्दीतील तोमोरोंग गावात ही चकमक झडली. ठार झालेल्या माओवाद्याची ओळख पटली आहे. लाम्बू असे त्याचे नाव असून, तो पीपल्स लिबरेशन फ्रन्ट ऑफ इंडियाचा एरिआ कमांडर होता, अशी माहिती पोलिस अधीक्षक आशुतोष शेखर यांनी दिली. या चकमकीची तपशीलवार माहिती अद्याप हाती आलेली नाही. पोलिसांकडून परिसरात शोधमोहीम राबवली जात आहे, असे त्यांनी सांगितले.

# आझाद मैदान... ५ डिसेंबर... सायंकाळी ५ वाजता

## ● महायुती सरकारच्या शपथविधीचा मुहूर्त ठरला ● प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंनी केली घोषणा



**◆ मुंबई, ३० नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविणाऱ्या महायुती सरकारचा मुख्यमंत्री कोण, याबाबतची घोषणा सोमवारी होणार आहे. या नव्या सरकारचा शपथविधी ५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता होणार असून, त्यासाठी मुंबईतील आझाद मैदानाची निवड करण्यात आली आहे, अशी घोषणा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी केली.

देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे. भाजपा विधिमंडळ पक्षाचा गटनेता सोमवारी निवडला जाणार असून, दुपारी १ वाजता विधानभवनात यासाठी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक होणार आहे.

नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. ५ डिसेंबर रोजी सायंकालळी पाच वाजता मुंबईतील आझाद मैदानावर हा शपथविधी सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपा आणि रालोआशासित राज्यांचे मुख्यमंत्री व अन्य नेते उपस्थित राहणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले

### शिवसेनेला हवे गृह मंत्रालय

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाचा दावा सोडला असल्याने, शिवसेनेला दुसरे महत्त्वाचे खाते म्हणजेच गृहमंत्रालय मिळायला हवे, अशी मागणी शिवसेना नेते संजय सिरसाट यांनी केली आहे.

### कुणाला कोणते मंत्रालय? लवकरच निर्णय

भाजपाचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्यात आल्यानंतर महायुतीमधील तिन्ही पक्षांची संयुक्त बैठक होणार आहे. या बैठकीत कोणत्या पक्षाला किती आणि कोणते मंत्रालय मिळणार, याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे. ज्या पक्षाचे जितके आमदार, त्यांना त्या प्रमाणात खाती दिली जाणार असून, यासाठी पाच ते सहा आमदारांमागे एक मंत्रालय, असे सूत्र निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे.

**चंद्रशेखर बावनकुळेंनी घेतली ऑनलाईन बैठक**

तत्पूर्वी आज सकाळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची ऑनलाईन बैठक घेतली. यात आमदारांनी सरकार स्थापनेपूर्वी आणि स्थापनेनंतर कोणती काळजी घ्यायची, यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. सरकारचा शपथविधी होत असताना आपापल्या जिल्ह्यांमध्ये जल्लोष करण्याची सूचना बावनकुळे यांनी आमदारांना दिली. ◂(वृत्तसंस्था)

### बांगलादेशात आणखी एका पुजाऱ्याला अटक

**◆ कोलकाता, ३० नोव्हेंबर**

इस्कॉनचे चिन्मय प्रभू यांना बांगलादेशात अटक करण्यात आल्यानंतर काही दिवसांनी आता आणखी एका हिंदू पुजाऱ्याला चटगाव येथून अटक करण्यात आली, अशी माहिती इस्कॉनच्या कोलकात्यातील प्रवक्त्याने शनिवारी दिली. श्यामदास प्रभू असे अटक झालेल्या पुजाऱ्याचे नाव आहे. ते चिन्मय प्रभू यांना भेटायला गेले असता अटक करण्यात आली.

कोणताही वॉरंट नसताना त्यांच्यावर कारवाई करण्यात आली, असे सूत्रांनी सांगितले. श्यामदास प्रभू यांना झालेल्या अटकेबाबत कोलकाता इस्कॉनचे उपाध्यक्ष आणि प्रवक्ते राधारमण दास यांनी एक्सवर शुक्रवारी पोस्ट केली. चितगाव पोलिसांनी आणखी एक ब्रह्मचारी श्यामदास प्रभू यांना आज अटक केली, असे या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे.

इस्कॉनचे बांगलादेशातील माजी सदस्य चिन्मय प्रभू यांना देशद्रोहाच्या आरोपात सोमवारी अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेमुळे प्रक्षुब्ध हिंदू समुदायाने बांगलादेशात राजधानी ढाका व चटगावसह विविध ठिकाणी निदर्शने केली. चिन्मय प्रभूंना जामीन नाकारण्यात आल्यावर मंगळवारी पोलिस आणि आंदोलकांत हिंसाचार झाला. या सइफूल इस्लाम नावाच्या वकिलाचा मृत्यू झाला होता.

**तीन मंदिरांची तोडफोड**

जोरदार घोषणा करणाऱ्या जमावाने शुक्रवारी चटगाव येथील तीन मंदिरांची तोडफोड केली. चटगावमधील हरीशचंद्र मुनसेभ रस्त्यावरील शांतेश्वरी मातृ मंदिर, जवळच असलेले शोनी मंदिर आणि शांतेश्वरी कालिबारी मंदिरात दुपारी अडीच वाजता ही तोडफोड करण्यात आली, असे वृत्त बीडीन्यूज २४ डॉट कॉम या संकेतस्थळाने दिले. ◂(वृत्तसंस्था)

# मुख्याध्यापकाने त्याच्याच शाळेत शिकणाऱ्या १४ मुलींचा केला विनयभंग

## गुन्हा दाखल; मुख्याध्यापकाचे तातडीने निलंबन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० नोव्हेंबर-**

महाराष्ट्राला हादरवाणारी घटना मराठवाड्यात घडली आहे. लातूरमध्ये शिक्षकी पेशाला काळिमा फासणारे कृत्य शाळेच्या मुख्याध्यापकाने केला आहे. एका जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाने त्याच्याच शाळेत शिकणा-या १४ मुलींचा विनयभंग केला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. पिडीत मुलींचे पालक संतप्त झाले आहेत.



या प्रकरणी लातूर शहरातील पोलीस ठाण्यात पोलिसांनी संबंधित मुख्याध्यापकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या निंदनीय घटनेची गंभीर दखल घेत, संबंधित मुख्याध्यापकाला तातडीनं निलंबित करण्यात आलं आहे. या घटनेमुळे शालेय विद्यार्थींच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पिडीत मुलींनी पालकांकडे याची तक्रार केली. यानंतर पालकांनी शाळेतील शिक्षकांकडे याबाबत विचारणा केली. गट शिक्षण अधिकाऱ्यांकडे याची तक्रार करण्यात आली. यानंतर शाळेत विशाखा समिती स्थापन करण्यात आली. या समितीमार्फत पिडीत विद्यार्थीनींच्या तक्रारीची चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान शाळेच्या मुख्याध्यापकानेच मुलींचा विनयभंग केल्याचे उघडकीस आले. यानंतर या मुख्याध्यापकाविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तसेच या मुख्याध्यापकावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# हिंदूंवरील अत्याचार तत्काळ थांबवा

## रा. स्व. संघाचे बांगलादेश सरकारला आवाहन

**◆ नवी दिल्ली, ३० नोव्हेंबर**



हिंसाचारग्रस्त बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचार थांबविण्यात येऊन इस्कॉनचे आध्यात्मिक गुरू चिन्मय कृष्ण दास यांची तुरुंगातून तत्काळ सुटका करण्यात यावी, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शनिवारी तेथील अंतरिम सरकारला केले आहे.

रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी एका निवेदनाद्वारे, भारत सरकारने बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचे आणि त्यांच्या समर्थनार्थ त्वरित जागतिक जनमत तयार करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचे आवाहन केले.

बांगलादेशातील हिंदू, महिला आणि इतर सर्व अल्पसंख्यकांवर इस्लामिक कट्टरवाद्यांकडून होणारे हल्ले, खून, लूटमार, जाळपोळ तसेच अमानुष अत्याचार अत्यंत चिंताजनक आहेत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याचा निषेध करतो. हिंसा थांबविण्याऐवजी सध्याचे बांगलादेश सरकार आणि इतर यंत्रणा केवळ मूक प्रेक्षक बनून आहेत, असे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे म्हणाले.

बांगलादेशातील हिंदूंनी स्वसंरक्षणासाठी लोकशाही मार्गाने उठवलेला आवाज दाबून टाकण्यासाठी अन्याय आणि अत्याचाराचा एक नवा टप्पा उदयास येत आहे, असे होसबळे म्हणाले. अशा शांततापूर्ण निदर्शनांमध्ये हिंदूंचे नेतृत्व करणाऱ्या इस्कॉनचे आध्यात्मिक गुरू चिन्मय कृष्ण दास यांना बांगलादेश सरकारने तुरुंगात धाडणे अन्यायकारक असल्याचे सरकार्यवाह म्हणाले. बांगलादेश पोलिसांनी सोमवारी इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा चेतनाचे (इस्कॉन) चिन्मय कृष्ण दास ब्रह्मचारी यांना ढाका येथील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातून चितगावला जात असताना अटक केली. ◂(वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रकृती बिघडली

**मुंबई, ३० नोव्हेंबर**

राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती अचानक बिघडल्याचे वृत्त आहे. शिंदे यांना ताप आल्याचे बोलले जात आहे. शिंदे यांच्यावर उपचार करण्यासाठी मुंबईहून साताऱ्यातील दरे या त्यांच्या मूळ गावी डॉक्टरांचे पथक पोहोचले असून, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

विधानसभा निवडणुकीची धामधूम संपल्यानंतर आता सत्तास्थापनेची लगबग सुरू असताना, घवघवीत यश मिळविणारे शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे अचानक गृहविलगीकरणात गेल्याने उलटसुलट चर्चांना उधाण आले होते. ते नाराज असल्याची चर्चा देखील रंगली.

मात्र, निवडणूक प्रचाराच्या धामधूमीतल्या परिश्रमामुळे आलेल्या थकव्यानंतर कदाचित त्यांना अस्वस्थ वाटले असावे आणि त्यामुळे आपल्या मूळ गावी थोड्या विश्रांतीसाठी गेलेल्या शिंदे यांना प्रकृती अस्वास्थामुळे उपचाराची गरज पडली. त्यामुळे तातडीने मुंबईहून तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक दरे गावात पोहोचले.

# जामा मशिदीत झाले प्रचंड अवैध बांधकाम

## पुरातत्त्व विभागाचे न्यायालयात शपथपत्र

**◆ संभल, ३० नोव्हेंबर**

आमच्या पथकाला संभलच्या जामा मशिदीत प्रवेश दिला जात नाही. मोठ्या प्रमाणात अवैध बांधकाम करून मशिदीचे मूळ स्वरूप बदलण्यात आले आहे. मशिदीच्या देखभाल आणि संरक्षणाची जबाबदारी १९२० पासून आमच्याकडे आहे. मात्र, दीर्घकाळापासून आमच्या पथकांना प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे सद्यःस्थितीत मशीद कशी आहे, याची माहिती आमच्याकडे नाही, असे पुरातत्त्व विभागाने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

मशिदीची तपासणी करण्यासाठी वेळोवेळी आम्ही पथके पाठवली. मात्र, लोकांनी आक्षेप घेत प्रवेश करण्यास मज्जाव केला, असे पुरातत्त्व विभागाने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. पुरातत्त्व विभागाने मशिदीचा शेवटचा दौरा १९९८ मध्ये केला होता. त्यानंतर यावर्षी जूनमध्ये पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक स्थानिक प्रशासन आणि पोलिसांच्या सहकार्याने मशिदीत दाखल होऊ शकले होते.

त्यावेळी मशिदीत काही अतिरिक्त बांधकाम झाल्याचे पुरातत्त्व विभगाच्या अधिकाऱ्यांनी पाहिले होते. मशीद परिसरात प्राचीन इमारती आणि पुरातत्त्व अवशेष संरक्षण कायदा-१९५८ मधील तरतुदींचे उल्लंघन केल जात आहे, असे विभागाने न्यायालयात स्पष्ट केले. प्रत्येक वेळी आम्हाला प्रवेश करण्यापासून रोखण्यात आले आणि आम्ही त्याची तक्रार स्थानिक पोलिसांकडे केली आहे. बेकायदेशीर बांधकामांसाठी जबाबदार असलेल्यांना कारणे दाखवा नोटीस जारी केल्याची माहिती पुरातत्त्व विभागाने दिली.

◂(वृत्तसंस्था)







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### देशविरोधी प्रचार प्रकरणी पोलिसांचे श्रीनगरमध्ये छापे

**श्रीनगर :** बेकायदेशीर आणि हिंसक कारवायांसाठी लोकांना चिथावणी देत देशविरोधात विखारी प्रचार प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून पोलिसांनी शनिवारी श्रीनगरमधील विविध भागांत छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शेरगारी पोलिस ठाण्यात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत श्रीनगरमधील बाटामालू आणि एचएमटी परिसरात छापेमारी करण्यात आली. काही लोकांविरुद्ध तपास सुरू आहे, ज्यांनी विरोधकांच्या इशाऱ्यावर आणि दुसऱ्यांसोबत गुन्हेगारी कट रचल्याचे प्राथमिकदृष्ट्या निष्पन्न झाले. ते बेकायदेशीर गोष्टींसाठी चिथावणी देण्याकरिता खोटी आणि चुकीची माहिती प्रसारित करण्याच्या मोहिमेत सहभागी असल्याचे आढळले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. न्यायालयाकडून वॉरंट मिळवल्यानंतर श्रीनगर जिल्हा पोलिसांनी बाटामालूच्या बोनपुरातील ओबेझ रियाझ दार आणि एचएमटी झेनकोटमधील साहिल अहमद भटवर छापेमारी केली.

# अपघातग्रस्त शिवशाहीच्या चालकाला अटक

### सोमवारपर्यंत पोलिस कोठडी

◆ **गोंदिया, ३० नोव्हेंबर**

शुक्रवारची दुर्घटना मन हेलावणारी ठरली. ११ जणांचा हकनाक बळी गेला. यात कुणी आई-वडील, मुलगा, भाऊ, सून तर कुणी नात गमावली. अपघात सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा-खजरीलगतच्या वृंदावनटोला फाट्याजवळ शुक्रवारी दुपारी १२.२० च्या सुमारास घडला. ११ प्रवाशांचा मृत्यू झाला तर २९ प्रवासी जखमी झाले. या घटनेस कारणीभूत भंडारा येथील बसचालक प्रणय रायपूरकर याला डुग्गीपार पोलिसांनी अटक केली. शनिवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला २ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

एसटी महामंडळाने त्याला तत्काळ निलंबित केले. भंडारा आगाराची एमएच-०९/ईएम-१२७३ क्रमांकाची शिवशाही बस घेऊन शुक्रवारी प्रणय रायपूरकर व वाहक नितीन मते हे भंडाराकडून गोंदियाच्या दिशेने निघाले होते. बसमध्ये ४० प्रवासी करीत होते. सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा-खजरीलगच्या वृंदावनटोला फाट्याजवळ समोरून येणाऱ्या दुचाकीचालकाला वाचविण्याच्या प्रयत्नात रायपूरकर याने करकचून ब्रेक दाबला. त्यामुळे भरधाव बस अनियंत्रित होऊन वळण मार्गावरील कठडे भेदून उलटली.

या घटनेमुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. दरम्यान, येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात विच्छेदन झाल्यानंतर सर्व मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. शनिवारी त्यांच्या पार्थिवांवर शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आले. या घटनेला कारणीभूत बसचालक प्रणय रायपूरकर याला डुग्गीपार पोलिसांनी शुक्रवारीच अटक केली. आज शनिवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. ◂(तभा वृत्तसेवा)



जिल्हा रुग्णालयात बेडवर बसलेला अपघातग्रस्त शिवशाहीचा चालक प्रणय रायपूरकर

### जखमींवर उपचार सुरू

येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात २९ जखमींपैकी ११ जणांवर अद्याप उपचार सुरू आहेत. अन्य जखमींना त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या हमीवर खाजगी रुग्णालयांत दाखल केले आहे. जखमींच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

# वर्धेच्या दाते संस्थेचे भोळे-सुमंत स्मृती पुरस्कार जाहीर

### डॉ. सुनीलकुमार लवटे यांना जीवनगौरव

◆ **वर्धा, ३० नोव्हेंबर**

स्थानिक यशवंतराव दाते स्मृती संस्थेच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा. ल. भोळे व डॉ. यशवंत सुमंत स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी सरफराज अहमद (सोलापूर), ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शुभदा देशमुख (कुरखेडा-गडचिरोली), युवा संशोधक डॉ. सोमिनाथ घोळवे (पुणे) यांची, तर जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ संशोधक, विचारवंत, अनुवादक डॉ. सुनीलकुमार लवटे (कोल्हापूर) यांची निवड करण्यात आल्याची माहिती निवड समितीचे प्रमुख निमंत्रक ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ व दाते संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी दिली.

या पुरस्कारांचे वितरण पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात २४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. डॉ. यशवंत सुमंत कुटुंबीयांच्या वतीने पाच वर्षांपासून ज्येष्ठ अभ्यासकांसाठी जीवनगौरव पुरस्कार सुरू केला आहे.

यावर्षीच्या पाचव्या पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडाचे संपादक असलेले ज्येष्ठ संशोधक डॉ. सुनीलकुमार लवटे यांची निवड करण्यात आली आहे.

यशवंतराव दाते स्मृती संस्था व डॉ. भा. ल. भोळे कुटुंबीय यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या भोळे स्मृती वैचारिक साहित्य पुरस्कारासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लेखक सरफराज अहमद यांची राष्ट्रवाद आणि भारतीय मुसलमान या ग्रंथासाठी निवड करण्यात आली आहे. डॉ. भा. ल. भोळे स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कारासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शुभदा देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधन प्रेरणा पुरस्कारासाठी शेती प्रश्नांचे अभ्यासक, संशोधक डॉ. सोमिनाथ घोळवे यांची निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरूप डॉ. भा. ल. भोळे स्मृती पुरस्कार प्रत्येकी २० हजार व डॉ. यशवंत सुमंत स्मृती पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व मानपत्र असे आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



सरफराज अहमद, शुभदा देशमुख,, सोमिनाथ घोळवे, डॉ. सुनीलकुमार लवटे





बॉलिवूडची अभिनेत्री सयामी खेर शुक्रवारी रात्री मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात सहभागी झाली होती

### आगीत १५० हून अधिक दुचाकी खाक

**वाराणसी :** वाराणसीच्या कँट रेल्वे स्थानकातील पार्किंग स्टँडला लागलेल्या आगीत १५० हून अधिक दुचाकी जळून खाक झाल्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलासह रेल्वे संरक्षण दल आणि सरकारी रेल्वे पोलिस पथकाने आग विझवण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. आग आटोक्यात आणली गेली, पण यात १५० हून अधिक वाहने राख झाली. यात कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

### आईस्क्रीम खाल्ल्याने तीन मुलींचा मृत्यू

**सुरत :** गुजरातच्या सुरत येथे एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. पालीगाममध्ये राहणाऱ्या तीन मुलींचा आईस्क्रीम खाल्ल्याने मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. मुलींची प्रकृती बिघडल्याने त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### एसयूव्ही-ऑटो अपघातात पाच जणांचा मृत्यू

**श्रावस्ती :** उत्तरप्रदेशमधील श्रावस्ती जिल्ह्यात शनिवारी एका वेगवान एसयूव्हीने ऑटोरिक्षाला मागून धडक दिल्याने पाच जणांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. बहराईचहून प्रवासी घेऊन जाणाऱ्या ऑटोरिक्षाला वाहनाने मागून धडक दिली. टक्कर इतकी जोरदार होती की, ऑटो हवेत उडून रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पडला. ऑटोमध्ये चालकासह नऊ जण आणि कारमध्ये दोन जण होते.

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७८,००० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ९१,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३०.४ | १२.७ |
| अमरावती | ३०.० | १४.६ |
| भंडारा | २९.० | १५.० |
| बुलडाणा | २६.८ | १३.३ |
| चंद्रपूर | २८.८ | १४.० |
| गडचिरोली | २९.६ | १४.४ |
| गोंदिया | २८.८ | १३.८ |
| नागपूर | ३०.० | १३.६ |
| सोलापूर | ३२.0 | १७.२ |
| वाशीम | २८.२ | १३.६ |
| यवतमाळ | २९.२ | -.- |

# पोस्टल मतदान चुकवणारे ४८१ बहाद्दर!

### दिग्रस मतदारसंघातील हास्यास्पद कर्मचारी


**अभय इंगळे**

◆ **दिग्रस, ३० नोव्हेंबर**

मतदानाच्या दिवशी हजर नसलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांनी टपाल मतदान प्रक्रिया समजून न घेता मतदान केले. २,३९२ पैकी ४८१ बॅलट चुकल्याने चांगलाच संताप व टिंगलटवाळीचा विषय झाला आहे.

'पोस्टल बॅलेट' म्हणजे पोस्टाने मतदान करण्याचा अधिकार होय. सरकारी कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी कर्तव्यामुळे मतदान करता येत नसेल तर ते पोस्टाने मतदान करतात. अशांनी मतदान चुकवणे हा बेजबाबदारपणाच समजला जातो. पोस्टल बॅलेट मतदान करण्याची पद्धत अगदी सोपी असते. आवडीनुसार उमेदवार निवडून त्या रकान्यात पेनने 'बरोबर'ची खूण केली की झाले मतदान. परंतु, ही खूण बाजूच्या उमेदवाराच्या रकान्यातही नेणे, दोनदा खूण करणे, सही करणे असे प्रकार निव्वळ बालबुद्धीने केले असेच म्हणावे लागेल.

असे करणारे तब्बल ४८१ एकप्रकारे 'अशिक्षित' कर्मचारी दिग्रस, दारव्हा व नेर तालुक्यांत असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केले. भारतात मतदानाचा दिवस म्हणजे लोकशाहीचा सर्वांत मोठा सोहळा मानला जातो. इतकी सरळ सोपे मतदानसुद्धा नीट करू न शकणाऱ्या या कर्मचाऱ्यांनी आपला दर्जाच यातून दाखवून दिला आहे.



उत्तराखंडच्या हरिद्वार येथील गंगा नदीवरील हर की पौडी घाटावर शनिवारी हजारो भाविकांनी पवित्र स्नान करून गंगा आरती केली

# वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

### सावली वनपरिक्षेत्राच्या सामदा बीटमधील घटना

◆ **सावली, ३० नोव्हेंबर**

झाडण्या कापण्याकरिता जंगलात गेलेल्या महिलेवर वाघाने हल्ला करून ठार केले. ही घटना शनिवार, ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सावली वनपरिक्षेत्रांतर्गत व्याहाड खुर्द उपवनातील सामदा बीट कक्ष क्रमांक-२०१ परिसरात उघडकीस आली. रेखा मारोती येरमलवार असे मृत महिलेचे नाव आहे.



रेखा येरमलवार

सावली तालुक्यात सध्या धान कापणी शेवटच्या टप्प्यात असून, धान कापणी झाल्याबरोबर अनेक महिला झाडण्या कापण्याकरिता जंगल परिसरात जात असतात. निलसनी पेडगाव येथील रेखा येरमलवार ही महिला शुक्रवारी झाडण्या कापण्याकरिता गेली होती. त्यावेळी तिकडे बसलेल्या वाघाने तिच्यावर अचानक हल्ला करून ठार केले. सायंकाळ होऊनही रेखा या घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी जंगल परिसरात त्यांचा शोध घेतला. मात्र, अंधार झाल्याने शोध थांबविण्यात आला. शनिवार सकाळी पुन्हा कुटुंबीय व गावकऱ्यांनी वैनगंगा नदीच्या ढोबवाही परिसरालगत असलेल्या जंगलात तिचा शोध घेतला असता महिलेचा मृतदेह आढळून आला.

ग्रामस्थांनी याबाबत त्वरित वन विभागाला सूचना दिली. एसीएफ खेडकर, वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे, ठाणेदार पुलरवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपवन परिक्षेत्र अधिकारी सूर्यवंशी, वनरक्षक डांगे, वनरक्षक सोनेकर, पीआरटी चमू यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता सावली येथील सामान्य रुग्णालयात पाठविला. मृत महिलेच्या कुटुंबाला वन विभागाने ताबडतोब २५ हजार रुपये मदत दिली. या घटनेने परिसरात दहशत पसरली असून, वाघाचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# बाहेरील लोकांच्या प्रवेशावर १० डिसेंबरपर्यंत बंदी

### संभलमधील परिस्थिती नियंत्रणासाठी उपाय

◆ **लखनौ, ३० नोव्हेंबर**

हिंसाचारग्रस्त संभल जिल्ह्यातील शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने शनिवारी संभलमध्ये बाहेरील लोकांच्या प्रवेशावरील बंदीला १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली.

शाही जामा मशिदीत न्यायालयाच्या आदेशानुसार सर्वेक्षण झाले. यावेळी झालेल्या हिंसाचाराची माहिती गोळा करण्यासाठी समाजवादी पक्षाचे १५ सदस्यीय शिष्टमंडळ संभलला भेट देणार होते. त्याच दिवशी ही मुदतवाढ देण्यात आली. प्रशासनाने याआधी बाहेरील व्यक्तींच्या प्रवेशावर घातलेली बंदी शनिवारी संपुष्टात येणार होती.

भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या कलम १६३ (उपद्रव किंवा धोक्याच्या तातडीच्या प्रकरणांमध्ये आदेश जारी करण्याचा अधिकार) अंतर्गत निर्बंध ३१ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आले. लखनौमध्ये जारी केलेल्या निवेदनात जिल्हा दंडाधिकारी राजेंद्र पेन्सिया म्हणाले, शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी लागू करण्यात आलेली मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय १० डिसेंबरपर्यंत बाहेरील व्यक्ती, कोणतीही सामाजिक संस्था किंवा लोकप्रतिनिधी जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करू शकणार नाही, असेही ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)



जगाच्या भ्रमंतीवर निघालेल्या इटालियन नौदलाचे अमेरिगो वेस्पुक्की जहाज सध्या मुंबईतील डॉकवर मुक्कामी आहे. या जहाजावर प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात आले होते, ते पाहण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत

# भोपाळ वायुकांडातील 'त्या' पीडितांना नुकसान भरपाई द्या

### स्वयंसेवी संघटनेची सर्वोच्च न्यायालयात याचिका

◆ **भोपाळ, ३० नोव्हेंबर**

जगातील सर्वांत भीषण औद्योगिक दुर्घटना असलेल्या भोपाळ वायुकांडातील पीडितांसाठी लढणाऱ्या चार स्वयंसेवी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून कर्करोग आणि मूत्रपिंडाच्या विकारांना तोंड देणाऱ्या पीडितांना अतिरिक्त नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी केली. याबाबतची माहिती शनिवारी या संघटनांनी दिली.

२ आणि ३ डिसेंबर १९८४ रोजीच्या मध्यरात्री येथील युनियन कार्बाईड कारखान्यातून विषारी वायूची गळती होऊन ५,४७९ लोकांचा मृत्यू, तर पाच लाखांपेक्षा जास्त लोकांना शारीरिक व्याधी निर्माण झाल्या होत्या.

पीडितांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईतील अन्याय दूर करण्याची मागणी दोन दिवसांपूर्वी दाखल करण्यात आलेल्या याचिकेतून केली आहे. याचिकेवर ३ डिसेंबर रोजी सुनावणी होण्याची आम्हाला अपेक्षा असून, त्याच दिवशी या दुर्घटनेला ४० वर्षे होत आहेत, असे भोपाळ ग्रुप फॉर इन्फर्मेशन ॲण्ड ॲक्शन समितीच्या रचना धिंग्रा यांनी सांगितले.

वायूच्या संपर्कात आल्याने झालेल्या जखमा चुकीच्या पद्धतीने तात्पुरत्या म्हणून वर्गीकृत केल्या गेल्या. त्यामुळे कर्करोग आणि मूत्रपिंड विकार झालेल्या बाधितांना अतिरिक्त नुकसान भरपाई मिळावी, म्हणून आम्ही याचिका दाखल केली, असे रचना धिंग्रा यांनी सांगितले.

मिथाईन आयसोसायनाईटच्या संपर्कात आल्यास आरोग्याचे होणारे नुकसान कायमस्वरूपी असते, असे खुद्द युनियन कार्बाईडच्या दस्तावेजांत म्हटले आहे. मात्र, नुकसान भरपाईसाठी दाखल करण्यात आलेल्यांपैकी ९३ टक्के दाव्यांत अधिकृत एजन्सीने अस्थायी पद्धतीची इजा दाखवली आहे. त्यामुळे पीडितांना कमी नुकसान भरपाई मिळाली. भोपाळमध्ये वायूच्या संपर्कात आलेल्यांचे चुकी वर्गीकरण करण्यात आले, असा आरोप धिंग्रा यांनी केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# अमृतसरमध्ये आठ पिस्तुले जप्त, दोघांना अटक

◆ **चंदीगड, ३० नोव्हेंबर**

पाकिस्तानातून तस्करी करून आणलेल्या आठ पिस्तुलांसह पंजाब पोलिसांनी दोघांना अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्याने शनिवारी दिली.

शस्त्रसाठा हस्तांतरित करण्यासाठी एकाची प्रतीक्षा करीत असताना या दोघांना अमृतसरच्या नुरपूर पाढरी येथे अटक करण्यात आली. जगजितसिंग उर्फ निक्कू आणि गुरविंदरसिंग उर्फ गांधी अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ते दोघेही अमृतसरमधील कौलोवाल गावातील रहिवासी आहेत. त्यांच्या ताब्यातून ऑस्ट्रिया बनावटीच्या चार ग्लॉक, तुर्कीतील ९ मिमी व्यासाच्या दोन आणि दोन झिगाना एक्स-शॉट पिस्तूल आणि दहा काडतुसे जप्त करण्यात आली. गुप्तचरांनी दिलेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पाकिस्तानातून शस्त्रांची मोठी खेप भारतात आणली जात असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. ◂(वृत्तसंस्था)

# इव्हीएम घोटाळ्यातून लोकशाहीचा खून

## मतमोजणीविरुद्ध कोर्टात लढा देणार: महेश कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर -**

सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील लोकांनी माझ्या विजयासाठी जीव तोडून काम केले. मग माझी हक्काची मते कुठे गेली? विडी घरकूल भागातून मला मताधिक्य मिळणार नाही, असे होऊच शकत नाही. ही बाब माझ्यासह अनेकांना न पटणारी आहे. त्यामुळे इव्हीएम घोटाळ्यातून लोकशाहीच खून झाला , असे सांगत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे यांनी इव्हीएमला दोष देत भाजपने इव्हीएम घोटाळ्यातून लोकशाहीचा खून केल्याचा आरोप त्यांनी केला. याप्रकरणी आपण कोर्टात लढा देणार आहोत, असेही कोठे यांनी सांगितले.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत कोठे यांचा पराभव झाला. खरे तर कोठे यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे उमेदवार विजयकुमार देशमुख यांच्यावर मतदारसंघात प्रचंड मोठी नाराजी होती. त्यामुळे यावेळी शहर उत्तरमध्ये तुतारी वाजणार असल्याचा विश्वास अनेकांना होता. परंतु मतमोजणीनंतर घडले उलटेच. देशमुख मोठ्या फरकाच्या मतांनी विजयी झाले. यानंतर कोठे यांनी शनिवारी प्रथमच माध्यमासमोर येऊन आपली भूमिका मांडली. कोठे यांनी भाजपला लक्ष्य करताना पराभवाचे खापर इव्हीएम मशीनवर फोडले.

फेरमतमोजणी तर सोडा व्हीव्ही पॅटवरील मतेही मोजायला प्रशासन तयार नाही. त्यामुळे निवडणूक प्रशासनाच्या या सर्व प्रकारावर कोठे यांनी संशय व्यक्त केला आहे.

### दोन केंद्रावरील फेरमतमोजणीची मागणी

विडी घरकूल भागातील दोन मतदान केंद्रांवरील फेरमतमोजणीची मागणी केली असून त्यासाठी ९४ हजार ४00 रुपये शुल्क भरले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना दहा हजाराची अनामत घेतली जाते आणि आता फेरमतमोजणीसाठी लाखो रुपयाचे शुल्क आकारले जाते. निवडणूक आयोगाचा हा प्रकार योग्य नसल्याची खंत महेश कोठे यांनी व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वेणुगोपाल यांच्यावरील जबाबदाऱ्या कमी करा

## काँग्रेस नेत्यांची मागणी

**नवी दिल्ली, ३० नोव्हेंबर**

काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीत अप्रत्यक्षपणे काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल यांना लक्ष्य करण्यात आले. वेणगोपाल यांच्यावर खूप जबाबदारी आहे, ती कमी करण्यात यावी, अशी मागणी सदस्यांनी केली.



महाराष्ट्र आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या दारुण पराभवाच्या कारणांवर चर्चा करण्यासाठी शुक्रवारी काँग्रेस मुख्यालयात राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस कार्यसमितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री हरीश रावत यांनी वेणुगोपाल यांचा मुद्दा उपस्थित केला. वेणुगोपाल अतिशय मेहनती आहेत. ते कठोर परिश्रम करतात. त्यांच्यावर कामाचा मोठा बोझा आहे, एकाचवेळी ते अनेक जबाबदाऱ्या सांभाळतात. त्यामुळे सर्वच जबाबदाऱ्यांना त्यांना न्याय देता येत नाही. वेणुगोपाल यांच्यावरील जबाबदाऱ्या दुसऱ्या नेत्यांकडे सोपवण्याची मागणी रावत यांनी केली. विशेष म्हणजे, यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते.

सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांसाबेतचा आपला संवाद आणि संपर्क वाढवावा. त्यांना सहजतेने भेटावे, अशी अपेक्षा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहनप्रकाश यांनी व्यक्त केली. काँग्रेस कार्यकर्त्यांना थेट या नेत्यांना भेटता आले पाहिजे, असे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### अप्रत्यक्ष मागणी अशी...

वेणुगोपाल हे राहुल गांधी यांचे अतिशय विश्वासू म्हणून ओळखले जातात. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून पक्षसंघटनेतील त्यांचे महत्त्व आणि स्थान कायम आहे. कार्यसमितीच्या बैठकीत सदस्यांनी अप्रत्यक्षपणे वेणुगोपाल यांना संघटन महासचिव पदावरून हटवण्याची मागणी केली. एकप्रकारे राहुल गांधी यांच्यावरही टीका केली, असे मानले जाते.

# इटालियन कंपन्यांची भारतात ६.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

**मुंबई,३० नोव्हेंबर**

इटालियन कंपन्यांनी भारतात ६.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करीत जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्यांपैकी एक असलेल्या अर्थव्यवस्थेला महत्त्व दिले आहे. येथे वृद्धीच्या अनेक संधी आहेत, असे युरोपियन हाऊस ॲम्ब्रोसिटीचे वरिष्ठ भागीदार लोरेन्झो तवाइझी यांनी सांगितले.

टीईएचएच्या परिस्थिती आणि गुप्तचर क्षेत्रांचे प्रमुख असलेले तवाइझी शुक्रवारी मुंबईत व्हिलेजिओ इटालिया प्रदर्शनाच्या उद्‌घाटनानंतर बोलत होते, जे राष्ट्रीय मुत्सद्देगिरीचे प्रशिक्षण आणि समर्थन देण्यासाठी वापरले जाणारे इटालियन नौदलाची नौका अमेरिगो व्हेस्पुक्कीच्या पोर्ट ऑफ कॉलच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आले होते.

मुंबईत नौकेच्या आगमनासंदर्भात एएनएसए या शीर्ष इटालियन वृत्तसंस्थेने क्युरेट केलेल्या पॅनेल चर्चेत तवाइझी म्हणाले की, इटली शाश्वत तंत्रज्ञान आणि हायस्पीड रेल्वेमधील कौशल्यासह ऊर्जा संक्रमण आणि वाहतूक आघाड्यांवर भारताच्या आकांक्षांना मदत करू शकतो. मुंबईस्थित व्यवस्थापन शिक्षण संस्था, एसडीए बोकोनी एशिया सेंटरचे ॲलेसँड्रो गिऊलियानी म्हणाले की, दोन्ही देशांच्या स्वयंपाकाच्या सवयी, मसाल्यांच्या वापरावर केंद्रीत असलेल्या अन्नातील समानता लक्षात घेता इटलीत अभ्यासासाठी गेलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना घरी असल्यासारखे वाटले पाहिजे. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची बदनामी करणाऱ्या नागपूरच्या बंटी शेळकेंना कारवाईची नोटीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० नोव्हेंबर -**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे आरएसएसचे एजंट असून आपल्या पराभवासाठी त्यांनी कट रचला होता, असा आरोप करणाऱ्या नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार बंटी शेळके यांना पक्षाने निलंबित करण्याबाबतची नोटीस बजावली आहे.

यासंदर्भात २ दिवसांत खुलासा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विधानसभा निवडणुकीत पक्षातील ज्या पदाधिकाऱ्यांनी बेशिस्त वर्तन करून पक्षाच्या प्रतिमेला गालबोट लावण्याचे काम केले आहे. त्यांच्यावर कडक करवाई करण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे. निवडणुकीच्या निकालावर विचारमंथन करण्यासाठी प्रदेश काँग्रेसचे कार्यालय टिळक भवन येथे झालेल्या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना शेळके यांनी काँग्रेस पक्ष व प्रदेशाध्यक्षांबाबत खोटी व बदनामी करणारी विधाने केली आहेत. त्यांनी काँग्रेस पक्ष व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची प्रतिमा मलिन करण्याचे काम केले असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात नोटीस पाठवण्यात आली आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली आहे.

# ट्रम्प यांच्या शपथविधीपूर्वी अमेरिकेत परता

## अमेरिकेतील विद्यापीठांचा भारतीय विद्यार्थ्यांना सल्ला

**वॉशिंग्टन, ३० नोव्हेंबर**

डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेण्यापूर्वी तुम्ही कोठेही असला, तरी अमेरिकेत परत या, असे आवाहन करीत अमेरिकेतील अनेक विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना ट्रॅव्हल ॲडव्हायझरी जारी केल्या आहेत. हे आवाहन विशेषतः भारतीय विद्यार्थ्यांसाठी असल्याचे मानले जात आहे. २०१७ मध्ये ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर जारी केलेल्या प्रवास बंदी आदेशामुळे देशात तणाव निर्माण झाला होता, याचेही स्मरण विद्यापीठांच्या आवाहनामुळे झाले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या पदग्रहणानंतर प्रशासनाकडून प्रवासी निर्बंध लागू केले जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठांनी त्यांच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना ट्रम्प यांच्या शपथविधीपूर्वी अमेरिकेत परतावे, असे आवाहन केले आहे.



अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प हे २० जानेवारी रोजी शपथ घेणार आहेत. राष्ट्राध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या पहिल्याच दिवशी ते अर्थव्यवस्था आणि स्थलांतरितांच्या समस्यांवरील अनेक कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी करतील, असेही मानले जात आहे.

अमेरिकेतील शैक्षणिक-सांस्कृतिक आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांच्या आकडेवारीनुसार, अमेरिकेतील एकूण विदेशी ५० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी भारत आणि चीनमधील आहेत. अमेरिकेतील विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या भारत आणि चीनमधील विद्यार्थ्यांची संख्या ५४ टक्क्यांहून अधिक आहे.

२००९ नंतर अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येत २३ टक्क्यांनी वाढ होऊन भारताने चीनला मागे टाकले. 'ओपन डोअर्स २०२४ रिपोर्ट ऑन इंटरनॅशनल एज्युकेशनल एक्सचेंज'मधील आकडेवारीनुसार, २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३,३१,६०२ इतकी होती. दुसऱ्या स्थानी चीन आहे. (वृत्तसंस्था)

### २०१७ मध्ये प्रवेश बंदीचा आदेश

२०१७ मध्ये डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाले. यानंतर पहिल्याच आठवड्यात त्यांनी इराक, सीरिया, इराण, लिबिया, सोमालिया, सुदान आणि येमेन या मुस्लिमबहुल देशांच्या नागरिकांना ९० दिवसांसाठी अमेरिकेत प्रवेश करण्यास बंदी घातली होती. या निर्णयावर अमेरिकेतील नागरी हक्क संघटनांनी संताप व्यक्त केला होता.



भारत आणि सिंगापूरच्या लष्करी जवानांनी द्विपक्षीय अभ्यासाचा भाग म्हणून महाराष्ट्राच्या देवळाली फिल्ड फायरिंग रेंजमध्ये संयुक्त कवायती सादर केल्या. 'अग्नी वॉरियर' असे या अभ्यासाचे नाव असून, त्याची ही तेरावी आवृत्ती आहे

## हेलिकॉप्टर गनशिप हल्ल्यात १७ दहशतवाद्यांचा खात्मा

**पेशावर, ३० नोव्हेंबर**

पाकिस्तानी सुरक्षा दलाने हेलिकॉप्टर गनशिपच्या माध्यमातून देशाच्या अशांत खैबर पख्तूनख्वा प्रांतात दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये हल्ला करून शुक्रवारी १७ दहशतवाद्यांना ठार मारले, असे अधिकाऱ्याने सांगितले.

बन्नू आणि उत्तर वझिरिस्तान जिल्ह्यांमध्ये गुप्तचर माहितीवर आधारित कारवाई करण्यात आली. बन्नू जिल्ह्यातील बाका खेल भागात हारिफ गुलबहादूर गटाशी संबंधित १२ दहशतवाद्यांना ठार मारण्यात आले. दुसरी कारवाई उत्तर वझिरिस्तानमधील मीर अली येथील हासो खेल भागात करण्यात आली, ज्यात पाच अतिरेकी मारले गेले. या दशहतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

# 'पुष्पा २' सापडला सेन्सॉरच्या कात्रीत

**मुंबई, ३० नोव्हेंबर**

दक्षिण सुपरस्टार अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २: द रुल' हा या वर्षातला बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. हा चित्रपट ५ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. त्यातच हा चित्रपट सेन्सॉरच्या कात्रीत सापडला आहे.



चित्रपटाच्या प्रदर्शनाला केवळ ४ दिवस राहिले असताना सेन्सॉर बोर्डाने पुष्पाच्या दृश्यांवर कात्री लावत काही महत्त्वाचे बदल करण्यास सांगितले आहे. गुरुवारी सेन्सॉर बोर्डाने पुष्पा २ चित्रपटाला यू/अ प्रमाणपत्र दिले.

पुष्पा २ चित्रपटातील अनेक अक्षेपार्ह शब्द आणि मारामारीची काही थरारक दृश्ये कापण्यात आली आहेत. या दृशांमध्ये असणारा हिंसाचार कथेत गरजेचा नसून, केवळ अभिनेत्यावर लक्ष केंद्रीत केल्यास बाकीची दृष्ये आपोआप झाकली जातील, अशा सूचना दिल्या आहेत. या दृष्यांमध्ये पुष्पा त्याच्या एका हातात तुटलेला हात घेऊन जाताना दिसतो.

पुष्पा २ चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळताना दिसत असून, ३० नोव्हेंबरला चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकींगला सुरुवात झाली आहे. हा चित्रपट पुष्पाच्या पहिल्या भागाचाही रेकॉर्ड तोडेल, अशी आशा निर्मात्यांना आहे. (वृत्तसंस्था)

# लेबनॉनमध्ये इस्रायलचा आम्ही पराभव केला

## हिजबुल्लाहचा म्होरक्या कासिमचा दावा

**बैरूत, ३० नोव्हेंबर**

लेबनॉनी गट हिजबुल्लाहचा प्रमुख नइम कासिम याने इस्रायलविरुद्ध मोठा विजय मिळवल्याचे म्हटले आहे. शुक्रवारी एका टीव्हीवरील भाषणात कासिमने लेबनॉनमधील अलिकडील युद्धात इस्रायलला झुकण्यास आम्ही भाग पाडल्याचा दावा केला. कासिम म्हणाला, हिजबुल्लाहच्या सततच्या प्रतिकारामुळे इस्रायलला गुडघे टेकण्यास आणि तडजोड करण्यास पाडले. हिजबुल्लाहने २००६ नंतर लेबनॉनमध्ये पुन्हा एकदा इस्रायलचा पराभव केला आहे.



यरूशमल पोस्टच्या वृत्तानुसार, सप्टेंबरमधील पेजर हल्ल्याचा संदर्भ देत कासिम म्हणाला की, इस्रायलला हिजबुल्लाहच्या कमांड सिस्टिमवर हल्ला करून आपले लक्ष्य साध्य करण्याची आशा होती. मात्र, असे घडले नाही आणि हिजबुल्लाहने इस्रायलच्या होम फ्रंटवर हल्ले सुरू केले. इस्रायलला बचावात्मक स्थितीत ठेवले आणि युद्धविराम झाला.

या दरम्यान कासिमने सांगितले की, आम्ही आमची मान ताठ ठेवत हा करार केला आहे. लितानी नदीच्या खाली दक्षिण लेबनॉनच्या सर्व भागांतून इस्रायली सैन्याची माघार हा या कराराचा मुख्य मुद्दा होता. आम्ही त्यास चिकटून राहिलो आणि इस्रायलला ते मान्य करावे लागले. त्यांनी हिजबुल्लाह कमकुवत होईल, अशी व्यवस्था होती, पण त्यांचा डाव पूर्णपणे फसला आहे.

आमचा हा २००६ पेक्षाही मोठा विजय झाला आहे. युद्धविराम व्यवस्थेवर चर्चा करताना कासिम म्हणाला की, कराराची अंमलबजावणी करण्यासाठी लेबनीज सैन्य आणि हिजबुल्लाह यांच्यात उच्चस्तरीय समन्वय असेल. या काळात सतत लढत राहिल्याबद्दल कासिमने हिजबुल्लाहचे कौतुक केले आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'आई, बाबा रिटायर होत आहेत' मालिका प्रेक्षकांच्या भेटीला

मुंबई : 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' ही नवी मालिका स्टार प्रवाहवर येत आहे. ही मालिका एका जोडप्याभोवती फिरते, ज्यांना खरंतर घरच्या जबाबदाऱ्यांमधून निवृत्त तर व्हायचे आहे; मात्र न संपणाऱ्या जबाबदाऱ्यांमध्ये ते अडकले जातात. अभिनेत्री निवेदिता सराफ आणि मंगेश कदम या नव्या मालिकेतून भेटीला येणार आहेत. आई-बाबा आपल्या जबाबदारीमधून कधीही रिटायर होत नाहीत. नात्यांची उत्तम गुंफण असणारी हृदयस्पर्शी कथा घेऊन येत आहे, याचा खूप आनंद आहे, असे मंगेश कदम म्हणाले. २ डिसेंबरपासून दुपारी २.३० वाजता ही नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

### अभिनेता नागार्जुनने खरेदी केली अडीच कोटींची कार

मुंबई : तेलुगू अभिनेते नागार्जुन अक्किनेनी यांनी गुरुवारी आपल्या नव्या कारची नोदणी केली. यासाठी त्यांनी खैरताबाद येथील क्षेत्रीय परिवहन कार्यालयाला भेट दिली. यावेळी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागार्जुनचे स्वागत केले. लेक्सुस कारच्या नोंदणीची औपचारिकता त्यांनी तत्काळ पूर्ण केली. सूत्रांच्या माहितीनुसार, नागार्जुन यांचे डिजिटल अंगठ्याचे ठसे आणि सही घेतल्यानंतर रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण झाली. या कारची किंमत २.५ कोटी रुपये आहे. दरम्यान, नागा चैतन्य आणि शोभिता धुलिपाला यांचा प्री-वेडिंग कार्यक्रम ३० नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. त्यांचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर फिरत आहेत.



### संगीत मानापमान चित्रपटाचा अल्बम प्रदर्शित

**मुंबई** : जिओ स्टुडिओज प्रस्तुत आगामी मॅग्नम ऑपस संगीतमय चित्रपट संगीत मानापमानच्या संगीत प्रदर्शनाचा भव्य सोहळा पार पडला. १० जानेवारी रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. दिग्गज संगीतकार शंकर-एहसान-लॉय यांनी या चित्रपटासाठी मंत्रमुग्ध करणारी एकूण १४ गाणी तयार केली आहेत. या गाण्यांना १८ नामवंत गायकांनी आवाज दिला आहे. १८ अविश्वसनीय प्रतिभावान गायकांसोबत काम करणे एक अद्‌भुत अनुभव आहे, असे शंकर महादेवन् म्हणाले. कट्यार काळजात घुसलीच्या यशानंतर आम्ही संगीत मानापमान सादर करीत आहोत. दिग्गज त्रिकूट शंकर-एहसान-लॉय व १८ गायकांनी सजलेल्या भावपूर्ण रचनांची जादू मोठ्या पडद्यावर नक्कीच दिसेल, असे अभिनेते आणि दिग्दर्शक सुबोध भावे म्हणाले.

### रश्मिकाने 'पुष्पा २'साठी घेतले १० कोटींचे मानधन

**मुंबई** : दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्री रश्मिका मंदानाला नॅशनल क्रश म्हणून ओळखले जाते. ५ डिसेंबरला प्रदर्शित होणाऱ्या 'पुष्पा २' चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये ती प्रचंड व्यस्त आहे. या चित्रपटासाठी सर्वांत जास्त मानधन घेणारी ती दुसरी कलाकार आहे. एका रिपोर्टनुसार, रश्मिकाची एकूण संपत्ती ४५ कोटी रुपये आहे. 'पुष्पा २' चित्रपटासाठी रश्मिकाने १० कोटी रुपयांचे मानधन घेतले आहे. या चित्रपटानंतर रश्मिका मंदाना सलमान खानसोबत दिसणार आहे. रश्मिका आणि सलमान खानचा 'सिंकदर' चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे.





फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावाने तामिळनाडूतील अनेक भागांमध्ये शनिवारी मुसळधार पाऊस झाला. चेन्नईतील बहुतांश रस्ते पाण्याखाली आले होते. त्यामुळे वाहतूकदार आणि पायी चालणाऱ्यांचे प्रचंड हाल झाले

# तामिळनाडू, पुदुचेरीत मुसळधार पाऊस

## 'फेंगल'ची वाटचाल समुद्रकिनाऱ्याकडे

**चेन्नई, ३० नोव्हेंबर**

फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावाने शनिवारी उत्तर तामिळनाडू आणि पुदुचेरीच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाने थैमान घातले. परिणामी सामान्य जनजीवनावर परिणाम झाला. सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. अनेक भागांत पाणी साचले होते. दुपारी १२:३० ते सायंकाळी ७ या वेळात चेन्नई विमानतळावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. पुदुचेरीतील सखल भागांमध्ये राहणाऱ्या लोकांना बाहेर काढण्यात आले.

केंद्रशासित प्रदेश प्रशासनाने सुमारे १२ लाख रहिवाशांना एसएमएसद्वारे अलर्ट पाठवून फेंगल चक्रीवादळ दिवसाच्या उत्तरार्धात धडकण्याची शक्यता असल्याने सर्तक राहण्याचा इशारा देण्यात आला. चेन्नईमध्ये मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी राज्य आपत्कालीन ऑपरेशन सेंटरमध्ये उच्च अधिकाऱ्यांसह परिस्थितीचा आढावा घेतला. सर्व सावधगिरी बाळगण्यात आली असून, असुरक्षित भागातील लोकांसाठी शिबिरे सुरू केली आहेत तसेच त्यांना जेवणाचे वाटपही करण्यात आले. चेन्नईत अनेक भागात पाणी साचले असून, झाडे उन्मळून पडली आहेत. २२ भुयारी मार्गांपैकी २१ मार्गांमध्ये वाहतूक सुरळीत करण्यात आली. रेल्वे पुलाच्या कामाशी संबंधित कामांसाठी गणेशपुरम् भुयारी मार्ग आधीच बंद करण्यात आला होता. (वृत्तसंस्था)

# ६००वर दहशतवादी वित्तपुरवठादारांची ओळख निश्चित

## युरी चिखानचीन यांची माहिती

**इंदूर, ३० नोव्हेंबर**

'द युरेशियन ग्रुप'ने दहशतवादी वित्त पुरवठा करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नेटवर्कशी जुळलेल्या ६०० पेक्षा जास्त जणांची ओळख पटवली आहे, अशी माहिती संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

आंतरराष्ट्रीय दहशतवादी आणि त्यांच्या वित्तपुरवठादारांना वित्तपुरवठा करण्याचे मार्ग ओळखणे हे सध्याचे सर्वांत मोठे आव्हान म्हणून समोर आले आहे. नऊ देशांचा समावेश असलेल्या ईएजीच्या ४१ व्या बैठकीत या मुद्यावर विस्तृत चर्चा झाली, असे ईएजीचे अध्यक्ष युरी चिखाचीन यांनी सांगितले.

२५ नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या पाच दिवसीय बैठकीच्या समारोपात त्यांनी पत्रपरिषदेला संबोधित केले. ईएजीमध्ये बेलारूस, चीन, कझाकस्तान, किरगिझस्तान, भारत, रशिया, ताजकिस्तान, तुर्की आणि उझबेकिस्तान असे नऊ सदस्य देश आहेत.

वित्तपुरवठादार आणि वित्तपुरवठ्याचे मार्ग ओळखणे सर्वांत आव्हानात्मक काम आहे, असे चिखानचीन यांनी सांगितले. ईएजीच्या सहयोगी देशांतील वित्तीय गुप्तचर युनिट्सने केलेल्या विश्लेषणाच्या माध्यमातून यंदा आपल्या क्षेत्रातील ६०० दहशतवादी वित्तपुरवठादारांची ओळख पटवण्यात आली. त्यांच्या आर्थिक व्यवहारांच्या पद्धतीवरून आम्ही ओळख पटवली. हा एक चांगला निष्कर्ष समोर आला आणि भविष्यात हे काम वाढवण्यासाठी यातून प्रेरणा मिळेल, असे ते म्हणाले.

हे एक मोठे यश आहे आणि



दहशतवाद्यांना वित्तपुरवठा करणाऱ्यांची ओळख पटवण्याची मोहीम अधिक बळकट करण्याची या माध्यमातून संधी मिळाली आहे. सध्याची जागतिक परिस्थिती पाहता दहशतवादाशी संबंधित धोका केवळ एका देशापुरता मर्यादित राहिलेला नाही, असे त्यांनी अफगाणिस्तानबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. (वृत्तसंस्था)

# ...आता सरकारची जबाबदारी

## प्रासंगिक

अक्षय रानडे

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने मिळवलेल्या अभूतपूर्व यशानंतर लोकसभा निवडणुकीमध्ये मागे राहिलेली प्रत्येक जागा महायुतीने बळकावल्याचे दिसले. खेरीज महिलांनी मतदानाच्या प्रक्रियेत घेतलेला पुढाकारही निर्णायक ठरल्याचे पाहायला मिळाले. हे दोन्ही कल येत्या काळातही काम करतील आणि सरकार राज्याच्या मुख्य प्रश्नांना हात घालून जनमताचा मान ठेवेल अशी अपेक्षा आहे.**

नुकतीच पार पडलेली राज्य विधानसभा निवडणूक अनेकार्थाने महत्त्वपूर्ण होती. गेले काही दिवस सुरू असणाऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक घुसळणीचा फार मोठा प्रभाव या निवडणुकीवर होताच. खेरीज राजकारणाचा वेगळा बाज अनुभवल्यानंतर मतपेटीतून दिसलेला मतदारांचा कौलही अत्यंत महत्त्वपूर्ण होता. त्यामुळे निवडणूक, निकाल आणि नवीन सरकारची स्थापना असे सगळे मैलाचे दगड पार करूनही या निवडणुकीचे कवित्व पुढील बराच काळ उरणारे आहे. ही निवडणूक कुठली शिवसेना आणि राष्ट्रवादी खरी आणि कोणती खोटी हे ठरवणारी होती, राज्यातील काँग्रेसची स्थिती निर्देशित करणारी होती, तसेच भाजपाचा घटता वा वाढता जनाधार निश्चित करणारी होती. या पृष्ठभूमीवर मतदारांनी स्पष्ट आणि निर्विवाद कौल देत महायुतीला पाठिंबा दिला, तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच मूळ पक्ष असल्याचे निर्देशित केले. स्वाभाविकच आता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे दोन्ही पक्ष आगामी काळातील राजकारणाकडे कशा प्रकारे बघतील, हे आता पाहावे लागेल.

महाराष्ट्रात काँग्रेसचा दारुण पराभव झाला. युती वा आघाडी असणाऱ्या राज्यांमध्ये सातत्याने पराभव होताना दिसत असल्यामुळे काँग्रेसला आता आपल्या विचारसरणीचाच नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाल्यासारखी स्थिती पाहायला मिळत आहे. काँग्रेस निवडणुकीमध्ये हवा तेवढा जोर लावत नसल्याचा आक्षेप केवळ महाराष्ट्रातील त्यांच्या मित्रपक्षांचा नसून, देशातील विविध राज्यांमधील मित्रपक्षांचीही सातत्याने हीच तक्रार राहिली आहे. त्यामुळेच आता त्यांची प्रतिष्ठा पणाला लागल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. खरे तर लोकसभा निवडणुकीनंतर ती थोडी वाढली होती. पण महाराष्ट्रातील निवडणुकांनंतर आता येणाऱ्या अन्य निवडणुकांमध्ये त्यांची बार्गेनिंग पॉवर किती राहील, हे बघावे लागणार आहे. कारण, महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या राज्यात इतर पक्षांप्रमाणे त्यांनीही बराच जोर लावला होता. त्यामुळेच एकंदर निवडणुकांच्या समीकरणामध्ये त्यांना आपली पत पुन्हा मिळवण्यासाठी बराच प्रयत्न करावा लागणार आहे.

एकूणच या निवडणूक निकालाने इतिहास घडवला असे म्हणण्यास पुरेपूर वाव आहे. यापूर्वी काँग्रेस पक्षाला एवढे यश मिळाले असेल, पण त्यानंतर कोणत्याही एका पक्षाला वा पक्षसमूहाला एक तृतीयांश मते मिळाल्याचे चित्र महाराष्ट्राने बघितलेले नाही. म्हणूनच महायुतीला मिळालेले हे अपूर्व यश नवा इतिहास घडवणारे आहे. म्हणूनच आश्चर्यही वाटणार नाही. खेरीज या निवडणुकीमध्ये राजकारणातील एक पिढी बदलल्याचे चित्रही बघायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांचे पुढे आलेले नेतृत्व असेल वा शिवसेनेमध्ये एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व असेल वा भाजपामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा मिळवलेले आपले स्थान असेल; हे सगळेच मुद्दे महत्त्वपूर्ण म्हणावे लागतील, कारण या नेतृत्वांचा उदय आधीची पिढी मागे टाकणारा, विचारांची दिशा बदलवणारा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये महायुतीला मोठा फटका बसला. त्यानंतर अनेकांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मात्र, ताज्या निवडणूक निकालामध्ये भाजपाला मोठा विजय मिळाल्यानंतर आता या शंकेला जागा उरली नसून त्यांचे निर्विवाद नेतृत्व स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच राज्यस्तरीय पातळीवर आता त्यांचे नेतृत्व ओळखले जाईल, यात शंका नाही.



आधी उल्लेख केल्याप्रमाणे या निवडणुकीतून समोर आलेले चित्र राज्यात काँग्रेसचा अस्त होतोय का, हा प्रश्न पुढे आणणारे आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला काही प्रमाणात का होईना, महाराष्ट्र आणि देशातील काही राज्यांमध्ये यश मिळालेले दिसले. मात्र, महाराष्ट्राचा विचार करता इथे त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कर्नाटक वगळता काँग्रेसला कुठेही स्वतंत्रपणे यश मिळवता आलेले नाही. झारखंडचा विचार केला तरी तेथे मिळालेले यश झारखंड मुक्ती मोर्चाचे असल्याचे स्पष्ट दिसते. काँग्रेसच्या महाराष्ट्रातील नेतृत्वाचा विचार केला तर बऱ्याच मोठ्या नेत्यांनाही इथे यश मिळाल्याचे दिसले नाही. पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात असे नेते पराभूत झाले. अशोक चव्हाण यांच्यासारख्या ज्येष्ट नेत्याने तर आधीच पक्षांतर केलेले... अशा अवस्थेत पुढच्या काळात काँग्रेसचा महाराष्ट्रातील पाईक कोण असेल, हा प्रश्न उरतो. म्हणजेच वैचारिक आणि संस्थात्मकदृष्ट्या महाराष्ट्रात काँग्रेसची जबर पीछेहाट होतेय का आणि त्यांची जागा आताचे हे नवे पक्ष घेत आहेत का, हे बघावे लागेल. काँग्रेसला इथे पुन्हा ताकदीने उभे राहायचे असेल तर आधी स्वत:मध्ये काही मूलभूत बदल घडवून आणावे लागतील, हे ताज्या निकालांनी दाखवून दिले आहे.

या निवडणुकांनंतर राज्य स्तरावरील राजकीय समीकरणे बदललेली दिसतील. आधीचे राजकीय ध्रुवीकरण वेगळे होते. भाजपा-शिवसेना एका ठिकाणी, तर राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस दुसऱ्या ठिकाणी असे चित्र राज्याने बराच काळ पाहिले. एक धर्मनिरपेक्ष पुरोगामी गट, तर दुसरी कट्टर हिंदुत्ववादी आघाडी अशी ही फळी होती. पण आता काही प्रमाणात हे ध्रुवीकरण बदलताना दिसत आहे. अजित पवारांचा गट, एकनाथ शिंदे गट भाजपाबरोबर आल्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गट बऱ्याच प्रमाणात कमकुवत झालेला आहे. त्यामुळे आपल्याला पुढील राजकीय समीकरणे बऱ्याच प्रमाणात बदललेली दिसतील. त्याचा फायदा निश्चितच भाजपा आणि शिंदे गटाला होताना दिसेल.

या निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये भाजपाचे वाढलेले वजन हादेखील येत्या काळात प्रभावी ठरणारा विषय असेल. २०१४ च्या आधी एकत्रित शिवसेना हा आघाडीवरील पक्ष होता तर भाजपा दुसऱ्या क्रमांकावरील पक्ष समजला जायचा. मात्र, २०१४, २०१९ आणि आता २०२४ मधील निवडणुकांमध्ये झालेले मतदान पाहता लक्षात येते की, आता भाजपाने राज्यावर पूर्ण वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळेच राज्यातील सर्वांत मोठा पक्ष झाला आहे. त्यानुसार काही समीकरणेही बदललेली दिसत आहेत. उदाहरणार्थ, महत्त्वपूर्ण सहकार क्षेत्रात भाजपा पाय रोवताना दिसत आहे. अजित पवारांना आपल्याकडे घेण्यामागेही अशी भूमिका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. थोडक्यात, येत्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपाचा प्रभाव वाढणार आहे. शिवसेनेला काही प्रमाणात का होईना, भाजपाबरोबर जमवून घ्यावे लागले आहे.

पुढील पाच वर्षे महाराष्ट्राला एक स्थिर सरकार मिळण्याच्या दृष्टीने जनतेने दिलेला कौल अत्यंत आश्वासक आहे. शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिघांनीही संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये एका सुसूत्रतेने लढत दिली. त्यांच्यामध्ये बऱ्याच प्रमाणात एकमत झालेले दिसले. म्हणूनच पुढची पाच वर्षे महाराष्ट्राला स्थिर सरकार मिळण्याची अपेक्षा आहे. आता या सरकारवरील जबाबदारीही वाढली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जाच्या वाढत्या बोज्याचा-असंतुलित विकासाचा मुद्दा, विदर्भ-मराठवाड्याला पुढे नेण्याचा, रखडलेले प्रकल्प पुढे नेण्याचा प्रश्नही विचारात घ्यावा लागेल. मागे राहिलेले प्रकल्प, योजना गतिमान करणे आणि महाराष्ट्राचा विकासदर वाढवून वेगाने प्रगतिशील अवस्थेकडे नेण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. जनतेच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान या सरकारपुढे असेल.

वैचारिकदृष्ट्या या सरकारपुढे फार अडचण येईल असे वाटत नाही. पुरेसे बहुमत असल्यामुळे हिंदुत्वाचा विषय वा तसे कळीचे विषय हाताळत सरकार चालवण्यात त्यांना फारशी अडचण येणार नाही. मात्र, अजित पवार गटाला सांभाळत पुढे नेण्याचा प्रश्न काही प्रमाणात असेल. याचे कारण म्हणजे निवडणूक प्रचारात भाजपाच्या काही मुद्द्यांपासून पवारांनी फारकत घेतल्याचे आपल्या नजरेतून सुटलेले नाही. 'एक है तो सेफ है', 'बटेंगे तो कटेंगे'सारख्या कळीच्या हिंदुत्ववादी प्रचाराला त्यांनी लांब ठेवलेले दिसले. त्यामुळेच अशा काही विषयांवर सरकारपुढे पेच निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेगळ्या विदर्भाचा विषय वा लहान राज्यांच्या निर्मितीबाबतचे आपले मुद्दे भाजपा फारसे पुढे नेऊ शकेल, असे वाटत नाही. कारण, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष त्यांच्या बाजूने नाहीत. आजही एकहाती सत्ता असल्यामुळे भाजपाला काही बाबतीत तडजोड ही करावी लागेल, हे निश्चित!

(लेखक प्रसिद्ध विश्लेषक आहेत)

# उत्तर प्रदेशमध्ये योगींची करामत

## दखल

अजय तिवारी

**ताज्या पोटनिवडणुकांमध्ये उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांनी धमाल केली आणि अखिलेश यादव यांना जमिनीवर आणले. लोकसभा निवडणुकीतील यश डोक्यात गेल्याने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे जे झाले, तेच उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यांचे झाले होते. भाजपाच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी आणि दीड वर्षांत होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा विजय उपयोगी पडणार आहे.**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीला धोबीपछाड दिली. तशीच धोबीपछाड या आघाडीने उत्तर प्रदेशमध्ये भाजपा आणि त्याच्या मित्रपक्षांना दिली. मात्र, त्याची अगदी तशीच परतफेड योगी आदित्यनाथ यांनी करून अखिलेश यादव यांना जमिनीवर आणले. निवडणुकीतील प्रचाराचे चलनी नाणे झाले असताना योगींनी उत्तर प्रदेशवरील पकड ढिली होऊ दिली नाही, हे तेथील पोटनिवडणुकांच्या निकालावरून दिसते. नऊ जागांच्या या निकालामुळे सत्ता समीकरणात काहीही फरक पडणार नसला, तरी भाजपाच्या कार्यकर्त्यांचा लोकसभेच्या निवडणुकीनंतर कमी झालेला आत्मविश्वास परत मिळवून देण्यासाठी आणि दीड वर्षांत होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा निकाल खूप उपयोगी पडणार आहे. या वेळी उत्तर प्रदेशमध्ये नऊ जागांवर झालेल्या पोटनिवडणुका योगी यांच्यासाठी जीवन-मरणाचा प्रश्न बनल्या होत्या. समाजवादी पक्षाचे बालेकिल्ले उद्ध्वस्त करताना अखिलेश यांना मोठे धक्के दिले. साठ टक्क्यांहून अधिक मुस्लिम असलेल्या मतदारसंघात भाजपाचा उमेदवार सव्वा लाखपेक्षा अधिक मतांनी जिंकतो, हा मोठा संदेश आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि योगींना ज्या पराभवाला सामोरे जावे लागले होते, त्यातून बाहेर पडण्यास पोटनिवडणुकांचे निकाल पक्षाला मदत करू शकतील. योगींनी लोकसभा निवडणुकीनंतर लगेचच पोटनिवडणुकीत सर्व जागा जिंकण्याचा निर्धार केला होता. तो त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखवला.

भारतीय जनता पक्षातील कथित अंतर्गत कलहाचा परिणाम या निवडणुकांमध्ये दिसून आला नाही. सर्वांनी संघटित होऊन जोमाने प्रचार केला. निवडणुकीत योगी यांनी पाच दिवसांमध्ये १५ सभा घेतल्या, यावरून याचा अंदाज लावता येतो. योगी सरकारने नऊ जागांवर ३० मंत्र्यांची टीम तयार केली होती. उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनीही सर्व नऊ जागांवर प्रत्येकी एका निवडणूक सभेला संबोधित केले. त्यांचा संपूर्ण जोर फुलपूर आणि माळवण या जागांवर होता. उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनीही नऊ जागांवर प्रत्येकी एक सभा घेतली. दुसरीकडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक यावेळी पूर्ण ताकदीने भाजपा उमेदवारांच्या प्रचारात उतरले होते. योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेची उत्तर प्रदेशपेक्षा महाराष्ट्रात जोरदार चर्चा झाली; परंतु तिथल्या पोटनिवडणुकीत या घोषणेची अजिबात आवश्यकता नव्हती. असे असताना समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी या घोषणेला जीवदान दिले आणि त्यांच्या पक्षाने या घोषणेबाजीला थट्टा मानून खिल्ली उडवली. हे केवळ आपल्या मूळ मतदारांना खूश करण्यासाठी केले गेले; परंतु त्याचा उलटा परिणाम झाला. दुसरीकडे, योगी आदित्यनाथ यांनी कायदा आणि सुव्यवस्था तसेच बेरोजगारीवर लक्ष केंद्रित केले. योगी यांनी कोणत्याही टीकेला न जुमानता बुलडोझर चालवून न्याय मिळवून देण्यावर भर दिला. त्यांची ही शैली लोकांना आवडते.

लोकसभा निवडणुकीत अखिलेश यांचा 'पीडीए'चा फॉर्म्युला कामी आल्याचे बोलले जात होते. त्यामुळे ही लढतही अखिलेश यांच्या या फॉर्म्युल्यावर होती.



भाजपाच्या 'ओबीसी फर्स्ट' फॉर्म्युल्यावर ते तुटून पडताना दिसत होते. पोटनिवडणुकीत 'पीडीए'चा फॉर्म्युला यशस्वी झाला असता, तर २०२७ पर्यंत तोच पुढे नेला असता; पण आता भाजपा आपला 'ओबीसी फर्स्ट' फॉर्म्युला पुढे नेणार आहे. या विधानसभा पोटनिवडणुकीत नऊ जागांवर ९० उमेदवारांमध्ये स्पर्धा होती. सर्व नऊ जागांवर भाजपा-सपा आणि बसपा यांच्यात तिरंगी लढत झाली; मात्र थेट लढत भाजपा आणि सपामध्येच झाली. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत या नऊ जागांपैकी समाजवादी पक्षाकडे चार जागा होत्या, तर 'एनडीए'कडे पाच जागा होत्या. त्यात भाजपाकडे तीन तर मित्रपक्षांना दोन जागा होत्या. या पोटनिवडणुकांमध्ये अखिलेश यांनी मुस्लिम कार्ड खेळले, तर भाजपाने ओबीसींवर डाव लावला. भाजपाने सर्वाधिक पाच ओबीसी, एक दलित आणि तीन सवर्ण दिले. भाजपाने कोणत्याही मुस्लिम व्यक्तीला तिकीट दिले नव्हते, तर समाजवादी पक्षाने चार मुस्लिम उमेदवार उभे केले आहेत. याशिवाय तीन ओबीसी उमेदवार, दोन दलित उमेदवार दिले; परंतु एकाही सवर्णाला तिकीट दिले नाही. यामुळे समाजवादी पक्ष मुस्लिमसमर्थक असल्याचा संदेश गेला. ओबीसी जातींच्या जनगणनेबाबत जिथे विरोधक भाजपाला कोंडीत पकडत आहेत, तिथे भाजपाने ओबीसींच्या मुद्द्यावरच बाजी मारली.

उत्तर प्रदेशमधील लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांमध्ये, विशेषत: काँग्रेस आणि समाजवादी पक्षांमध्ये ज्या प्रकारची एकजूट दिसली, ती यावेळी नव्हती. पोटनिवडणूक आपण एकट्याच्याच जीवावर जिंकू, असा विश्वास अखिलेश यांना होता. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसला अधिक संधी दिल्यास एक दिवस तो पक्ष आपल्याला खाऊन टाकेल, असे अखिलेश यांना वाटत असावे. उद्याची चिंता करून अखिलेश यांनी वर्तमानही खराब केले. लोकसभा निवडणुकीत रायबरेली, अमेठी आणि इतर लोकसभा जागांवर काँग्रेसला मिळालेली बंपर मते ही केवळ समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यामुळे मिळाली नसल्याचा पुरावा आहे. काँग्रेसनेही या लढाईत राहावे अशी जनतेची इच्छा होती. उत्तर प्रदेशमध्ये अनेक जण काँग्रेसकडे भाजपाला पर्याय म्हणून पाहतात. समाजवादी पक्षाने काँग्रेसला बरोबर घेतले असते, तर वेगळे चित्र दिसले असते. भाजपाने सोबत घेऊन मोठ्या भावाची भूमिका निभावली; पण अखिलेश यांनी मनाचा असा मोठेपणा दाखवला नाही. कुंदरकीच्या जागेवर तर भाजपाने आपला ३१ वर्षे जुना विक्रम मोडला. भाजपाने ही जागा १९९३ मध्ये जिंकली होती. खरे तर मुरादाबाद जिल्ह्यात येणाऱ्या या जागेवर ६० टक्क्यांहून अधिक मुस्लिम मतदार आहेत. या जागेवर भाजपाचे उमेदवार रामवीर सिंह ठाकूर आणि समाजवादी पक्षाचे उमेदवार हाजी रिझवान यांच्यात चुरशीची लढत व्हायला हवी होती; मात्र आश्चर्याची बाब म्हणजे या समाजवादी पक्षाच्या उमेदवाराने मोठ्या फरकाने ही जागा गमावली. ही जागा समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला मानली जात होती.

भाजपा सरकारमध्ये आठ वर्षांपासून सक्रिय कार्यकर्ता असलेले आणि जनतेला सर्वतोपरी मदत करणारे भाजपचे रामवीर सिंह ठाकूर यांना मुस्लिम समाजातील लोकांचाही पाठिंबा मिळाला. त्यांचे कुटुंब मुस्लिमांमध्ये खूप लोकप्रिय होते. यापूर्वी मुस्लिम समाजातील नेत्यांनी भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढवली; परंतु त्यांना या समाजाने नाकारले. या मतदारसंघात मुस्लिम मतांची विभागणी झाली. एकूण १२ उमेदवार होते. रामवीर सिंह वगळता सर्व मुस्लिम होते; परंतु मुस्लिम जनतेने त्यांच्यापैकी कोणालाच नेता म्हणून स्वीकारले नाही. या मतदारसंघामध्ये मुस्लिम जनताच अल्लाची शपथ घेऊन भाजपाला मत देण्याचे वचन घेत होती. तुर्किक मुस्लिम विरुद्ध राजपूत मुस्लिम मतांचा उपयोग करण्यासाठी भाजपाने त्यांच्या उमेदवारीचा डाव खेळला होता. येथील बासित अली हा नेता मुस्लिम राजपूत आहे. त्याने ठाकूर रामवीर सिंह यांना आपला भाऊ संबोधून मुस्लिम मते मिळवली. मुरादाबादमध्ये भाजपाच्या एका कार्यकर्त्याच्या मृत्यूनंतर मोठ्या मशिदीच्या इमामाने अन्त्यसंस्कार करण्यास नकार दिला. कारण मृताचे कुटुंब भाजपासमर्थक होते. एवढेच नाही तर, आजूबाजूच्या लोकांनीही या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकला होता. मृताच्या मुलाने जिल्हाधिकारी कार्यालय गाठून तक्रार दिली होती. मृताच्या तक्रारीवरून इमामासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात समाजवादी पक्षाच्या नेत्यांवर या कुटुंबाला धमकावल्याचा आरोपही करण्यात आला होता. याचा उलट परिणाम झाला आणि समाजवादी पक्षाच्या विरोधात अनेक लोकांचा मोर्चा निघाला. समाजवादी पक्षाने कुत्र्याच्या गळ्यात पट्टा बांधला, तरी कुंडरकी जागा जिंकू, अशी घोषणा केली होती. रामवीर सिंह यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याचा फायदा भाजपाला झाला. अशा प्रकारे भाजपाने ताज्या पोटनिवडणुकीमध्ये उत्तर प्रदेशमध्ये केवळ लक्षवेधी जागाच जिंकल्या नाहीत, तर गमावलेली प्रतिष्ठाही कमावली आहे.

## रविवारची पत्रे

### पर्थला भारतीय संघाचे कांगारूमर्दन

पर्थच्या ऑप्टस मैदानावर झालेल्या बॉर्डर-गावस्कर चषकाच्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाने बलाढ्य कांगारूंना तब्बल २९५ धावांनी मात दिली आहे. पहिल्या डावात दीडशे धावांमध्ये गारद होणाऱ्या भारतीय संघाने जणू काही 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा गांभीर्याने घेत सामन्यात पुनरागमन करत कांगारूंना काबूत केले. कांगारू संघाची मदार त्यांच्या पोलादी फलंदाजीत होती. शिवाय त्यांच्या दिमतीला स्टार्क, कमिन्स, हेजलवूड हे वेगवान त्रिकूट होते. मात्र भारतीय फलंदाजांनी ऑसींच्या 'पेस है तो सेफ है'चा नारा हाणून पाडत आपल्या संघात मालिकेत बढत मिळवून दिली.

खरे तर पर्थची खेळपट्टी फलंदाजांसाठी एक दु:स्वप्न होते. वेगवान गोलंदाजांचे चेंडू जणूकाही गरम तव्यावरील पॉपकॉर्नसारखे उडत होते. त्यातच सलामीला रोहित शर्मा नसल्याने, भारतीय फलंदाजी 'निराधार योजने'सारखी वाटत होती. क्रमवारीत यशस्वी जयस्वाल, राहुल, विराट, पंत, वॉशिंग्टन सुंदर, रेड्डी असले तरी ऑसींच्या पेस बॅटरीपुढे ते कितपत तग धरतील हा प्रश्नच होता. याच प्रश्नाचे उत्तर आपल्याला पहिल्या डावात मिळाले. उण्यापुऱ्या पन्नास षटकांत, दीडशेत भारतीय संघाचा बट्याबोळ होऊन सामन्याचे रूझान पहिल्याच दिवशी येऊ लागले होते. प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर पर्थला एक्झिट पोल घेतले असते तर भारतीय संघाच्या दारुण पराभवावर प्रेक्षकांनी शिक्कामोर्तब केले असते. भारतीय संघाची नजर त्यांचा हुकमाचा एक्का बुमराहवर होती. त्यानेही ऑल आईज ऑन बुमराहच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. एकहाती सत्ता द्या मी बदल घडवतोप्रमाणे बुमराहने एक हाती बॉल दिल्यावर पर्थला सत्तांतर घडवून आणले. अख्खा कांगारू संघ बुमरो बुमरो शाम रंग बुमरोच्या तालावर नाचू लागला. कधी नव्हे ते ऑस्ट्रेलियात डर का माहौल दिसू लागला होता आणि बुमराहसाठी आयसीसीने क्रिकेट संविधान बदलल्याच्या चर्चांना ऊत आले होते. जयस्वाल, राहुल, विराटच्या फलंदाजीला तळाशी येऊन नितीश रेड्डीने जो तडका दिला ते पाहता कांगारू गोलंदाजांचे हाल 'इस दिल के टुकडे हजार हुए, कोई यहां गिरा कोई वहां गिरा' असे झाले होते. कांगारूंवर बुमराची किती दहशत होती हे तिसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात पाहायला मिळाले. चौथ्या दिवशी ऑसी संघ कितपत प्रतिकार करतो याची उत्सुकता होती परंतु आपल्या वेगवान गोलंदाजांनी त्यांचे मनसुबे उधळून लावले. कांगारू संघाला डर के आगे जीत नहीं, लेकिन दर्द जरूर होता है हे कळून चुकले असेल. पर्थ आणि ऑसींचे वेगवान गोलंदाज यांचे मोहब्बतचे दुकान जयस्वाल, विराटच्या शतकी प्रहाराने बंद पाडले. गोलंदाजीत बुमराह, सिराजने अशक्यप्राय काम करून दाखवले. पाच कसोटींच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेऊन ऑसी संघावर दबाव वाढवला आहे. मात्र ऑसी संघाचा मूळ स्वभाव पाहता, त्यांना कमी लेखून चालणार नाही.

**डॉ. अनिल पावशेकर**/९८२२९३९२८७

### मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण

मुलांचे मूलभूत अधिकार म्हणजे प्रत्येक मुलाच्या जगण्यासाठी, वाढण्यासाठी, विकासासाठी आणि संरक्षणासाठी आवश्यक असणारे अधिकार. या अधिकारांचे संरक्षण हे केवळ त्यांच्या भल्यासाठीच नाही, तर देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला एक महत्त्वपूर्ण निर्णय यासंदर्भात आहे, ज्याने मुलांशी संबंधित अश्लील साहित्याच्या प्रसारावर कठोर भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणखी मजबूत झाले आहे. मुलांना त्यांचे जीवन सुरक्षित, सन्मानाने आणि सशक्तपणे जगता यावे, यासाठी काही मूलभूत अधिकार असतात. हे अधिकार कोणत्याही परिस्थितीत अबाधित राहिले पाहिजेत. संयुक्त राष्ट्र बाल अधिकार घोषणापत्र हे मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आहे. यात चार प्रमुख अधिकारांचा उल्लेख आहे-

जीवनाचा अधिकार : प्रत्येक मुलाला जीवन जगण्याचा आणि त्यांचे आरोग्य व विकासाचे संपूर्ण समर्थन मिळण्याचा हक्क आहे. संरक्षणाचा अधिकार : मुलांना शारीरिक, मानसिक आणि भावनिक शोषणापासून संरक्षित केले पाहिजे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या शोषण, हिंसा किंवा शारीरिक छळाचा सामना करावा लागू नये. विकासाचा अधिकार : मुलांना शिक्षण, आरोग्यसेवा आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व संधी मिळणे आवश्यक आहे.

सहभागाचा अधिकार : मुलांना आपल्या जीवनातील निर्णयांमध्ये सहभागी होण्याचा हक्क आहे, त्यांना आपले मत मांडता यावे आणि त्यांचे मत विचारात घेतले जावे. भारतीय संविधानातही मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचे अनेक उपाय केले गेले आहेत. याशिवाय, पोक्सो कायदा आणि माहिती तंत्रज्ञान कायदा हे मुलांच्या संरक्षणासाठी महत्त्वाचे आहेत. पोक्सो कायदा मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण देतो तर आयटी कायदा मुलांशी संबंधित अश्लील साहित्याच्या प्रसारावर कठोर निर्बंध लावतो. न्यायालयाने महत्त्वाच्या एका निकालात युक्तिवाद केला की, नवीन शब्द योग्यरीत्या व्यक्त करेल की ही केवळ अश्लील सामग्री नाही तर एका लहान मुलासोबत घडलेल्या भीषण घटनेची नोंद आहे. मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे. समाजातील जबाबदार नागरिक या नात्याने आपली भूमिका ही अशा लैंगिक कुंठित मानसिकतेला रोखण्याची असली पाहिजे. या कृतीतून समाजातील नैतिक अध:पतनाची उंचीही दिसून येते. इंटरनेटवर अश्लील साहित्याची विपुलता पाहता किशोरवयीन मुलांचे प्रबोधन करून त्यांना प्रौढ आणि जबाबदार नागरिक बनवण्यासाठीही प्रयत्न व्हायला हवेत. मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण हे कोणत्याही समाजाचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य आहे.

सरकार, समाज, पालक, शिक्षक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या यांच्यात सामूहिक प्रयत्नांनीच मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण होऊ शकते. बालकांना सुरक्षित, सन्माननीय आणि सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण देणे हे समाजाचे कर्तव्य आहे, ज्यामुळे ते सक्षम आणि सशक्त नागरिक होऊ शकतील.

**विकास मेश्राम**/७८७५५९२८००

### पाकिस्तानची हेकडी कायम

भारताचे कार्यक्षम व तडफदार परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर १५ व १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या एससीओ बैठकीच्या निमित्ताने पाकिस्तानला जाऊन आले. त्यांच्या या बैठकीचे कवित्व पाकिस्तानी माध्यमांमध्ये दीर्घकाळ गायिले जाईल, असे दिसते. चिनी पंतप्रधान या बैठकीला उपस्थित असतानाही त्या देशातील मुख्य धारेतील माध्यमे व सोशल माध्यमांचे लक्ष डॉ. जयशंकर यांच्यावरच केंद्रित झाले होते. डॉ. जयशंकर यांचा प्रत्येक भाव व त्यांची कृती याचे बारीक अवलोकन करीत त्यातून अर्थ काढण्याचे प्रयत्न झाले. डॉ. जयशंकर पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना भेटायला जात असताना आपले परराष्ट्रमंत्री त्यांच्यापासून पाच-सहा पावले दूर असतानाच शरीफ यांनी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला होता, ही बाब सूचक ठरते. या कृतीतून पाकिस्तानची अगतिकताच दिसून येते. परराष्ट्रमंत्र्यांनी त्यांच्या २४ तासांच्या इस्लामाबाद भेटीदरम्यान ते सभ्य भारतीय संस्कृतीचे पाईक आहेत, हे पदोपदी कृतीने दाखवून दिले. पाकिस्तान वरकरणी जरी भारताबाबत मित्रत्वाचा हात पुढे करण्याचा देखावा करीत असला, तरी नेहमीप्रमाणे त्यांचा अंत:स्थ हेतू वेगळा आहे, हे लपून राहात नाही. त्यांची अर्थव्यवस्था सध्या गाळात गेली आहे. गोवा येथे झालेल्या बैठकीला त्यावेळचे पाकिस्तानी परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो भारतात आले होते. विमानतळावर त्यांचे स्वागत आपल्या परराष्ट्र खात्यातील अधिकाऱ्याने केले होते. याला प्रत्युत्तर म्हणून डॉ. जयशंकर यांचे इस्लामाबाद विमानतळावर स्वागत त्यांच्या परराष्ट्र मंत्रालयातील अधिकाऱ्याने केले. भारताने गोवा बैठकीसाठी १३ पाकिस्तानी पत्रकारांना व्हिसा प्रदान केला होता. पाकिस्तानने इस्लामाबाद बैठकीसाठी १३ च भारतीय पत्रकारांना व्हिसा दिला. या कृतीमधून त्यांच्या जनतेला ते संदेश देऊ इच्छितात की, ते भारतासोबत बरोबरी करू शकतात. आज पाकिस्तानला भारताची गरज आहे. आपल्याला त्यांची अजिबात गरज नाही. असे असतानाही तो देश त्यांच्या परंपरागत ठोशास ठोसा या मानसिकतेतून बाहेर पडू शकत नाही. यातून त्यांची हेकडी अजूनही कायम असल्याचे दिसून येते.

**सतीश भा. मराठे**/९४२२४७७६६८

### मराठी आणि महाराष्ट्र

महाराष्ट्राची सुरुवात जरी मरहट्टी बोलीभाषेपासून झाली, तरी महाराष्ट्राचा प्रवास हा खूप मोठा आहे. मग ती मरहट्टी असो, मऱ्हाट्टी असो किंवा आता आपण बोलणारी मराठी; आपल्या लक्षात येतं की, आपण महाराष्ट्रातील मराठी माणसं आहोत. भाषा ही संवाद साधण्याचं, इतरांशी साद घालण्याचं, बोलण्याचं, लाड व्यक्त करण्याचं, राग व्यक्त करण्याचं माध्यम आहे. शुद्ध भाषेतच बोलायला हवं, असं म्हणणारी बरीच माणसं भेटतात. मात्र शुद्ध भाषा, अशुद्ध भाषा अशी कुठलीही संकल्पना नाही. आपल्या घरातून वडिलोपार्जित वारसा असलेली, आईकडून ऐकलेली, शिकलेली भाषा म्हणजेच प्रमाण भाषा आहे. आपण अशा देशाचे वासी आहोत ज्या देशात दर एका कोसावर पाणी आणि वाणी बदलताना दिसून येते. आपले मराठी लोकं तसे कणखर, रुबाबदार पण सोबतच साधे-भोळे आणि मोठ्या मनाचे आहेत. कदाचित त्यामुळेच आपल्या या मराठी राष्ट्राला 'महा' हा उपसर्ग दिला गेलेला असेल. आपल्याकडे पुस्तकीय मराठी भाषा बोलणारे लोक असले, तरी प्रत्येकाला आपल्या मायबोलीवर तितकेच प्रेम आहे, जितके मराठी असण्याचं. यामध्ये विठुरायापासून शिवरायांपर्यंत आपल्या थोर लेखकांनी खूप महिमामंडन केलं आहे. ज्ञानोबारायांची 'ज्ञानेश्वरी' ही मराठीचा पाया आहे. मराठी भाषा ही जगाच्या पाठीवर एकमेव सर्वांत समृद्ध असलेली भाषा आहे, असं स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटलं आहे. भाषा ही त्या त्या प्रदेशाची जननी असते. माझ्या विचारात आईशिवाय जीवन नाही. भाषा ही आपल्या आईप्रमाणेच. आपल्या भाषेवर प्रेम करणारी व्यक्ती ही सहजपणे जगातल्या कुठल्याही भाषेवर प्रेम करू शकते, असं पुलं म्हणतात. व्यवहार, संवाद हा आपल्या भाषेतूनच झाला पाहिजे. आपण आपल्या भाषेला योग्य तो न्याय देऊन तिला टिकवू शकतो. यामुळे आपण आपल्या प्रादेशिक अस्मितेला मोठेपणा मिळवून देतो. भाषा टिकली की संस्कृती टिकते, भाषा टिकली की व्यक्तीमधलं व्यक्तित्व टिकते, भाषा टिकली की राज्य टिकतं आणि राज्य टिकलं तर देश टिकतो. महाराष्ट्र केवळ भाषेवरूनच ओळखला जातो, असं मुळीच नाही. महाराष्ट्र ही एक जिवंत भूमी आहे; जी देशाला आर्थिक आणि आध्यात्मिक ऊब देत देशाचं नेतृत्व करत राहील आणि उंचच उंच झेप घेत राहील.

**समिरण वानखेडे**/८३०८००६९३९

### दुसऱ्या धवल क्रांतीची गरज

भारत हा जगातील अग्रणी दूध उत्पादक देश आहे. व्यवसायाचा अधिक विस्तार व्हावा व शेतकरी आर्थिक स्वावलंबी बनावा हा उद्देश ठेवून देशात पाच दशकांपूर्वी इंडियन मिल्क मॅन डॉ. वर्गीस कुरियन यांच्या माध्यमातून धवल क्रांती झाली होती. पुनश्च हीच गरज लक्षात घेता देशाचे गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शाह यांनी धवल क्रांती २.० ची घोषणा नुकतीच केली. पहिल्या धवल क्रांतीची सुरुवात १९७० ला झाली होती. त्याला 'ऑपरेशन फ्लड' म्हणतात. तीन टप्प्यांतील धवल क्रांती १९९६ पर्यंत चालली. याची सुरुवात भारतीय राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने सुरू केली. डॉ. कुरियन यांनी दूध उत्पादन क्षेत्रात सहकार चळवळीचा प्रयोग केला आणि याच्या सकारात्मक परिणामाने दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. अवघ्या चार दशकांत भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादक करणारा देश बनला. त्यांच्या नेतृत्वातच म्हशीच्या दुधाची भुकटी तयार करण्याची किमया साधली. यामुळे देशात दूध प्रक्रिया क्षेत्रात क्रांती झाली. दरम्यान, २०२१ ला नव्यानेच केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापन झाले. सहकार मंत्रालयानुसार देशातील एकूण जिल्ह्यांपैकी ७० टक्के जिल्ह्यांमध्ये दूध सहकारी संस्था आहेत. त्यांची संख्या सुमारे १.७० लाख आहे. या संस्था दोन लाख गावांपर्यंत पोहोचल्या असून, २२ टक्के एवढे घरगुती उत्पादनाचे प्रमाण आहे. या संस्था देशातील एकूण दूध उत्पादनाच्या १० टक्के दूध खरेदी करतात. बाजारात विकता येईल यासाठी त्यांच्याकडे अधिकचे उत्पादन सुमारे १६ टक्के आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाने येत्या पाच वर्षांमध्ये ५६ हजार नवीन बहुउद्देशीय दूध सहकारी सोसायटी स्थापन करण्यासाठी कृती आराखडा आखलेला आहे. ग्रामीण भागात अस्तित्वात असलेल्या ४६ हजार दूध सोसायट्यांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा देऊन सक्षम करण्याची धोरण 'धवल क्रांती २.०' मध्ये असल्याचे सांगितले आहे. 'धवलक्रांती २.०'ची कल्पना सहकारी सोसायट्यांना केंद्रस्थानी ठेवणारी आहे. केंद्र सरकारच्या एका आकडेवारीनुसार २०२३-२४ मध्ये दूध सहकारी सोसायटीच्या माध्यमातून ६५० लाख किलो प्रतिदिन इतक्या दुधाची खरेदी झाली. यापुढे सरकारने २०२८-२९ पर्यंत प्रतिदिन १००७ लाख किलो इतक्या खरेदीचे लक्ष्य ठेवले आहे. आता या माध्यमातून येत्या पाच वर्षांत दूध खरेदी ५० टक्क्यांनी वाढेल. ज्या दूध उत्पादकांना सध्या बाजारात विक्रीची सोय उपलब्ध नाहीये अशांना तशी सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे तसेच संघटित क्षेत्रातील दूध सहकारी सोसायट्यांचा हिस्सा वाढविण्यात येणार आहे. दूध उत्पादन हा शेतकऱ्यांचा प्रमुख जोड व्यवसाय आहे, याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होईल. देशातील नागरिकांची दुधाची व दूध उत्पादन गरजेची पूर्तता होण्यास हातभार लागेल म्हणून दुसऱ्या धवल क्रांतीची आज आद्य गरज वाटते.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

### शत्रू-मित्र ओळखायला शिका!

सनातन भारतीय जनमानस कमालीचं सहनशील आणि क्षमाशील आहे. त्याला स्वबोध, मित्रबोध आणि शत्रुबोध लवकर होत नाही. ते स्वत:पेक्षा इतरांवर आणि घरच्यांपेक्षा बाहेरच्यांवर अधिक विश्वास टाकते. एवढ्या तेवढ्या कारणावरून ऊठसूट स्वकीयांच्या अंगावर धावून जाणारे सनातन भारतीय जनमानस परकीयांसमोर मात्र नांगी टाकते. स्वकीयांशी निर्माण केलेलं शत्रुत्व दीर्घकाळ सोडत नाही; मात्र परकीयांशी फार काळ शत्रुत्व ठेवत नाही. खरं-खोटं शरण येणाऱ्या परकीयांना तत्काळ क्षमादान देते; मात्र स्वकीयांना क्षमादान देताना कमालीचं आढेवेढे घेते. पृथ्वीराज चौहान यांनी मुहम्मद घोरीला पुन:पुन्हा अपात्री क्षमादान दिलं, जयचंद राठोडला स्वकीय पृथ्वीराज चौहानपेक्षा परकीय मुहम्मद घोरी जवळचा वाटला. त्याऐवजी पृथ्वीराज चौहान आणि जयचंद राठोड यांनी एकमेकांना समजून घेऊन सत्पात्री क्षमादान दिलं-घेतलं असतं तर विदेशी-विधर्मी मुहम्मद घोरीच्या तंगड्या गळ्यात अडकवून घ्यायची गरजच भासली नसती आणि पुढचा सगळा अनर्थ टळला असता वस्तुत: 'अपात्री क्षमादान' हे मुळी सनातनत्व नव्हे! श्रीकृष्ण, श्रीराम यांचे प्रत्यक्ष वर्तन हे खरे सनातनत्व! अन्यथा कंसवध, बालीवध झाले असते का? जयद्रथ शिरच्छेद झाला असता का? अधर्मीयांकडून लढत असलेल्या महारथी कर्णाला श्रीकृष्णाने अपात्री क्षमादान देवविलं असतं तर गांडीवधारी अर्जुन धर्मयुद्ध जिंकू शकला असता का? कधी श्रीराम व्हायचं आणि कधी श्रीकृष्ण व्हायचं याचं भान कायम ठेवलं पाहिजे. अपात्री क्षमादान आणि सद्गुण विकृती हे मध्यंतरी केव्हातरी अहिंसा तत्त्व बोकाळल्यानंतर आले असावेत. अपात्री क्षमादान ही सद्गुण विकृती नेहमीच घातक ठरत आली आहे, तरीही सनातन भारतीय जनमानस त्यातून अजूनही पूर्णपणे बाहेर येऊ शकलेलं नाही. आता तरी सावध व्हा अमृतपुत्रांनो! आधी स्वत:ला ओळखा, पारखा आणि सिद्ध करा. मग शत्रू आणि मित्र ओळखायला, पारखायला शिका.

**सोमनाथ देशमाने**/९४२१६३६२९१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# २७ उमेदवारांना ईव्हीएमबद्दल दाट संशय

## • फेर मतमोजणी आणि व्हीव्हीपॅट पडताळणीसाठी अर्ज

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.३० नोव्हेंबर:**

विधानसभा निवडणुकीत दारुण व नामुष्कीजन्य पराभवाला सामोरे जावे लागलेल्या महाविकास आघाडीने अपयशाचे खापर ईव्हीएम मशीनवर फोडत आहेत. त्यापैकी २७ उमेदवारांनी फेरमतमोजणी व व्हीव्हीपॅट मोजणीसाठी आग्रह धरला आहे. विशेष म्हणजे महायुतीच्या दोघा पराभूत उमेदवारांचाही त्यामध्ये समावेश आहे.




विधानसभा निवडणुकीत महायुतीने २८८ पैकी तब्बल २३६ जागा जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली. तर लोकसभेत ४८ पैकी ३१ जागा जिंकणार्या महाविकास आघाडीला जेमतेम ४९ जागा मिळवता आल्या. अवघ्या ५ महिन्यात झालेल्या या आमूलाग्र परिवर्तनामुळे विरोधकांची झोप उडाली आहे. ईव्हीएम मशीन मध्ये घोटाळा केल्याने त्यांनी आपल्या मनासारखा निकाल घडवून आणल्याचा आरोप त्यांच्याकडून केला जात आहे ईव्हीएम वरील मतदान बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात ,यासाठी काँग्रेस देशपातळीवर आंदोलन उभे करणार आहे तर राज्यात जेष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांनी पुण्यात त्यासाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे असे असतानाच निवडणूक आयोगाने मतमोजणीला कोणाला अक्षय बसल्यास एकूण झालेल्या मताच्या पाच टक्के मते पुन्हा मोजणी करावयाची व व्हीव्हीपॅटद्वारे त्याची पडताळणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे त्यासाठी उमेदवाराने एका मतदान केंद्रासाठी सरासरी ४७,२०० रूपये भरावे लागत आहेत. त्यांना संशय असलेल्या मतदारसंघातील कोणत्याही पाच मतदान केंद्राच्या ठिकाणी ते हे मोजणीचा आग्रह करू शकतात त्यासाठी आतापर्यंत एकूण २६ पराभूत उमेदवारांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे फेर मतमोजणी व पडताळणीसाठी अर्ज केले आहेत.

त्यामध्ये जामखेड कर्जत येथे शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांच्याकडून पराभूत झालेल्या राम शिंदे व जोगेश्वरी मतदार संघातून पराभूत झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार मनिषा वायकर यांचा समावेश आहे. त्याशिवाय फेरमतमोजणीसाठी सर्वाधिक १२ उमेदवार हे शरद पवार गटाचे आहेत.तर ६ ठाकरे गटाचे आहेत. काँग्रेस व बहुजन विकास आघाडीचे प्रत्येकी ३ उमेदवारांचा समावेश आहे.

### फेर मतमोजणीसाठी अर्ज केलेले उमेदवार असे

▸ **शरद पवार गट -** अभिषेक कळमकर, (अहमदनगर शहर), ▸ राणी लंके, (पारनेर) ▸ प्राजक्त तनपुरे (राहुरी), ▸ संदीप वर्पे (कोपरगाव), ▸ सुनील भुसारा (विक्रमगड), ▸ प्रशांत जगताप(हडपसर), ▸ अशोक पवार (शिरूर), ▸ सचिन दोडके (खडकवासला) राहुल कलाटे (चिंचवड), ▸ चरण वाघमारे (तुमसर) ▸ फहाद अहमद, (अणुशक्तीनगर) ▸ राहुल मोटे,(धाराशिव) महेश कोठे (सोलापूर शहर उत्तर) ▸ **ठाकरे गट:** केदार दिघे, (कोपरी पाचपाखाडी), ▸ राजन विचारे( ठाणे शहर), ▸ नरेश मनेरा (ओवळा माजीवाडा) दीपेश म्हात्रे (डोंबिवली) ▸ एम. के. मडवी (ऐरोली) ▸ राजन साळवी (राजापूर), ▸ **काँग्रेस:** बाळासाहेब थोरात, (संगमनेर ), ▸ रमेश बागवे,(पुणे कॅम्प) ▸ नसीम खान (चांदिवली), ▸ **बविआ-** हितेंद्र ठाकूर( वसई), ▸ क्षितिज ठाकूर, (नालासोपारा) राजेश पाटील, (बोईसर) ▸ **भाजप:** राम शिंदे, (कर्जत-जामखेड ) ▸ **शिवसेना शिंदे गट:** मनिषा वायकर (जोगेश्वरी).

# बाबा सिद्दिकी हत्येप्रकरणी प्रकरणातील २६ आरोपींवर मोक्का

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३० नोव्हेंबर:**

माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी २६ आरोपींना मोक्का लावला आहे. याप्रकरणी लॉरेन्स बिश्नोईसह तीन आरोप फरारी आहेत.बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर त्यांचे पुत्र झिशान सिद्दिकी यांच्या वांद्रे इथल्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.



याप्रकरणी मुंबई गुन्हा अन्वेषण शाखेकडून तपास करण्यात येत असून आतापर्यंत नवी मुंबई पुणे देशभरातून एकूण २६ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), १०९, १२५ आणि ३(५), शस्त्रास्त्र कायद्याचे कलम ३, ५, २५ आणि २७ आणि कलम ३७ आणि १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम (एमपीए) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात संशयित मुख्य शूटर शिवकुमार गौतमचा समावेश आहे. तर शुभम लोणकर, जिशान मोहम्मद अख्तर हे आरोपी फरारी आहेत. सिद्दिकींची हत्या आणि अभिनेता सलमान खानच्या मुंबईतील घराबाहेर गोळीबार केल्याप्रकरणी तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल बिष्णोईला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे. बाबा सिद्दिकी ची सलमान खानची असलेल्या सलगी मुळेच त्यांची हत्या बिश्नोई गँग कडून करण्यात आले असल्याचे तपासातून समोर आले आहे.

काँग्रेस पक्षातून तीन वेळा आमदार आणि माजी मंत्री राहिलेले सिद्दिकी यांनी फेब्रुवारीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता. राजकीय वर्तुळात प्रसिद्ध असलेले सिद्दिकी यांचे हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांशी मैत्रीचे संबंध होते.



# मिरज रोड रेल्वे ब्रिज येथे पूर्वस्थितीत हाईट गेज बसवावेत

### अशोक कामटे संघटनेची मागणी

**सांगोला,दि.३० नोव्हेंबर-**

मिरज रोड रेल्वे ब्रिज येथे पूर्वी पूर्वस्थितीत असलेले हाईट गेज बसवावेत अशी मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मागील १० दिवसापूर्वी अज्ञात अवजड वाहनाने धडक दिल्याने येथील हाईट गेज नादुरुस्त व निकामी झाल्याने काढून टाकले आहेत. त्यामुळे सोलापूर, जत, पंढरपूर या भागातून अवजड वाहने मिरज कडे जाण्यासाठी वासूद चौकातून मिरज रोडने रेल्वे पुलाखालून जाण्याचा प्रयत्न करतात त्यांचा प्रयत्न असफल झाल्याने वाहनांची कोंडी या ब्रिज खाली सातत्याने होत आहे. त्याकरता प्रतिबंध म्हणून पूर्वस्थितीत मिरज रोडवर असलेले हाईट गेज रेल्वे इंजीनियरिंग विभाग पंढरपूर यांनी तात्काळ दुरुस्ती करून बसवावेत अशी मागणी संघटनेने रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

# आघाडीत बिघाडी; संतप्त शिवसेनेचा स्वबळाचा नारा

### ▸▸ काँग्रेसने आघाडीचा धर्म न पाळल्याने शिवसैनिक नाराज

### ▸▸ आगामी स्थानिक स्वराज्य संस्था महापालिका निवडणूका एकट्याने लढणार : शिवसेना शहरप्रमुख अजय दासरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाने महाविकास आघाडीचा धर्म पाळला नाही, काँग्रेसच्या खा.प्रणिती शिंदे यांनी अपक्ष उमेदवारास पाठींबा दिल्यामुळे आमच्या उमेदवारास पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे शिवसैनिक नाराज आसून, आगामी सर्व निवडणुकीत शिवसेना स्वबळाने लढेल असा इशारा शहर प्रमुख अजय दासरे यांनी दिला आहे.

दरम्यान, सोलापूर दक्षिण विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने पहिल्यापासूनच आघाडी धर्म पाळला नाही. काँग्रेसने शेवटच्याक्षणी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा देऊन आघाडी तोडली. त्यामुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यापूर्वीच काँग्रेसचे उमेदवार पाडा, असे आदेश दिले होते. तरीदेखील निवडणुकीच्या काळात शिवसैनिक गप्प होते. परंतु आता येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये शिवसेना स्वबळावर लढेल, असे सांगत अजय दासरी यांनी सोलापूर शहराचा अहवाल पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सुपूर्द केल्याचे स्पष्ट केले. पुढे ते म्हणाले, सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सुटला होता. या ठिकाणी आम्ही आमचा उमेदवार दिल्यानंतर, देखील काँग्रेसने आघाडीचा धर्म पाळला नाही. प्रचारामध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला नाही. उलट ऐन मतदाना दिवशी अपक्ष उमेदवार काढावी यांना पाठिंबा दिला. त्यामुळे आमच्या उमेदवाराला पराभवाला सामना करावा लागला. त्यामुळे शिवसैनिक संतप्त आणि नाराज आहेत. नाराजीचा अहवाल पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सुपूर्द केला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था महापालिका सर्व निवडणूका एकट्याने लढणार आहे.





# शिवसेना महिला आघाडीतर्फे आ. कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा शिवसेना शहर महिला आघाडी व अक्कलकोट तालुका कामगार सेना यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. शिवसेना शहर महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई हावनूर व कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे शिवसेना शहर महिला आघाडी शहर उपप्रमुख वर्षाताई मेत्रे माहिती अधिकार अक्कलकोट शहराध्यक्ष समर्थ बिराजदार माहिती अधिकार अक्कलकोट शहर संघटक संदीप राचेटी व ओम हावनुर आदी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यातील सातही पोलिस उपविभागीय कार्यालयात होणार पिंक रुम

### पंढरपुरात होणाऱ्या १०४ रूमचे पोलिस संकुलास ११ कोटींचा निधी मंजूर : पोलिस अधिक्षक कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर -**

सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी पदभार घेतल्यानंतर जिल्ह्यातील पोलिस दलामध्ये अभिनव कल्पना राबवत आहेत. विनयभंग, दुष्कर्मच्या पीडित अल्पवयीन मुलीसाठी पोलिस उपविभागीय कार्यालयात पिंक रूम साकारण्यात येणार असून याच्या माध्यमातून पिडीत मुलीशी संवाद साधता येईल, तसेच समुपदेशन करता येईल. यामुळे तणावमुक्त वातावरणात मुलींशी संवाद साधता येईल, अशी आशा पोलिस प्रशासनाला असून लवकरच जिल्ह्यातील सातही पोलिस उपविभागीय कार्यालयात ह्या पिंक रूम तयार करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

अल्पवयीन मुलींवर दुष्कर्म किंवा विनयभंग सारख्या घटना घडतात. त्या मुली घाबरलेल्या स्थितीत व मनस्थिती बिघडलेली असते. त्याच्याकडून तक्रार घेताना माहिती सविस्तर मिळावी. त्यांच्यावर कोणताही दबाव येऊ नये यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात पिंक रूमची संकल्पना राबवण्यात येणार आहे. त्याची प्रत्यक्षात सुरुवात पोलिस अधीक्षक कार्यालयांतर्गत सात उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयात होईल. कालांतराने प्रत्येक पोलिस ठाण्यात पिंक रूमची उभारणी केली जाणार आहे. पिंक रूममध्ये कार्टूनपासून ते विविध प्राणी पक्षी यांच्या चित्रकृती असतील. अन्यायग्रस्त मुली सर्व खुल्या मनाने व कोणताही दबाव न घेता पोलिसांना माहिती देतील असे वातावरण असेल. या दृष्टीने त्याची उभारणी होईल.

पिंक रूमची संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी जिल्हा नियोजनकडून निधी उपलब्ध होणार आहे. सध्या राज्यात चंद्रपूर व धाराशिवमध्ये या पिंक रूमची संकल्पना राबवली जात आहे. तसेच पंढरपूर येथे पोलिसांना राहण्यासाठी संकुलाची उभारणी होणार आहे. त्यासाठी ११ कोटीचा निधी मंजूर झाला आहे. त्यानुसार १०४ रूमचे क्वार्टर्स उभारले जाणार आहे. त्याचे टेंडर निघाले आहे. दोन वर्षात त्याचे काम पूर्ण होणार आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यात पायाभूत सुविधा देण्यावर भर असेल.



पोलिस अधिक्षक कुलकर्णी हे पर्यावरण प्रेमी असून त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाणे ग्रीन कॅम्पस करण्याचा निर्धार केला आहे. सध्या प्रत्येक पोलिस ठाण्यातील इमारती दुरुस्ती व इतर कामे करण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये पाच पोलिस ठाण्याच्या इमारती तयार झालेल्या आहेत. उर्वरीत इमारतीही नवीन केल्या जाणार आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्यात पायाभूत सुविधा प्रदान करण्यावर भर देण्यात आलेला आहे. पोलिस ठाण्याचा कॅम्पस ग्रीन करण्यावर भर असणार असल्याचेही कुलकर्णी यांनी सांगितले. जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेतीच्या बांधावरून किंवा वाटणीवरून तंटे होण्याचे प्रमाण जास्त आहे. हा वाटणीचा वाद मिटवण्यासाठी लवकरच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून महसुल व पोलिस प्रशासन मिळून शेतकरी प्रेरणा अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचा सर्व व माहिती गोळा करण्यासाठी टीम तयार केली जाणार आहे. यातूनही शेतकऱ्यांमधील वाद मिटू शकतील असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

# दीड लाख लुटणारे तिघे आरोपी २४ तासांत गजाआड

### टेंभुर्णी पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३० नोव्हेंबर-**

मोडनिंब ते आष्टी पालखी मार्गावर रेल्वे ब्रिजखाली दोन अनोळखी चोरट्यांनी मोटरसायकलवरून फिर्यादी सचिन जाधव यांना अडवून २५ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजता मोटरसायकल थांबवून त्यांच्या डोळ्यात चटणी टाकून सोन्याची चैन व दोन तोळ्याच्या चार अंगठ्या, चांदीची अंगठी असा एकूण १,६०,५०० रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीस दमदाटी करून जबरदस्तीने काढून घेतले होते. त्याबाबत त्यांनी फिर्याद दिल्याने टेंभुर्णी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत २४ तासांत तिघा आरोपींना गजाआड केले.



सदर गुन्ह्याचे तपास कामी पोलीस निरीक्षक दिपक पाटील यांनी पोलीस ठाणे कडील डिबी पथकाचे अंमलदार यांना गुन्हा उघडकिस आणण्याकरीता व गोपनीय माहिती काढण्याकरता मोडनिंब येथे पाठवले होते. त्यानुसार पोलिस अंमलदार यांनी मोडनिंब येथील फिर्यादीचा मित्र धीरज जाडकर रा. मोडनिंब यास फिर्यादीचे अंगावर नेहमी सोने असते व तो रात्रीचे वेळी खताचे दुकान बंद करून जात असतो अशी माहिती होती त्यामुळे त्यांनी चोरी करण्याचा प्लॅन केला होता अशी माहिती काढली होती.

त्यानुसार धीरज अशोक जाडकर याने त्याचा मित्र तुषार राजेंद्र जंगम (वय २०), स्वप्निल बाळासाहेब स्वामी (वय २४, दोघे रा. बार्शी) यांना दिनांक २५ नोव्हेंबर रोजी मोडनिंब येथे बोलावून घेऊन त्यांनी त्यांच्या मित्रांना फिर्यादी सोने काढून घेण्याबाबत सांगितले होते त्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानुसार फिर्यादी हा त्याचे खत दुकानातून मोडनिंब येथून मोटरसायकलवर निघाल्याची माहिती आरोपी धीरज अशोक जाडकर (रा. मोडनिंब) यांनी दिल्याने नमूद दोन बार्शी येथील आरोपींनी फिर्यादीचे मोटरसायकल अडवून त्यांच्या डोळ्यात चटणी टाकून लुटले होते.

पोलिसांनी तुषार राजेंद्र जंगम, स्वप्निल बाळासाहेब स्वामी, धीरज अशोक जाडकर यांच्यासह तिघांना अटक अटक करून न्या. जी. व्ही. गांधे यांच्यासमोर हजर केले असता त्यांना ३० नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी मिळाली होती. ही कामिगिरी पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे, डीबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, सपोफौ विलास रणदिवे, हवालदार विनोद साठे, विलास नलावडे, संदीप गिरमकर, पोलीस नाईक प्रवीण साठे, हवालदार गणेश जगताप, सुहास देवकर, असिफ आतार, हर्षद वाघमोडे व दप्तरी पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद अनभुले यांनी पार पाडली.

**CHANGE IN NAME**

I HERBY DECLARE THAT MY OLD NAME **PADAM AMARCHAND RAKA** HAS BEEN CHANGED TO **PADAMCHAND AMARCHAND RAKA** RESIDING AT 203 WEST MANGALWAR PETH, SOLAPUR-413002. KINDLY NOTE THE SAME.

## निधन वृत्त

### किशोर कोंपेल्ली



**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

अशोक चौक बोल्ली मंगल कार्यालय पोशम्मा मंदिर मागील प्रतिष्ठित यंत्रमाग कारखानदार किशोर राजपापय्या कोंपेल्ली (वय ६०) यांचे शनिवार ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोड येथील पद्मशाली स्मशानभूमी येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुले, विवाहित मुलगी, सूना व नातवंडे असा परिवार आहे.

### सुनील मोकाशे



**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी सुनील प्रकाश मोकाशे (वय ६०) यांचे २९ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन अविवाहीत मुले आहे. सोलापूर जिल्हा गुरव समाज अध्यक्ष प्रकाश मोकाशे यांचे ते कनिष्ठ बंधू होत.




# जिल्ह्यातील प्रत्येक गोष्टीचे मार्केटिंग करावे: आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

चिंचणी मॉडेल गाव आहे. प्रत्येक गावाचे वैशिष्ट्य ओळखा, गावाची ओळख निर्माण करा, सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक गोष्टीचे मार्केटिंग करावे, प्रत्येक गावात काही तरी वेगळेपण आहे त्याला पुढे आणा, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र येथे सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून स्नेहसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी आ. देशमुख बोलत होते. यावेळी जिल्हा समिती सदस्य अजित कंडरे, चिंचणी कृषी पर्यटन केंद्र प्रर्वतक मोहन अनपट आदी उपस्थित होते.

प्रस्तावना मोहन अनपट यांनी केली. यावेळी गणेश पाटील, अतुल गायकवाड, संजय गायकवाड, विलास भोसले, डॉ. श्रीधर यलमार, पांडुरंग वाघमोडे, सतीश काळे, विलास भोसले, अनंता चव्हाण, मोहन मिसाळ, सोलापूर सोशल फाउंडेशन चे पदाधिकारी व विविध गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

**Classifieds**

**पाहिजेत**
डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.
भेटण्याची वेळ:- ९-५/६
फोन नं : ७०२०१४८४२६
८६५२७५१९०२

**पाहिजेत**
अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला
संपर्क : ९८९०१४३४३२

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील मौजे मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. ३३८/२ यांसी नवीन सर्व्हे नं. ९८/१/२ पैकी यश नगर या नांवाने ओळखले जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं.२१ यांचे एकुण क्षेत्र ११४.९८ चौ.मी. अथवा १२३७.१८ चौ. फुट इतके आहे. यांसी चतुःसिमा पुर्वेसः ४.५ मी. रस्ता, पश्चिमेस : सर्व्हे नं. ९८/१ पैकी उर्वरित जागा, दक्षिणेस प्लॉट नं. २२, उत्तरेस प्लॉट नं. २० येणेप्रमाणे वर नमुद केलेली प्लॉटजागा व त्यातील तदंगभुत वस्तुसह. ही मिळकत श्री. यशवंत सखाराम माने यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिल अलका सुधाकर भालेकर यांना विक्री करण्याचे मान्य व कबुल करुन इसारापोटी रक्कम स्विकारुन इसारापावती लिहून दिलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत आम्हांस खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत. मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली ता.३०/११/२०२४.

सही
ॲड. आकाश संजय माने
ए-३/१४५, मंत्री चंडक पार्क, विजापूर रोड,
सोलापूर, मो. नं. ९८२२७४७२५७
अशिलातर्फे ॲडव्होकेट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### निहाल सरीनने जिंकला प्रेसिडेंट बुद्धिबळ चषक




**ताश्कंद** : उझबेकिस्तानमधील ताश्कंद येथे भारतीय ग्रॅण्ड मास्टर निहाल सरीनने काळ्या सोंगट्यानिशी खेळत नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह विरुद्धचा डाव बरोबरीत राखून प्रेसिडेंट बुद्धिबळ चषक जिंकला. निहालने नऊ फेऱ्या खेळून ७.५ गुणांसह स्पर्धेच शेवट केला, तर स्थानिक खेळाडू अब्दुसत्तोरोव्हच्या संधींना अंतिम फेरीच्या ड्रॉमुळे मोठा धक्का बसला. उझबेकिस्तानचा नोदिरबेक ६.५ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिला. आणखी एक स्थानिक खेळाडू जावोखिर सिंदारोव ७ गुणांसह दुसरे, तर इराणच्या परहम मगसूदलूने ७ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. इतर भारतीयांमध्ये आंतरराष्ट्रीय मास्टर नीलाश साहा (आठव्या, ६ गुण) आणि ग्रॅण्डमास्टर कार्तिकेयन मुरली (नवव्या, ६ गुण) यांचा समावेश आहे.

### बंगळुरू एफसी ओडिशावर मात करण्यास उत्सुक

**भुवनेश्वर** : इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेत रविवारी येथील कलिंगा स्टेडियमवर बंगळुरू एफसी आणि ओडिशा एफसी यांच्यादरम्यान सामना होणार आहे. आपल्या प्रभावी अष्टपैलू फॉर्ममुळे गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या बंगळुरू एफसीचे रविवारी ओडिशा एफसीचा 'गड' मोडण्याचे लक्ष्य असेल. आयएसएल मोहीम सुरू झाली तेव्हापासून बंगळुरू एफसी फिरत आहे. संपूर्ण संघ एका सुसज्ज संघाप्रमाणे एकजुटीने खेळत आहे आणि म्हणूनच ते या वर्षी हळूहळू होम-अवे सामने विचारात घेत नाहीत व सर्व ठिकाणी यशस्वी होत आहेत. ओडिशा एफसीने या हंगामात आपल्या चारपैकी दोन सामने जिंकले आहेत आणि त्यांनी पहिल्या चार अवे सामन्यातही उत्तम कामगिरी केली आहे. सहा विजय व दोन अनिर्णितांसह बंगळुरू संघ अव्वल स्थानावर आहे. ओडिशाने आपल्या शेवटच्या मैदानात मोहम्मडन एससीचा २-१ असा पराभव केला. ओडिशा एफसी तीन विजय आणि तीन अनिर्णीतासह सहाव्या स्थानावर आहे. ओडिशा एफसीला रविवारी घरच्या मैदानाचा फायदा मिळण्याची आशा आहे.

### दक्षिण आफ्रिकेच्या तीन माजी क्रिकेटपटूंना अटक

**केपटाऊन** : दक्षिण आफ्रिकेतील तीन माजी क्रिकेटपटू थामी त्सोलेकिले, लोनवाबो त्सोत्सोबे आणि एथी म्बलती यांना २०१५-१६ च्या टी-२० राम स्लॅम चॅलेंजमधील मॅच फिक्सिंग प्रकरणाच्या संदर्भात अटक करण्यात आली आहे. डीपीसीआयच्या गंभीर भ्रष्टाचार अन्वेषण विभागाच्या तपासानंतर ही अटक करण्यात आली.

### राजस्थान एफसीचा नामधारी एफसीवर ३-१ ने विजय

**लुधियाना** : राजस्थान युनायटेड एफसीने शनिवारी नामधारी स्टेडियमवर इंडिया लीग फुटबॉल २०२४-२५ स्पर्धेत जोरदार मुसंडी मारत यजमान नामधारी एफसीवर ३-१ ने विजय नोंदवला. निराशाजनक सुरुवातीनंतर नामधारीने खेळाच्या १८व्या मिनिटाला स्वतःच्या गोलद्वारे सुदैवाने आघाडी घेतली. त्यानंतर वेन वाझने राजस्थानच्या नेटमध्ये टाकला. पुढे आकाशदीप सिंगने गोल करून राजस्थानला आघाडीवर नेले. नामधारी एफसीने सामन्यातून डोके वर काढण्याचा प्रयत्न केला, परंतु राजस्थानच्या बचावफळीने त्यांचे प्रयत्न हाणून पाडले.

### साक्षी मलिक मॅराथॉनला हिरवा झेंडा दाखवणार

**मुंबई** : ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती आणि राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेती कुस्तीपटू साक्षी मलिक ८ डिसेंबर रोजी होणाऱ्या १२ व्या वसई विरार महानगरपालिका मॅराथॉन शर्यतींना झेंडा दाखवणार आहे. साक्षी ही या मॅराथॉनची सदिच्छादूत आहे. केवळ भारतीय स्पर्धकांसाठी सर्वाधिक ५८ लाख रुपयांची बक्षीस असलेल्या या स्पर्धेत देशातील काही वेगवान धावपटू सहभागी होणार आहे.

# सिंधू, तनिषा-ध्रुव अंतिम फेरीत

## सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन

◆ **लखनौ, ३० नोव्हेंबर**


येथे सुरू असलेल्या सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत शनिवारी दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूने आपली संघ मैत्रीण उन्नती हुड्डावर सरळ गेममध्ये विजय मिळवत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे.

अव्वल मानांकित सिंधूने उपांत्य सामन्यात १७ वर्षीय उन्नतीचा अवघ्या ३६ मिनिटांत २१-१२, २१-९ असा पराभव केला.

उन्नतीने सिंधूला आव्हान देण्यासाठी संघर्ष केला, पण अनेक अयोग्य चुका केल्या, त्यामुळे सिंधूला संपूर्ण सामन्यात नियंत्रण राखता आले.

आजच्या कामगिरीवर मी खूश आहे. सुरुवातीपासूनच मी आघाडी कायम ठेवली. मी केवळ काही फटके मारण्याचा प्रयत्न करत होती व एकूणच मी ज्या पद्धतीने खेळत होती मला आत्मविश्वास वाटत होता, असे सिंधूने सामन्यानंतर सांगितले.

मला वाटते की उन्नतीने आपली सर्वोत्तम खेळी केली, पण मी तिला आघाडी मिळवण्याची संधी दिली नाही. मी सुरुवातीपासून शेवटपर्यंत आघाडीवर होती. उन्नती हुड्डा ही भविष्यातील उत्तम खेळाडू आहे व माझ्याकडून तिला खूप खूप शुभेच्छा देते, असेही ती म्हणाली.




पी. व्ही. सिंधू




मिश्र दुहेरीत खेळताना तनिषा क्रास्टो व ध्रुव कपिला

माजी विश्वविजेती व सध्या जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानावर असलेल्या पी. व्ही. सिंधूचा अंतिम फेरीत थायलंडच्या ललिनरत चैवान किंवा चीनच्या वू लुओ यू यांच्याशी सामना होईल. सिंधूचे तिसऱ्यांदा सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय विजेतेपद पटकावण्याचे लक्ष्य आहे.

तत्पूर्वी, तनिष क्रास्टो व ध्रुव कपिला या भारताच्या मिश्र दुहेरीच्या जोडीने चीनच्या झी हॉंग झाऊ व जिया यी यांग या जोडीवर सरळ गेममध्ये विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

पाचव्या मानांकित भारतीय मिश्र जोडीने ४२ मिनिटांच्या उपांत्य लरढतीत २१-१६, २१-१५ असा विजय मिळवला. विजेतेपदाच्या लढतीत, त्यांची गाठ चीनच्या पिन यी लियाओ व के झिन आणि थायलंडची सहावी मानांकित जोडी देचापोल पुवारानुक्रोह व सुपिसारा पावसंप्रान यांच्यातील अन्य उपांत्य फेरीतील विजेत्याशी पडेल.

सिंधूच्या उपांत्य फेरीच्या लढतीत तिने हळूहळू नियंत्रण मिळवले. तिने अचूक क्रॉस फटक्यांसह ५-३ अशी आघाडी घेतली. (वृत्तसंस्था)

# भारतीय युवा संघाचा पाकिस्तानकडून पराभव

## १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट

◆ **दुबई, ३० नोव्हेंबर**

येथे आयोजित १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी खेळल्या गेलेल्या अ गटाच्या तिसऱ्या सामन्यात शर्थीच्या प्रयत्नानंतरही भारतीय संघाला पाकिस्तान संघाकडून ४३ धावांनी पराभव पत्करावा लागला. १४७ चेंडूंत १५९ धावांची खेळी करणारा पाकिस्तानचा शाहझेब खान सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

पाकिस्तान संघाचा कर्णधार साद बेग याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानने मर्यादित ५० षटकांत ७ बाद २८१ धावा उभारल्या आणि भारतासमोर विजयासाठी २८२ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले, परंतु भारताला ४७.१ षटकांत सर्वबाद २३८ धावांपर्यंतच मजल मारता आली.

उस्मान खान व शाहझेब खानने दमदार फलंदाजी करत पाकिस्तानच्या डावाची चांगली सुरुवात केली. शाहझेबने शतक व उस्मानने अर्धशतक झळकावत ३०.४ षटकांत १६० धावांची सलामी भागीदारी केली. फिरकीपटू आयुष म्हात्रेने उस्मान खानला निखिल कुमारकडून झेलबाद केले. उस्मानने ९४ चेंडूंत ६ चौकारांसह ६० धावा केल्या. पुढे शाहझेब खानने मुहम्मद रियाझुल्लाह (२७) इतर खेळाडूंच्या साथीने पाकिस्तानला ७ बाद २८१ धावा उभारून दिल्या. मध्यमगती वेगवान गोलंदाज नागराज समर्थने शाहझेब खानला बाद केले. शाहझेब खानने १४७ चेंडूंत १५९ धावांची खेळी केली, यात त्याने ५ चौकार व तब्बल १० षट्कार खेचलेत.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना भारताच्या युवा संघाने छोट्या-छोट्या भागीदारी करत संघाला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला, परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. पाचव्या क्रमांकावरील फलंदाज निखिल कुमारने ६७ धावांची खेळी करत चांगले प्रयत्न केले. सलामीवीर आयुष म्हात्रे (२०), किरण चोरमले (२०), हरवंश पंगालिया (२६), मोहम्मद एहसान (३०) आदिंनी चांगले प्रयत्न केले. पाकिस्तानकडून अली रझाने ३ बळी, अब्दुल सुभान व फहम उल हकने प्रत्येकी २ बळी, तर नावेद अहमद खान व उस्मान खानने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)



निखिल कुमारची अर्धशतकी खेळी व्यर्थ

# दक्षिण आफ्रिकेचा श्रीलंकेवर २३३ धावांनी विजय

## जॅनसेनचे ११ बळी

◆ **डर्बन, ३० नोव्हेंबर**

येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेवर २३३ धावांनी दणदणीत विजय मिळवला. मध्यमगती गोलंदाज मार्को जॅनसेनने पहिल्या डावात ७ बळी व दुसऱ्या डावात ४ बळी असे एकूण ११ बळी टिपण्याची किमया केली व त्याला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेसमोर विजयासाठी ५१६ धावांचे अशक्य लक्ष्य ठेवले. श्रीलंकेने ५ बाद १०३ धावांवरून आपल्या चौथ्या दिवसाची सुरुवात केली. कालचा नाबादवीर दिनेश चंडीमलने ८३ धावांची खेळी करत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. चंडीमल जेराल्ड कोएत्झीच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. त्यानंतर कर्णधार धनंजया डीसिल्व्हा (५९) व कुसल मेंडिसने (४८) संयमाने फलंदाजी केली, परंतु श्रीलंकेच्या शेवटचे तीन फलंदाज पुढच्या सहा षटकांत ११ धावांत बाद झाले.




पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी अर्धशतक पूर्ण केल्यानंतर बॅट उंचावताना श्रीलंकेचा दिनेश चंडीमल

मार्को जॅनसेनने ७३ धावांत ४ बळी टिपलेत. पहिल्या डावातील ७ बळींसह त्याने या सामन्यात ८६ धावांत ११ बळी टिपले. आपल्या १४ व्या कसोटी सामन्यात त्याने १० बळी टिपण्याची कामगिरी केली. कॅगिसो रबाडा, गेराल्ड कोएत्झी व केशव महाराजने प्रत्येकी ३ बळी टिपले. आता दुसरी आणि शेवटची कसोटी लढत गकेबरहा येथे सुरू होईल. (वृत्तसंस्था)


# गुकेशने लिरेनला बरोबरीत रोखले

## जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद

◆ **सिंगापूर, ३० नोव्हेंबर**

रिसॉर्ट्स वर्ल्ड सेंटोसा येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीत पांढऱ्या सोंगट्यानिशी खेळणाऱ्या भारताच्या डी. गुकेशने विद्यमान विश्वविजेता डिंग लिरेनविरुद्धचा डाव बरोबरीत राखला. ४० चालीनंतर उभय प्रतिस्पर्ध्यांविरुद्धचा डाव बरोबरीत सुटला. दोन्ही खेळाडूंचे आता प्रत्येकी २.५ गुण आहेत.

डिंग लिरेनने काळ्या सोंगट्यांसह फ्रेंच डिफेन्स पद्धतीची निवड केली. १२व्या चालीपर्यंत, एका जोडीची अदलाबदलही झाली. मधल्या गेममध्ये गुकेश इतर चाल खेळण्याऐवजी प्याद्यासह डिंगचा प्यादा बळकावण्याचा निर्णय घेतल्यामुळे अडचणीत आला. पण गुकेशने दीर्घ आणि कठोर विचार केला आणि बरोबरीत खेळण्यासाठी अडचणीतून मार्ग काढला. अडचणीतून सुटल्यानंतर १८ वर्षीय गुकेशने लिरेनला डाव बरोबरीत ठेवण्यास भाग पाडले.




लढत बरोबरीत सुटल्यानंतर हस्तांदोलन करताना डी. गुकेश व डिंग लिरेन

डी. गुकेश हा जगातील सर्वात तरुण जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचा आव्हानकर्ता आहे. पहिल्या पाच फेऱ्यांनंतर जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद मालिका २.५-२.५ अशी बरोबरीत आहे. (वृत्तसंस्था)

### दक्षिण आफ्रिका डब्ल्यूटीसी क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर

◆ **डर्बन, ३० नोव्हेंबर**

दक्षिण आफ्रिकेने शनिवारी किंग्समीड क्रिकेट स्टेडियमवर श्रीलंकेवर २३३ धावांनी दणदणीत विजय मिळवून जागतिक कसोटी अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धेच्या गुणतालिकेत भारतानंतर दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे.

मार्को जॅनसेनच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेला धूळ चारली. जॅनसेन दहा बळी घेणारा पहिला डावखुरा वेगवान गोलंदाज ठरला. (वृत्तसंस्था)

# भारताच्या सराव सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया

◆ **कॅनबेरा, ३० नोव्हेंबर**

शनिवारपासून मनुका ओव्हल येथे आयोजित ऑस्ट्रेलियन पंतप्रधान एकादशविरुद्धच्या भारताच्या दोन दिवसीय सराव सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे रद्द करण्यात आला.

रविवारी दिवस-रात्र गुलाबी चेंडू सामन्याच्या दुसऱ्या व अंतिम दिवशी दोन्ही संघांनी ५० षटकांचा सामना खेळण्यास मान्य केले. दुसऱ्या दिवसाचा खेळ स्थानिक वेळेनुसार दुपारी २.४० वाजता, तर भारतीय वेळेनुसार सकाळी ९.१० वाजता सुरु होणार आहे. संघांनी प्रत्येक संघाला ५० षटके खेळण्यास सहमती दर्शवली आहे, असे बीसीसीआयने सांगितले.

दौऱ्यातील भारताचा हा पहिला सराव सामना आहे. बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांची कसोटी मालिका सुरु होण्यापूर्वी कोणतेही सराव सामने न घेण्याचा निर्णय घेतला आहे. रविवारी हवामान सुधारेल अशी आशा भारताला आहे. कर्णधार रोहित शर्मा व शुभमन गिल हे दोघेही पहिल्या कसोटीला मुकले होते, त्यामुळे ते ॲडलेड येथे ६ डिसेंबरपासून खेळल्या जाणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या आधी काही सामन्यांचा सराव करू पाहत आहेत.



पावसामुळे मनुका ओव्हलच्या खेळपट्टीवर आच्छादन टाकण्यात आले

पावसाची ७० टक्के शक्यता असलेल्या रविवारी हवामानाचा अंदाज फारसा उत्साहवर्धक नाही.

ऑस्ट्रेलियन सरकारच्या हवामानशास्त्र विभागाच्या हवामान अंदाजानुसार, सकाळी व दुपारच्या वेळी पावसाची उच्च शक्यता आहे. सकाळी व दुपारच्या वेळी गडगडाटांसह वादळाची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# जोश हेझलवूड भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतून बाहेर

◆ **ॲडलेड, ३० नोव्हेंबर**

शनिवारी झालेल्या दुखापतीमुळे वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड ॲडलेड येथे ६ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या दिवस-रात्र काळातील भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळणार नाही, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने जाहीर केले. हेजलवूडची भारताविरुद्धच्या घरच्या कसोटीला मुकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

पर्थ येथील पहिल्या कसोटी सामन्यात २९५ धावांनी पराभूत झाल्यानंतर बॉर्डर-गावस्कर चषकाच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलिया ०-१ ने पिछाडीवर आहे.

हेझलवूडच्या डाव्या बाजूच्या दुखापत झाल्यामुळे त्याला या सामन्यातून बाहेर काढण्यात आले आहे. हेझलवूड उर्वरित मालिकेची तयारी करण्यासाठी ॲडलेडमधील गटात सोबत राहील, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने प्रसिद्धीमाध्यमांमध्ये म्हटले आहे.

ॲडलेड कसोटीसाठी ऑस्ट्रेलियन संघात अनकॅप्ड वेगवान गोलंदाज शॉन ॲबॉट व ब्रेंडन डॉगेटचा समावेश करण्यात आला आहे.

ॲडलेड कसोटीसाठी ॲबॉट व डॉगेटसह ब्यू वेबस्टरचाही संघात समावेश करण्यात आला आहे. मात्र, हेझलवूडच्या जागी वेगवान गोलंदाज स्कॉट बोलण्डला अंतिम एकादशमध्ये समावेश करण्याचा पर्यायसुद्धा ऑस्ट्रेलियाकडे आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय संघ आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्वचषक स्पर्धेत भाग घेणार

◆ **चेंगडू, ३० नोव्हेंबर**

भारतीय टेबल टेनिस संघ आगामी १ ते ८ डिसेंबर दरम्यान चीनमधील चेंगडू येथे दुसरी आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्वचषक २०२४ टेबल टेनिस स्पर्धेत भाग घेणार आहे. भारतीय संघाचे नेतृत्व मानुष शाह, मानव ठक्कर आणि पोयमंती बैस्या करतील. मनिका बत्रा, श्रीजा अकुला, हरमीत देसाई, शरथ कमल व जी. साथियान यांसारख्या अनुभवी खेळाडूंनी न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या जागतिक स्पर्धेत पुढील पिढीला आपली क्षमता व कौशल्य सिद्ध करण्याची संधी असेल. गत वर्षी पहिली

आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्वचषक स्पर्धासुद्धा चेंगडू येथे आयोजित करण्यात आली होती. यजमान चीन विजेता म्हणून उदयास आला, तर भारत पहिल्या टप्प्यात यशस्वी झाला नाही. या वर्षीच्या स्पर्धेत १६ देश तीन-टप्प्यांमध्ये स्पर्धा करतील. संघांना चार गटांमध्ये विभागण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियन गोलंदाज योजनेत बदल करण्याची शक्यता

## स्कॉट बोलॅण्डची माहिती

◆ **कॅनबेरा, ३० नोव्हेंबर**

पर्थ येथे झालेल्या पराभवानंतर आता आगामी ६ डिसेंबरपासून ॲडलेडमधील भारत व ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात यशस्वी जयस्वाल व केएल राहुल यांचा सामना करण्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीच्या योजनांमध्ये काही बदल केले जातील, असे स्कॉट बोलॅण्डने सांगितले. बोलॅण्ड हा जखमी जोश हेझलवूडच्या जागी खेळणार असून तो अंतिम एकादश असणार आहे.

साईड स्ट्रेनमुळे हेझलवूडला या दुसऱ्या सामन्यातून वगळण्यात आले. ३५ वर्षीय स्कॉट बोलॅण्डने २०२१ मध्ये कसोटी पदार्पण केल्यापासून १० कसोटी सामने खेळले आहेत. तो दुसऱ्यांदा आत्मविश्वासाने परिपूर्ण भारतीय फलंदाजी संघाविरुद्ध हार्ड लेन्थसवर गोलंदाजी करण्याचा प्रमुख दावेदार आहे. सुरुवातीच्या सामन्यात डावाचा प्रयत्न.

आम्ही एक संघ म्हणून सर्व वेगवेगळ्या भारतीय फलंदाजांसाठी आमच्या योजनांबद्दल बदल करण्यात आला आहोत., मात्र हे बदल तुम्हाला सांगणार नाही, परंतु आमच्याकडे खूप जबरदस्त योजना आहेत. भारतीय फलंदाज निश्चितच धास्ती घेऊ शकतात, असेही बोलॅण्ड म्हणाला.

पर्थ येथे यशस्वी जयस्वाल (१६१) व केएल राहुलने (७७) ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर विक्रमी २०१ धावांची सलामी भागीदारी केली व त्यानंतर विराट कोहलीने आपले ३० वे कसोटी शतक साजरे केले.

पर्थमध्ये यशस्वी जयस्वालने खरोखरच उत्तम फलंदाजी केली. केएल राहुलने दुसऱ्या डावातही चांगली फलंदाजी केली. या दोघांनी खरोखरच खणखणीत खेळी केली. त्यामुळे आम्ही ॲडलेड कसोटी सामन्यात आमची योजना थोडी बदलू शकतो. असे बोलॅण्डने सांगितले.

पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क व हेझलवूड हे त्रिकुट भारताच्या दुसऱ्या डावात फारसा प्रभाव पाडू शकले नाहीत, परंतु बोलॅण्डने तीन वरिष्ठ गोलंदाजांचा बचाव केला.




मला वाटते की आमच्या गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली. कदाचित फरक एवढाच असेल की भारतीय फलंदाजांना पहिल्या डावात व दुसऱ्या डावात फार मोठी संधी मिळाली होती, असे तो म्हणाला.

### माझा अंदाज चुकीचा ठरला

स्टार्क, कमिन्स व हेझलवूड हे घरच्या मैदानावर खूप वर्चस्व गाजवत असल्यामुळे गत हंगामात वेगवान गोलंदाज स्कॉट बोलॅण्डला पुनरागमनाची संधी मिळणार नाही असे वाटत होते, मात्र त्याचा अंदाज चुकला व या सामन्याच्या माध्यमातून त्याला भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात गोलंदाजी करण्याची संधी मिळत आहे. स्टार्क, कमिन्स व हेझलवूड हे तीन वेगवान गोलंदाज इतके तरबेज आहेत की, ते फारसे चुकत नाहीत व कोणीही कोणत्याही टप्प्यावर आपली संधी सोडत नाही. इतके वर्चस्व गाजवणारे गोलंदाज असल्यामुळे मला वाटले की कदाचित आपली संधी निघून गेली असेल, से स्कॉट बोलॅण्ड म्हणाला.

तंदुरुस्त होण्यासाठी मी खरोखर कठोर परिश्रम केले आहेत व मला आणखी एक संधी मिळाल्यास मी ऑस्ट्रेलियासाठी पुन्हा कामगिरी करू शकेन, याची मला खात्री होती. यादरम्यान मी ॲण्ड्र्यू मॅकडोनाल्ड, मुख्य प्रशिक्षक आणि जॉर्ज बेली, मुख्य निवडकर्ता यांच्याशी हंगामापूर्वी संवाद साधला, तेव्हा मी पुनर्वसन करत होतो व तंदुरुस्त होण्यासाठी खूप प्रयत्न करत होतो, असे तो म्हणाला.

**ऑस्ट्रेलियन खेळाडू घाबरत नाही**

पहिल्या कसोटीतील दारुण पराभवानंतर वैयक्तिक कामगिरीवर ड्रेसिंग रूममध्ये चर्चा झाली असेल, परंतु ऑस्ट्रेलियन खेळाडू घाबरलेले नाही, असे स्कॉट बोलॅण्ड म्हणाला.

आम्ही एक सामना गमावला, परंतु आता आम्हाला प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करायची आहे व प्रत्येक सामना जिंकायचा आहे, असा विश्वासही त्याने व्यक्त केला. (वृत्तसंस्था)

# केवळ आमच्या भूमिकेशी सुसंगत पर्याय मान्य असेल : पीसीबी

◆ **लाहोर, ३० नोव्हेंबर**

आम्ही केवळ आमच्या भूमिकेशी सुसंगत असेल असा तोडगा स्वीकारणार आहे, असे पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) शनिवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) सूचित केले आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आयसीसी चॅम्पियन्स चषक २०२५ स्पर्धेसाठी पाकिस्तानला न जाण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे, तर दुसरीकडे, पीसीबी संपूर्ण स्पर्धा पाकिस्तानमध्ये आयोजित करण्यावर ठाम आहे.

या स्पर्धेच्या सद्यःस्थितीवर उपाय शोधण्यासाठी, निर्णायक तोडगा काढण्यासाठी आयसीसीने शुक्रवारी सर्व सदस्यांसह बैठक बोलावली. १५ मिनिटे चाललेल्या या बैठकीत स्पर्धेच्या भवितव्याबाबत चर्चा करण्यात आली. परंतु कोणताही निर्णय न घेता अखेरीस सभा शनिवारपर्यंत तहकूब करण्यात आली.

अलीकडील बातमी आयसीसीच्या दुसऱ्या बैठकीपूर्वी आली आहे, जी शनिवारी होणार होती, परंतु ती आयोजित केली जाऊ शकली नाही, असेही त्यांनी सांगितले.

आयसीसीने वाजवी व व्यवहार्य फॉर्म्युला दिल्यानंतर या प्रकरणावर प्रगती केली जाईल, असे पीसीबीने म्हटले आहे.

दोन देशांमधील तणावपूर्ण राजकीय संबंधांमुळे, २००८ पासून भारताने आशिया चषक स्पर्धेत भाग घेतल्यापासून दौरा केलेला नाही. दोन पारंपरिक प्रतिस्पर्धी संघांनी शेवटची द्विपक्षीय मालिका २०१२-१३ मध्ये भारतात खेळली होती. त्यानंतर, भारत व पाकिस्तान प्रामुख्याने आयसीसी स्पर्धा आणि आशिया चषकमध्ये एकमेकांसमोर आले आहेत. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## राष्ट्रीय ज्युनियर तलवारबाजी स्पर्धेसाठी ऑल स्टार फेन्सिंग क्लबच्या अथर्व खोत याची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

संभाजीनगर येथे झालेल्या ३२ ज्युनियर राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये ईपी या प्रकारात वैयक्तिक गटामध्ये अथर्व राजेंद्र खोत याने कांस्यपदक पटकावले. या कामगिरीवर त्याची दि. २ ते ६ डिसेंबर दरम्यान पाटना (बिहार) येथे होणाऱ्या ३२ ज्युनियर राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. अथर्व हा ऑल स्टार फेन्सिंग क्लबचा असून या खेळाडूंना पवन भोसले, सोहम साठे व वेदांत पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश काटुळे, जिल्हा सचिव दीपक शिंदे सदस्य अनिल पाटील व राजेंद्र गोटे यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बाळेतील ज. रा. चंडक प्रशालेच्या श्रावणी सूर्यवंशीला तिहेरी सुवर्ण मुकुट

## शालेय राष्ट्रीय स्पर्धेत डायव्हिंग प्रकारात कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

येथील श्रावणी प्रताप सूर्यवंशी हिने शालेय राष्ट्रीय जलतरण स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात तीन सुवर्ण पदकासह हॅटट्रिक केली आहे.

राजकोट (गुजरात) येथे शनिवारी झालेल्या या स्पर्धेत श्रावणीने १७ वर्षे वयोगटात ही कामगिरी केली. श्रावणी ही बाळे येथील ज.रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयची ती विद्यार्थिनी आहे. तिने हायबोर्ड डायव्हिंगमध्ये २२७.१५ गुणासह, ३ मीटर स्प्रींग बोर्ड मध्ये २५३.५५ गुणासह तर १ मीटर स्प्रीग बोर्डमध्ये २२६ गुणासह सुवर्ण कामगिरी केली.

श्रावणीला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे, क्रीडाशिक्षक दशरथ गुरव व नफिसा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापिका निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ, मुख्याध्यापक मोहनराव घोडके, आदींनी कौतुक केले.



प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांच्यासह श्रावणी सूर्यवंशी.

### आतापर्यंत ४९ पदकांची कमाई

श्रावणीने आजपर्यंत डायव्हिंगमध्ये शालेय आणि फेडरेशनच्या राज्य स्पर्धेत १८ गोल्ड, ५ सिल्वर, १ ब्राँझ व राष्ट्रीय पातळीवर १२ गोल्ड, ५ सिल्वर, २ ब्राँझ आणि आतंरराष्ट्रीय पातळीवर २ गोल्ड, ३ सिल्वर, २ ब्राँझ अशी एकूण ४९ पदके वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षात आपल्या नावांवर केली आहेत.



## कुशाग्र पाठक आणि संध्याराणी बंडगर यांची महाराष्ट्र लॉन टेनिस संघात निवड

**सोलापूर ३० नोव्हेंबर-**

केंद्र सरकार व राजस्थान सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने १५ ते २१ डिसेंबर या कालावधीत जयपूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या लॉन टेनिस संघात येथील कुशाग्र पाठक व संध्याराणी बंडगर यांची निवड झाली आहे.

कुशाग्र हे वन विभागात उपवनसंरक्षक (आय.एफ.एस) म्हणून तर संध्याराणी या सामाजिक वनीकरण विभागात मुख्यलेखापाल म्हणून कार्यरत आहेत. एम एस एल टी ए, मुंबई येथे झालेल्या निवड प्रक्रियेत राज्यभरातून १८ स्पर्धक आहेत. एकुण ५ सामन्यांपैकी ४ सामने जिंकून कुशाग्र यांनी महाराष्ट्र संघात स्थान पक्के केले. तसेच ३ सामन्यांपैकी ३ सामने जिंकून संध्याराणी यांनी संघात त्यांचे स्थान पक्के केले. त्यांच्या या निवडी बद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी यांनी अभिनंदन केले तसेच त्यांना संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. सुधीर सालगुडे हे त्यांचे प्रशिक्षक आहेत.

## पानगावला रविवारी जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल निवड चाचणी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

रविवारी १ डिसेंबर रोजी सद्गुरू हॉलीबॉल क्लब पानगाव ( ता. बार्शी) येथे सोलापूर शहर व जिल्हा डायरेक्ट हॉलीबॉल असोसिएशनच्या वतीने जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेसाठी असोसिएशनचे अध्यक्ष तथा पानगाव डायरेक्ट हॉलीबॉल क्लबचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे(९८२२२८६५५२) व असोसिएशनचे प्रसिद्धीप्रमुख फरहान लालकोट (९२८४१२१५४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे असोसिएशनचे सचिव फैज अहमद बेगमपुरे यांनी कळविले आहे. या स्पर्धेतून बदलापूर (जि. ठाणे) येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे. यासाठी निवड समिती सदस्य म्हणून रफी दिवाण,सलीम करणकोट व अशोक ढगे काम पाहणार आहेत. या जिल्हास्तरीय डायरेक्ट हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी होण्याचे आवाहन असोसिंएशनचे उपाध्यक्ष संजय सावंत व अहमद शेख यांनी केले आहे.

# जिल्हा किशोर खो-खो स्पर्धेत मरवडेच्या छत्रपती खो-खो क्लबला विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

जिल्हा १४ वर्षांखालील किशोर खो-खो स्पर्धेत मरवडेच्या (ता. मंगळवेढा) छत्रपती खो-खो क्लबने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी शेवतेच्या आदर्श क्लबचा पराभव केला.

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने मरवडे येथे छत्रपती खो-खो क्लब यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत जिल्ह्यातील १६ संघाने भाग घेतला होता. मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी मरवडेचे माजी सरपंच दादासाहेब पवार, निवृत्त रेल्वे पोलीस दामोदर घुले, माजी सरपंच अशोक पवार, माजी विस्तार अधिकारी डॉ.माणिक पवार, धनश्री परिवाराचे नेते संदीप सूर्यवंशी, उद्योगपती ॲड. राजाराम येडसे, शेतकरी संघटनेचे नेते दत्तात्रय गणपाटील, युवक नेते सचिन घुले, महेश गायकवाड, सोमनाथ टोमके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

बाद पद्धतीने झालेल्या या स्पर्धेमध्ये छत्रपती खो-खो क्लब मरवडे, आदर्श खो-खो क्लब शेवते, लोकविकास खो खो क्लब वेळापूर व आढीव खोखो क्लब या संघांनी उपांत्य फेरीमध्ये प्रवेश केला होता. मरवडे संघाने आढीव संघाचा व शेवते संघांनी वेळापूर संघाचा पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती.

या स्पर्धेसाठी जिल्हा असोसिएशनचे पंच म्हणून लखन कांबळे, हरिदास शिंदे, विजय फटे, विजय कोटे, भैया कोळी या पंचांचे सहकार्य लाभले. ही स्पर्धा पार पाडण्यासाठी छत्रपती खो खो क्लबचे सुदर्शन घुले, मिनाज इनामदार, रोहित कुंभार, उमाजी केंगार, नवनाथ डांगे, रोहन जाधव, नानासाहेब जाधव, नवनाथ बनसोडे, अभिनव पवार, रियाज इनामदार, ब्रह्मदेव कुंभार यांनी सहकार्य केले.



# न्यासाच्या परिसरात कौशल्यपूर्ण कृतिशिलतेचे दर्शन : संतोष जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० नोव्हेंबर -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या परिसरात कौशल्यपूर्ण कृतीशीलता पाहायला मिळत असल्याचे मनोगत राज्य सचिवालयातील संतोष जाधव यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी मंडळाचे सचिव शाम राव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, एस.के.स्वामी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, तानाजी पाटील, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, राहुल इंडे, महांतेश स्वामी, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



# रात्र वैऱ्याची आहे, पालक आणि बालकांनी सतर्क रहावे

## दयानंद काळुंके : तीर्थ खु।। येथे युवा जागर अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३० नोव्हेंबर-**

आपले बालक काय करतो. त्यांच्यात काय बदल झाला आहे? मित्रसंगती कोणकोण आहेत याचा शोध घेणे गरजेचे असून जवळच्याच माणसांकडून धोका होतोय. रात्र वैऱ्याची आहे. पालकांनी व बालकांनी सतर्क रहावे असे आवाहन बालकल्याण समितीचे सदस्य दयानंद काळुंके यांनी केले.

हॅलो मेडिकल फाउंडेशन संस्थेच्या निर्धार समानता प्रकल्पांतर्गत तुळजापूर तालुक्यातील तिर्थ खु।। येथे युवा जागर अभियानांतर्गत ताणतणाव, छेडछाड, बालविवाह याविषयी दयानंद काळुंके बोलत होते. या अभियानात बालविवाह प्रतिबंधक कायदा, छेडछाड, विद्यार्थ्यांमधील ताणतणाव, बालक, पालक व शिक्षकांमधील सुसंवाद, समन्वय, स्वरक्षण आणि आरोग्य याविषयी माहिती देण्यात आली. पोस्टर प्रदर्शन, सापशिडी, चित्रफीत, लघुपट, गाणी या माध्यमातून विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. डी. फडके, सावली केंद्राच्या समुपदेशिका वासंती मुळे, प्रकल्प समन्वयक नागिणी सुरवसे, इंदुबाई कबाडे, व्ही. एस. चव्हाण, भैरू कानडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात मुख्याध्यापक व्ही. डी. फडके, वासंती मुळे, नागिणी सुरवसे, एस. डी. पटाडे यांनी युवा जागर अभियानांतर्गत आपले विचार व्यक्त केले. या अभियाचा शेकडो विद्यार्थ्यांनी फायदा घेतला. प्रास्ताविक नागिणी सुरवसे यांनी केले. सूत्रसंचलन एस. डी. पटाडे यांनी केले तर आभार जे. डी. तापकिरे यांनी मानले. यासाठी प्रणिता भोसले, श्रीराम जाधव, ज्योती सर्वगोड, दीपाली भोसले, संतोष जाधव यांच्यासह माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, हॅलो संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता.




# भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतलेले श्री श्री शंकर भारती स्वामीजी

**श्री श्री शंकर भारती महास्वामीजी पिठाधीपती श्रीयोगानंदेश्वर सरस्वती पीठ कृष्णराज नगर म्हैसूर हे वेदांत भारती याअध्यात्मिक व वैज्ञानिक संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक आहेत. स्वामीजींच्या उत्तर भारताच्या विजय यात्रेच्या दरम्यान दिनांक २ डिसेंबर रोजी त्यांचे सोलापुरात आगमन होत आहे त्यानिमित्त हे गुरुवंदन.**

आदी शंकराचार्यांच्या अद्वैत तत्वाचा व सनातन धर्माचा प्रचार व प्रसार करणारा मठ म्हणून येडतोरे श्री योगानंदेश्वर सरस्वती हेकावेरी नदीच्या किनारी कृष्णराज नगर जिल्हा मैसूर येथील प्रसिद्धसंस्थान आहे. ८०० वर्षांपूर्वी या मठाची स्थापना झाली असून अनेक महान पिठादिशांनी या मठाद्वारे अध्यात्मिक व सामाजिक कार्य केलेले आहे. शृंगेरी पिठाचे जगद्गुरु श्री श्री भारती तीर्थ महास्वामीयांच्या अनुग्रहाने श्री श्री शंकर भारती स्वामीजींनी संन्यास स्वीकारून १९९५मध्ये या मठाचा कार्यभार स्वीकारला. संन्यासधर्माचे अत्यंत काटेकोर पालन करत स्वामीजी सामाजिक व राष्ट्रीय एकात्म भावासाठी अनेक कार्यक्रम करत आहेत.

मनुष्याच्या वैयक्तिक प्रगतीतूनच सामाजिक व राष्ट्रीय विकास घडू शकतो. या भावनेतून भारतीय संस्कृती व सनातन धर्म वृद्धिंगत करण्यासाठी ते निरंतर कार्यरत आहेत. कावेरी नदी जेथे दक्षिणावर्त होते. ते ठिकाण म्हणजे जपद कट्टे जेथे भगवान शंकरांनी शिळेवर बसून तपश्चर्या केलेली आहे. श्री श्री भारती तीर्थ महास्वामी यांच्या आज्ञेवरून श्री श्री शंकर भारती स्वामीजींनी येथे जपेश्वर संस्थान उभे केले आहे. या रमणीय परिसरातील आश्रमात वर्षभर अनेक धार्मिक अध्यात्मिक कार्यक्रम होत असतात. उदाहरणार्थ मुंज झालेल्या मुलांना निशंक एक महिन्याचे निवासी शिबिर, बटू शिक्षण ज्यामध्येत्यांना संध्यावंदन, स्तोत्र व मंत्रांचे प्रशिक्षण दिले जाते. विविध व्यवसायिकांसाठी उदाहरणार्थ डॉक्टर, वकील, शिक्षक, इंजिनियर्स यांच्यासाठी वैचारिक अध्यात्मिक सत्रांचे आयोजन केले जाते.

वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेण्याचा स्वामीजींचा आग्रह असतो. मग त्यावर वैदिक तत्त्वज्ञान काय सांगते. यावर ते मार्गदर्शन करतात. वेदांत भारती ही संस्था ह्याच संदर्भात विस्तृत कार्य करत आहे. श्रीरामांच्या जन्मभूमीत आयोजित करण्यात आलेली मृत्युंजयही एक भारतीय अध्यात्मिक क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक कॉन्फरन्स होती. या तीन दिवसात विविध संस्कृत पंडितांनी, विचारवंतांनी 'जन्म मृत्यू' या विषयावर आपल्या श्रेष्ठ वैदिक पद्धतीतून विचार मांडले तर देश परदेशातील अनेक नामांकित डॉक्टर व वैद्यकीय संस्था यांनी याच विषयावर आपले संशोधनकार्य यावर प्रदर्शन केले.




डिसेंबर २०२३ मध्ये आनंद या कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले होते. त्यात नोबल पारितोषक विजेता विषय कॉंटम फिजिक्स व वेदांत दृष्टिकोन यांची सखोल चर्चा होऊन वेदांत सांगितलेले तत्व, सृष्टी रचना, उत्पत्ती इत्यादी बद्दलचे प्रमेय व कॉंटम फिजिक्स मधील निष्कर्ष हे मिळते जुळते व एकच असल्याचे सिद्ध झाले आहे. अशा शास्त्रीय विचार सत्रांमुळे भारतीय संस्कृतीतील वेद, उपनिषद या मधील विचार सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यास मदत होते व आपल्या श्रेष्ठ परंपरेचा स्वाभिमान जागृत होतो.

आदि शंकराचार्य यांची अनेक वर्षांपूर्वी रचलेली स्तोत्र आजच्या काळातही तितकीच सुसंगत व उपयोगी आहेत हे जाणून श्री श्रीशंकर भारती स्वामीजी या स्तोत्रांच्या प्रचारासाठी संपूर्ण भारत भरकार्य करत आहेत. वय, लिंग, जात हा कसलाही भेद न मानता संपूर्ण मानव जातीच्या उत्कर्षासाठी आदी शंकराचार्य यांची स्तोत्र अतिशय प्रभावी असल्याने वेदांत भारती अनेक कार्यक्रमांच्या द्वारेया स्तोत्रांचा प्रचार करत आहे. उदाहरणार्थ निर्वाण अष्टकम, दशा श्लोकी, गुरु अष्टकम, रामभुजंगप्रयात स्तोत्र, दक्षिणामूर्ती अष्टकम, कृष्ण अष्टकम, सौंदर्यलहरी. अशी प्रमुख स्तोत्रे सर्वसामान्य जनतेस ऑनलाइन व प्रत्यक्ष वर्गातून शिकवली जातात व त्यानंतर त्याचे सामूहिक समर्पण विशिष्ट कार्यक्रमाद्वारे केले जाते. २००७ मध्ये बंगलोर येथील पॅलेस ग्राउंडवर सौंदर्य लहरी स्तोत्राचे लाखो लोकांनी सामूहिक पारायण केले. तेव्हा श्री लाल कृष्णअडवाणी प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. २०१७ मध्ये याच कार्यक्रमाच्या दशमान उत्सवास भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते. त्यानंतर वाराणसी, हैदराबाद, इत्यादी ठिकाणी हजारो लोकांच्या संख्येने सौंदर्य लहरी सामूहिक पठण घडून आलेले आहे. गृहमंत्री श्री अमित शहा हे प्रमुख अतिथी म्हणून विवेकदीपिनी याविशेष कार्यक्रमास उपस्थित होते. ज्यात लाखो मुलांनी आधीशंकराचार्यांच्या प्रश्न उत्तर मालिका या स्तोत्राचे पारायण केले होते. विवेक दीपिनी या पुस्तिकेचे अनेक भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले आहे. ज्याचे उद्घाटन दिल्ली येथे उपराष्ट्रपती व्यंकय्यानायडू यांच्या हस्ते करण्यात आले आहे. वेदांत भारतीतर्फे बाल वर्गासाठी किशोर सुधा हा उपक्रम चालू असून देशातील व परदेशातील बालकांना ऑनलाइन पद्धतीने स्तोत्र व सुभाषित शिकवण्यात येतात.

वाराणसी येथे स्वामीजींनी संत समावेश या कार्यक्रमांतर्गत देशातील जवळपास ५०० संन्यासी जनांची विशेष परिषद घेतली होती. त्यात सनातन धर्म प्रचारात येणाऱ्या अडचणी, प्रादेशिक प्रश्न, त्यावर उपाय एवढेच नव्हे तर सन्यास धर्माचे वैयक्तिक वसामाजिक पालन शास्त्रशुद्ध पद्धतीने करून समाजात त्यांच्या कार्याची प्रतिष्ठा व श्रद्धा कशी वाढवावी आणि राष्ट्रीय एकात्मभावासाठी निरंतर कार्य कसे करावे याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. ईशान्य भागातील दुर्गम प्रदेशात जाऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेत भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. जम्मू कश्मीरमध्ये उर्वरित हिंदू समाजास धैर्याने एकजूट होऊन काम करण्यास ते प्रेरणा देत आहेत. नुकतेच झालेला नमः शिवाय हा कार्यक्रम ज्यामध्ये दीड लाखांवर लोकांनी कल्याण वृष्टी, शिवपंचाक्षर नक्षत्रमाला स्तोत्र व लक्ष्मी नरसिंह स्तोत्र ह्याचे सामूहिक समर्पण केले. हा कार्यक्रम इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंदविला गेला.

स्वामीजींनी आपल्या गुरुस म्हणजेच श्री श्री भारती तीर्थ स्वामीजीयांच्या संन्यास दिक्षेच्या ५० वर्ष पूर्ण झालेल्या निमित्त अर्पणकेलेली एक श्रेष्ठ गुरुवंदनाच होय. सोलापुरात स्वामीजींचे आगमन आमचे अहोभाग्य आहे. त्यांचा संपूर्ण आशीर्वाद सोलापूर वासियांवरती राहो हीच ईश्वरचरणीप्रार्थना. श्री गुरोभ्यो नमः.

**-डॉ. मेघा कमलापूरकर**
**देवता हॉस्पीटल,**
**कलबुर्गी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सम्राट चौक ते जुना कारंबा नाका रस्त्याचे काम तातडीने करा

## ▶▶माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

सम्राट चौक ते जुना कारंबा नाकापर्यंतचा हा सदरचा रस्ता प्रचंड रहदारीचा असून या रस्त्यावर एसटी महामंडळाच्या सोलापूर शहरातून बाहेर पडणाऱ्या संपूर्ण बसेस वाहतूक करतात. सम्राट चौक ते जुना कारंबा नाका या रस्त्याकडे जड वाहतूक प्रचंड प्रमाणात होत असल्याने सदरच्या रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात आले नसल्याने हा रस्ता कमकुवत झाला आहे. या रस्त्याचे काम करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले.

यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते गौतम नागटिळक, भीमा मस्के आदी उपस्थित होते. हा रस्ता बुधवार पेठ परिसरातील १५ ते अधिक शाळा कॉलेज महाविद्यालय व उत्तर तालुक्यातील २२ गावांना जोडला असून मोठ्या प्रमाणावर नागरिक या रस्त्याचा वापर करतात. मार्केट यार्ड व बाजारपेठेकडे जाण्यासाठी प्रमुख रस्ता म्हणून ह्या रस्त्याचा वापर होत असून सदरच्या ह्या रस्त्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात व्यापारी वर्ग राहतो. झोपडपट्टीतील नागरिकांना रस्ता खराब झाल्याने मोठ्या प्रमाणात याचा त्रास होत असून सम्राट चौक ते जुना कारंबा नाका या रस्त्याला पिण्याच्या पाण्याची लाईन व पावसाळी पाण्याचा मोठा प्रमाणात निचरा होत असतो. त्यामुळे एसटी महामंडळाच्या प्रचंड वाहतुकीमुळे या रस्त्याची ड्रेनेज लाईन सातत्याने फुटत असते. या भागात श्री प्रभाकर महाराज मंदिर, जैन मंदिर व सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज यांनी स्थापन केलेले काही लिंग आहेत. यामुळे या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. हा रस्ता अत्यंत खराब झाल्यामुळे या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.

# सोलापूर बसस्थानकात नव्या ‘शिवाई’चे थाटात लोकार्पण





## ●राज्यात सुमारे ५ हजार बसेसच्या माध्यमातून इलेक्ट्रिक बसेसचे वाढणार जाळे
## ●प्रवाशांनी गतिमान व आरामदायक प्रवासासाठी व्यक्त केले समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

अत्याधुनिक शिवाई इलेक्ट्रिक बस प्रवासांच्या सेवेत रुजू झाली असून, याचा लोकार्पण सोहळा सोलापूर बस स्थानकात संपन्न झाला. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते या नव्याकोऱ्या इलेक्ट्रिक बसचे पूजन करून लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे सोलापूर एसटी विभागाच्या ताफ्यात आणखीन आधुनिक ७ नव्या शिवाई बस दाखल झाल्याने प्रवास अधिक गतिमान होणार आहे. मात्र यासाठी प्रवाशांना वाढीव प्रवासी भाडे द्यावे लागणार आहे. सर्वसामान्य बसच्या तुलनेत इलेक्ट्रिक बसचे भाडे दहा टक्के जास्त असणार आहे.

दरम्यान, राज्याच्या परिवहन व्यवस्थेत अमुलाग्र बदल होताना दिसत आहेत. पेट्रोल डिझेल या इंधनाला पर्याय म्हणून इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्यक्रम वाढत चाललेला आहे. वाढते प्रदूषण आणि इंधनाची महागाई यामुळे ऑटोमोबाईल तसेच वाहन क्षेत्रात बदल होत आहेत. इलेक्ट्रिक वाहनांची क्रांती मोठ्या प्रमाणात होत असल्याने, त्याचे परिणाम सार्वजनिक वाहतूक क्षेत्रावर देखील जाणवताना दिसत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता राज्याच्या परिवहन व्यवस्थेत देखील इलेक्ट्रिक बसेस मोठ्या प्रमाणात रुजू होत आहेत. शनिवार (दि. ३०) नोव्हेंबर रोजी नव्या अत्याधुनिक शिवाई इलेक्ट्रिक बसचे लोकार्पण सोहळा मोठा थाटात संपन्न झाला. राज्याचे माजी परिवहन राज्यमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असणारे शिवाई प्रवाशांना आकर्षक आणि लाभदायक ठरत आहे. यापूर्वीच्या शिवाई इलेक्ट्रिक बसमध्ये अत्याधुनीकीकरण करण्यात आले आहे. संपूर्ण एसी असलेली इलेक्ट्रिक बस प्रवाशांचा प्रवास अधिक आरामदायक व सोयीस्कर करणार आहे. ताशी ६० किलोमीटर वेगाने धावणारी इलेक्ट्रिक बस पुशबॅक सीटमुळे प्रवाशांना आरामदायक ठरणार आहे. त्याच पद्धतीने स्वतंत्र चार्जिंग स्लॉट, स्वतंत्र एसी, इतर साहित्य ठेवण्यासाठी जागा, पुस्तके ठेवण्यासाठी स्वतंत्र विभाग, अशा विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेली शिवाई बस प्रवाशांमध्ये प्रसिद्ध झाली आहे.

जुन्या शिवाई इलेक्ट्रिक बसच्या तुलनेने नवीन शिवाई बस अत्याधुनिक व अधिक गतिमान असणार आहे. यावेळी विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील, ट्रान्स कंपनीचे सर्कल मॅनेजर सुनील बारस्कर, डेपो मॅनेजर उत्तम जुंदळे आदींसह एसटीचे अधिकारी कर्मचारी चालक वाहक प्रवासी उपस्थित होते.

### प्रवाशांसह आ. विजयकुमार देशमुखांमध्ये उत्कंठा

नव्या शिवाई इलेक्ट्रिक बसचे सोलापूर बसस्थानकावर लोकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रवाशांसह आमदार देशमुखांमध्ये देखील बसची माहिती घेण्यासाठी उत्कंठा दिसून आली. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी फित कापून बसचे उद्घाटन केले. तदनंतर त्यांनी बसमध्ये जाऊन अधिकाऱ्यांकडून शिवाई बसेसच्या सर्व वैशिष्ट्यांची माहिती घेतली.

### आनंददायी प्रवास होणार

लांब पल्ल्याच्या मार्गावर या बसेस सोडण्यात आल्याने प्रवास हा आनंददायी व आनंददायक होणार आहे. सर्वसामान्य प्रवासी भाड्यांपेक्षा शिवाई इलेक्ट्रिक बसच्या प्रवासी भाड्यात फरक आहे. मात्र प्रवास हा सुखकर होत आहे.

**-सदाशिव कांबळे, प्रवासी**

### प्रशिक्षित चालकांकडे स्टेरिंगची जबाबदारी

एसटी महामंडळ आणि ट्रान्स कंपनी यांच्यातील झालेल्या करारानुसार कंपनीद्वारे प्रशिक्षित चालकांकडे बसेस स्वभावण्यात आले आहेत. त्याच अनुषंगाने लातूर आणि सातारा मार्गावर या नव्या शिवाई बसेस सोडण्यात आल्या आहेत. सातारा मार्गावर प्रथम शिवाई बस चालवण्यासाठी महेश बिडवे आणि रवींद्र येरवाडकर यांच्याकडे नव्या शिवाई स्टेरिंग देण्यात आले. कंपनीद्वारा प्रशिक्षित आणि उत्तम चालक असल्याने कंपनीने यांची नेमणूक यासाठी केली आहे.

### खाजगी कंपनीद्वारे बसेसचे नियोजन

ट्रान्स व ओलेक्ट्रा या खाजगी कंपनीने बसेस निर्माण केल्याने कंपनीचा चालक आणि एसटीचा वाहक अशा पद्धतीने इलेक्ट्रिक शिवाई बसची सार्वजनिक वाहतुकीसाठी सांगड घालण्यात आली आहे. यापूर्वी हा प्रयोग शिवशाही एसी बसेससाठी करण्यात आला होता. आता हा प्रयोग इलेक्ट्रिक बसेससाठी करण्यात आला आहे. या बसेसचा संपूर्ण मेंटेनन्स कंपनी पाहणार आहे. यासाठी सोलापूर आगारात नव्या चार चार्जिंग स्टेशनची निर्मिती करण्यात आली आहे.

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग**

### राज्यात ५ हजार १५० बसचे जाळे

राज्यात सुमारे ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन आहे. एसटी महामंडळ, ट्रान्स ही ओनर तर ओलेक्ट्रा ही मॅन्युफॅक्चर कंपनी आसून, यासाठी सुमारे १२ वर्षांसाठीचा हा करार करण्यात आला आहे. यामध्ये अत्याधुनिक फीचर्स ॲड करण्यात आले आहेत. आणि ही गाडी अधिक गतिमान असणार आहे.

**- सुनील बारस्कर, सर्कल मॅनेजर ट्रान्सपोर्ट कंपनी**




# रेल्वे कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी उभारणार लढा

## मध्य रेल्वे कर्मचारी संघाचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

रेल्वे कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजना बंद करून जुनी पेन्शन योजना सुरू करण्यासाठी मध्य रेल्वे कर्मचारी संघातर्फे लढा उभारण्यात येईल, असे आश्वासन मध्य रेल्वे कर्मचारी संघातर्फे देण्यात आले. मध्य रेल्वे अंतर्गत होत असलेल्या कर्मचारी संघटनांच्या मान्यताप्राप्तीच्या निवडणुकीसाठी एमआरकेएसतर्फे दुचाकी फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

रेल्वे स्थानकापासून या फेरीचा प्रारंभ झाला. भारतमाता की जय, एक देश, एक संविधान, एक पेन्शन, वोट नहीं मौका है, ओपीएस को पाना है अशा घोषणा यावेळी देण्यात येत होत्या. ही दुचाकी फेरी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयासमोर विसर्जित झाली.


यावेळी मध्य रेल्वे कर्मचारी संघाचे भगवंत कुलकर्णी म्हणाले, रेल्वे खात्याकडून सध्या घोषित करण्यात आलेल्या दोन्ही पेन्शन योजना निष्प्रभ आणि कामगारांना त्रासदायक ठरणाऱ्या आहेत. त्यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांचे आर्थिक शोषण होणार आहे. तसेच कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय, महिलांसाठीच्या सोयींचा अभाव आहे. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून मध्य रेल्वे कर्मचारी संघ रेल्वे कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देणार आहे. त्याकरिता रेल्वे कर्मचाऱ्यांच्या एस. सी, एस. टी. संघटना, ओबीसी संघटना, ट्रॅकमन असोसिएशन, गँगमन असोसिएशन अशा एकूण १० संघटनांनी मध्य रेल्वे कर्मचारी संघाला पाठिंबा दिला आहे, असेही श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

४, ५, ६ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीमध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांनी मध्य रेल्वे कर्मचारी संघाच्या पाठीशी उभे रहावे, असे आवाहन नितेश उडाणशिव यांनी याप्रसंगी केले. ऑल इंडिया एस.सी. एस.टी. रेल्वे एम्प्लॉईज युनियनचे झोनल सचिव टी.बी. वाघमारे म्हणाले, मागील निवडणुकांमध्ये ऑल इंडिया एस.सी. एस.टी. रेल्वे एम्प्लॉईज युनियनने नॅशनल रेल्वे मजदूर युनियन आणि सेंट्रल रेल्वे मजदूर संघाला पाठिंबा दिला होता. परंतु या दोन्ही संघटनांनी कर्मचाऱ्यांसाठी कोणतीही ठोस कृती केली नाही.

त्यामुळे मध्य रेल्वे कर्मचारी संघ ट्रेड युनियन मान्यता प्राप्त होण्याकरिता आम्ही पाठिंबा देत आहोत, असेही ऑल इंडिया एस.सी. एस.टी. रेल्वे एम्प्लॉईज युनियनचे झोनल सचिव टी. बी. वाघमारे याप्रसंगी म्हणाले. याप्रसंगी नितेश उडाणशिव, रविंद्र नाशिककर, श्रीधर खेडगीकर, सुहास कुलकर्णी, प्रमोद जाखलेकर, रविंद्रयन आदी उपस्थित होते.

# नागेश करजगी ऑर्किडच्या सौर संशोधन केंद्राला आयएफसीसीआयकडून विशेष सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**




ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स इंडियाने येथील नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये स्थापन केलेल्या सौर संशोधन व कौशल्य विकास केंद्राला इंडो-फ्रेंच चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने ज्युरी स्पेशल पुरस्कार प्रदान केला.

दिल्ली येथे झालेल्या या सोहळ्यासाठी डसॉल्ट सिस्टीमचे हेमंत गाडगीळ, स्वाती व्हनबट्टे, प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणेचे सचिव विलास पाटील, ऑर्किड अभियांत्रिकीचे उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन हे उपस्थित होते. ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स इंडियाने सुरु केलेले हे केंद्र सौरऊर्जेच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना देत ग्रामीण भागासाठी सौरऊर्जेवर आधारित तंत्रज्ञान विकासाचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. ग्रामीण भागासाठी सौरऊर्जेवर आधारित नाविन्यपूर्ण उत्पादने विकसित करून एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

या केंद्राने आतापर्यंत १५ पेक्षा जास्त अत्याधुनिक उत्पादने विकसित केली आहेत, ज्यामध्ये सोलार मिल्क पॉश्चिरायचर, सोलार ड्रार्स तसेच जगातील सर्वात मोठ्या सौर वृक्ष (सोलार ट्री) यांचा समावेश आहे.

हे केंद्र सौरऊर्जेच्या क्षेत्रात केवळ शाश्वततेलाच प्रोत्साहन देत नाही तर विद्यार्थ्यांना आणि तंत्रज्ञांना नवीन सौर उत्पादने विकसित करण्यासाठी सक्षम करत आहे. यामुळे ग्रामीण भागातील सौरऊर्जेच्या उपयोगाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे आणि उद्योजकतेला नवे दार उघडले आहे.हा पुरस्कार शिक्षण, नाविन्य आणि सहकार्याच्या माध्यमातून सौरऊर्जेच्या क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. उज्ज्वल, शाश्वत भविष्य घडविण्यासाठी हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सौरऊर्जेच्या सहाय्याने उज्ज्वल भवितव्यासाठी आपण एकत्र येऊन काम करूया असे ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टम्स भारताने सांगितले.

# रॉंग साईडने आलेल्या दुचाकीची धडक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

रॉंग साईडने आलेल्या दुचाकीच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी झाला. दिपक विनायक नारायणकर (वय ३९, रा. आशा नगर, एमआयडीसी, सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास दिपक नारायणकर हे सुनिल नगर ते गुंडेली चौक असे जात होते.

त्यावेळी गुंडेली चौकाच्या अलीकडे समोरून येणाऱ्या दुचाकी वाहनाने रॉंग साईडने समोरून दिपक नारायणकर यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये नारायणकर यांच्या हाता पायास गंभीर जखमा झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# मंगल कार्यालयातून ५९ हजाराचे दागिने पळविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

शहरातील एमआयडीसी भागातील दुस्सा इवेंन्टस हॉल येथे कार्यक्रमाकरीता गेलेल्या महिलेच्या हॅन्डबॅगमधील सुमारे ५९ हजारांचे दागिने अनोळखी व्यक्तीने पळविले. हा प्रकार २८ नोंव्हेंबरच्या रात्री आठनंतर घडला.



याबाबत शोभना दत्तात्रय श्रीराम (वय ४६, रा. गांधी नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दुस्सा इवेंन्टस हॉल येथे कार्यक्रमानिमित्त शोभना श्रीराम या २८ नोव्हेंबरच्या रात्री आठ वाजता गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी सोन्याचे दागिने व मोबाईल असे त्यांच्या हॅन्डबॅगमध्ये ठेवून ती बॅग कार्यालयातील खुर्चीवर ठेवली होती. साधारण तासाभराने म्हणजेच ९ च्या सुमारास त्यांना खुर्चीवर हॅन्डबॅग दिसून आली नाही. त्यांनी कार्यालयात शोध घेतला तसेच नातेवाईकांकडे त्याबाबत चौकशी केली,

परंतु कोणाकडेही ती बॅग मिळून आली नाही. यावरून कोणीतरी अज्ञाताने हॅन्डबॅगमधील दागिने व मोबाईल चोरून नेल्याची खात्री झाली. यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दिली. या बॅगेत सोन्याचे दागिने, मोबाईल असा ५८ हजार ८१३ रुपयांचा ऐवज होता. या गुन्ह्याचा तपास हवालदार उबाळे करत आहेत.

WILDFIRE COMING 05 DEC
भागवत उमामंदिर
7.00 AM | 10.45 AM | 2.30 PM | 6.15 PM | 10.00 PM




ॲडव्हान्स बुकींगसाठी संपर्क : 9158142780

भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल गर्दीत सुरु
दुसरा आठवडा







12.30 PM 06.30 PM
03.30 PM 09.30 PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विधानसभा झाली... आता वेध स्थानिक स्वराज्य संस्थांचे

**इच्छुकांसह कार्यकर्ते, पदाधिकारी लागले कामाला; पक्ष पातळीवर हालचाली गतिमान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. आता इच्छुकांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीकडे लागले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिकेच्या निवडणुका मागील अडीच वर्षापासून प्रलंबीत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांनची मुदत संपुन दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. जिल्हा परिषद,पंचायत समिती नगरपालिका, महानगरपालिका लढवण्याच्या आशेने काही जण कामाला लागले होते. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुका रेंगाळल्या. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्थांनचा कालावधी संपुन दोन वर्षापेक्षा अधिक वेळ झाला आहे. या निवडणुका होणे अपेक्षीत होते. मात्र निवडणुका झाल्या नाही. निवडणुकीसाठी प्रभाग रचना, सदस्य संख्येची तयारी देखील करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात निवडणुकांना मुहूर्त लागला नाही. ओबीसी आरक्षण व इतर कारणांमुळे निवडणुका रेंगाळल्या. लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता इच्छुकांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीकडे लागले आहे. मात्र या निवडणुका होण्यासाठी २०२५ चे वर्ष उजाडेल. नवीन वर्षाच्या सुरुवातीच्या तीन ते चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुका होतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांमधुन व्यक्त केला जात आहे. इच्छुक मात्र पायाला बाशिंग बांधुन स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीची वाट पाहत आहेत.

**जिल्हा परिषद गटात अनेक इच्छुक**

कुंभारीसह प्रत्येक जिल्हा परिषद गटांमध्ये तर बरेच इच्छुक कार्यकर्ते नेते मंडळी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीकडे डोळे लावून बसले आहेत. विधानसभेची निवडणूक भारतीय जनता पार्टीच्या पारड्यात पडल्याने प्रत्येक नेता आपापले गणिते, सूत्रे फिरवायला चालू केले आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समितीचे उमेदवारीचे डोहाळे सर्वच पक्षाला लागायला सुरुवात झाली आहेत.

# केंद्र सरकारचे कामगार कायदे अहिताचे

**प्रा. चंद्रहान्स गंभीर : बार्शीत कामगार नेत्यांचे राजस्तरीय चर्चासत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० नोव्हेंबर-**

केंद्र शासन, श्रम मंत्रालय भारत सरकार यांनी २०२० बनवलेले चार कामगार कायदे श्रमिकांचे हित करण्यापेक्षा अनाहित करणारे ठरत आहेत. याचा फायदा कार्पोरेट क्षेत्रास अधिक होत आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र आझाद कामगार महासंघाचे अध्यक्ष प्रा. चंद्रहान्स गंभीर यांनी बार्शी येथे आयोजित कामगार नेत्यांच्या राजस्तरीय चर्चासत्रात मार्गदर्शनपर व्याख्यानात केले.

पुढे बोलताना गंभीर म्हणाले की, शासकीय कार्यालयात नोकर भरती केली जात आहे, सरकार जुनी पेन्शन योजना मंजूर करण्याचे टाळीत आहे. खासगीकरण वेगाने वाढल्यामुळे असंघटित क्षेत्रातील कामगार बेरोजगार होत आहेत तसेच नोकर कपातही होत आहे. पूर्वी शंभरचे आत कर्मचारी असलेली कंपनी बंद करणेची मर्यादा नव्या कायद्याने तीनशे झाली आहे, पर्यायाने नोकऱ्या जात आहेत. नवीन शासकीय भरती गरजेच्या प्रमाणात अल्प आहे. किमान वेतन कायदा पाळला जात नाही. सर्व प्रश्न गंभीर होत चालेले आहेत. या मेळाव्यात महाराष्ट्र राज्य सचिव बी. आर. देशमुख, राज्य संपर्क प्रमुख प्रदीपकुमार कांदे, स्वाती कदम, वैशाली साळवे, संपतराव देशमुख यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या चर्चासत्रात पुढील कृती कार्यक्रम कार्यक्रमाची दिशा ठरविण्यात आली. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी किरण विभुते, वैभव वनमराठे, विनोद गायकवाड तसेच अमोल विधाते, महेश राऊत यांनी परिश्रम घेतले.




**लढा निर्माण करण्याची गरज**

देशातील कामगार संघटनानी एक होऊन मोठा निर्णायक लढा उभा करण्याची गरज निर्माण झाली आहे. या चर्चासत्रात विविध कामगार क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. साहित्यिक आबासाहेब घावटे हे या मेळाव्याचे प्रमुख पाहुणे होते.



# माढ्याची पाणीटंचाई लवकरच होणार दूर

**येवती पाईप लाईनची दुरुस्ती; पाइपलाईन दुरुस्तीच्या कामासाठी पाणीपुरवठा काही दिवस बंद**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ३० नोव्हेंबर-**

माढा शहराला येवती जलाशयातून पाणीपुरवठा करणाऱ्या येतो परंतु पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन जीर्ण झाली आहे ती वारंवार लिकेज होत असल्याने शहराला काही प्रमाणात पाणी पुरवठा करताना अडचणी येतात तसेच येणाऱ्या उन्हाळ्यात शहरवासीयांना पाणीपुरवठा सुरळीत करता यावा यासाठी नगरपंचायतीने पाइपलाइन दुरुस्तीचे काम हाती घेतले असल्याने माढा शहराचा पाणीपुरवठा काही दिवसांसाठी बंद ठेवावा लागत असल्याचे माढा नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा समितीचे सभापती नितीन साठे यांनी सांगितले.

माढा शहरास आष्टी ता. मोहोळ येथील तलावातून पाणीपुरवठा केला जातो. आष्टी ते माढा हे अंतर जवळपास ४२ कि.मी. आहे. त्यातच पाइपलाइन जीर्ण झाली आहे. या योजनेसाठीचा वीजपुरवठा हा स्वतंत्र नाही, यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. त्यातून सतत वीज पंप चालू बंद होण्याच्या प्रकाराने जीर्ण झालेले पाइप वारंवार फुटतात व शहराचा पाणीपुरवठा खंडित होतो.

आष्टी ते माढा दरम्यान खंडाळी गावच्या हद्दीतील जीर्ण झालेले पाइप फुटण्याचे प्रकार घडतात. तेथील जीर्ण झालेले पाइप बदलण्याचे काम नगरपंचायतीने हाती घेतले आहे तर येथील पंप हाऊसला होणारा वीजपुरवठा एक्स्प्रेस लाइन घेऊन सुरळीत चालू राहील अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. यासाठी नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे यांनी विशेष प्रयत्न करून ४५ लाख रुपयांच्या निधीस मंजुरी आणली असल्याचे त्यांनी सांगितले.




# सोलापुरात जुबेर बागवान यांच्यातर्फे अपंगांना मोफत सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० नोव्हेंबर-**

सोलापुरात नई जिंदगी भागात महालक्ष्मीनगर येथे महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटी, बागवान सोशल फाउंडेशन व मानव अधिकार संरक्षण संघटनेच्या संयुक्त विद्यमानाने ज्येष्ठ समाजसेवक व समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणारे समाजसेवकांचा सत्कार समारोहचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यावेळी बार्शीचे बागवान सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटीचे महाराष्ट्र संपर्कप्रमुख, मानवाधिकार संरक्षण संघटनेचे सोलापूर जिल्हा सचिव जुबेरभाई बागवान यांच्यावतीने महालक्ष्मीनगर येथील एका अपंग व्यक्तीला तीन चाकी सायकल देण्यात आली. त्यावेळी मानव अधिकार संरक्षण संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सादिक शेख यांनी जुबेरभाई बागवान यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत बार्शीचे जुबेरभाई बागवान यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटीचे जिलानी खाजा बागवान (jk), हाजी मुस्ताक बागवान मोहोळवाले, आसिफ सलीम बागवान, जावेदभाई हाजी अब्दुल रफिक अक्कलकोटवाले, रफिकभाई शेख, इकबालभाई सोलापूरवाले, तोसीब शेख, सद्दाम मेहताब बागवान अक्कलकोटवाले, शहाबुद्दीन नदाफ, परमेश्वर घुमते, मंजूर भाई खानापुरे, मानव अधिकार संरक्षण संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष दुर्योधन भडकुंबे, जिल्हा अध्यक्ष (आरोग्य विभाग) अकबर शेख, जिल्हा महासचिव परवेज मुल्ला, बार्शीचे शहर उपाध्यक्ष रफिक युसुफ शेख, सोलापूर शहराध्यक्ष अजहर बिजापुरे, शहर प्रतिनिधी मीर मोहम्मद खान, तसेच महालक्ष्मीनगर परिसरातील अनेक महिला, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात सर्व प्रमुख मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी मानवाधिकार संरक्षण संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

# दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि. ३० नोव्हेंबर -**

लेंडवे चिंचाळे शिवारातील चाळीस धोंडा पुलाखाली लावलेली मोटरसायकलची चोरी झाली असून, गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी अनिल बंडगर (रा. सावे, ता. सांगोला) हे आदमापूर येथे देवदर्शनाकरीता मोटरसायकल (क्र. एम. एच. ४५/ ए. टी. ८६५१) वरून गेले होते. परत येताना बाजूला मोटरसायकल लावून झोपले होते.रात्री ९.३० वा. जाग आल्यावर पाहिले असता मोटरसायकल सदर ठिकाणी दिसून आली नाही. आजूबाजूला शोध घेतला. मात्र मोटरसायकल त्यांना मिळून आली नाही. या घटनेचा अधिक तपास हवालदार वैभव हाके हे करीत आहेत.

# ब्रह्मपुरी येथील भीमा नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा करून साठा केल्याप्रकरणी एकाविरूद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३० नोव्हेंबर-**

भीमा नदीपात्रातील विना परवाना बेकायदेशीररित्या स्वतःच्या फायदयाकरीता २० हजार रुपये किमतीची वाळू उपसा करून साठा केल्याप्रकरणी आण्णा भिवा कोकरे(रा.ब्रम्हपुरी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी मंगळवेढा मंडल अधिकारी धनंजय इंगोले यांना तहसीलदार मदन जाधव यांनी फोन करून सांगितले की,सत्यवान दत्तात्रय दुधाळ व विजय संभाजी जावळे यांचे जमीन गट नं.८२२/२ चे पुर्व बाजूस वाळू साठा असून तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देताच फिर्यादी व ब्रम्हपुरीचे तलाठी अजय जिरापुरे,माचणूरचे कोतवाल संजय कुरवडे आदी वाळू साठा असलेल्या ठिकाणी पोहोचले.सदर ठिकाणी वाळू साठा पाहिला असता तो १० ब्रास इतका होता..मात्र रात्रीची वेळ व कडाक्याची थंडी असल्याने सर्वजण १ कि.मी. अंतरावर रोडवर हे सर्व थांबले होते. पहाटे ३.०० च्या सुमारास वाळू साठयाची पाहणी व खात्री करण्यासाठी गेल्यावर प्रत्यक्ष पाहणी केली असता केवळ तेथे १० ब्रास असणारा वाळू साठयाऐवजी ६ ब्रास वाळू असल्याचे निदर्शनास आले. ही वाळू आरोपी आण्णा कोकरे याने नदीच्या पात्रात ढकलून वाळू साठा कमी केल्याचे निदर्शनास आले.दि.२८ रोजी सकाळी ९.४० वा. पंचासमक्ष वाळू साठयाचा पंचनामा करून खाजगी वाहनाने वाळू तहसील कार्यालय,मंगळवेढा येथे साठवणूक केली आहे.२० हजार रुपये किमतीची वाळू शेतकरी सत्यवान दुधाळ व विजय जावळे यांच्या शेतजमीन गट नं.८२२/२ या गटात वाळू साठा केला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान,सध्या शासकिय वाळूचा ठेका कोठेही झाला नसल्यामुळे भिमा व माण नदीपात्रातून रात्रीच्यावेळी मोठया प्रमाणात वाळू उपसा होत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत असून बांधकामाच्या ठिकाणी भले मोठे वाळूचे ढिगारे नागरिकांना दिसून येत आहेत. निवडणूका संपल्यामुळे महसूल विभाग व पोलिस खाते कामातून मुक्त झाल्याने या विभागाने चोरटया वाळूवर लक्ष केंद्रीत करून शासनाची मालमत्ता सुरक्षित राखावी अशी सुज्ञ नागरिकांतून मागणी होत आहे.



# डॉ. बाबा आढाव यांच्या आत्मक्लेष आंदोलनास पाठिंबा : शिवाजी शिंदे

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. ३० नोव्हेंबर-

डॉ. बाबा आढाव यांनी २८ ते ३० नोव्हेंबर असे तीन दिवसाचे महात्मा फुले वाडा, पुणे येथे आत्मक्लेष आंदोलन सुरू केले आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीस प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे असे भासविले जात आहे. ही निवडणूक एव्हीएम या मशीनने जिंकली आहे. या निवडणुकीमुळे लोकशाही लोपपावत चालली आहे. तर हुकूमशाही मार्गाने देश जात असल्याचे हमाल मापाडी महामंडळाचे सहचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे यांनी म्हटले आहे, ते पंढरपूर येथील हमाल मापाडी भवनमध्ये एकदिवशीस आंदोलनात बोलत होते.

यावेळी हमाल मापाडी पंचायतचे माजी अध्यक्ष हरिभाऊ कोळी, अध्यक्ष सिद्धनाथ ढोले, जिल्हा सचिव संतोष सावंत, मार्केट कमिटीचे संचालक आबाजी शिंदे, उपाध्यक्ष गजानन भुईटे, नवनाथ सुरवसे, श्रीमंत डांगे, सुभाष जाधव, नागनाथ घाडगे, खंडू रानगट, रघुनाथ कांबळे, मधुकर वाघ, संतोष ढोले, मारूती ढोले, दादासाहेब बंदपट्टे, संतोष पोरे, श्रीनिवास शिंदे, समाधान आवताडे, विनायक अभंगराव आदीसह मोठ्या प्रमाणात हमाल, तोलार उपस्थित होते.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले डॉ.बाबा आढाव यांनी नुकत्याच झालेल्या निवडणुकीबाबत स्वत:चे आत्मक्लेष आंदोलन सुरू केले आहे. त्या आंदोलनास संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून हमाल मापाडी पंचायत तर्फे व जिल्हा समन्वय समितीतर्फे पाठिंबा दिला आहे. जिल्ह्यात सोमवारी पंढरपूर, सोलापूर, बार्शी, वैराग, अक्कलकोट, करमाळा, कुर्डूवाडी आदी ठिकाणी हे आंदोलन केले जात आहे. या आंदोलनामधून आढाव हे सांगत आहेत की, देशातील लोकशाही संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे तर देशात हुकूमशाही येण्याची चिन्ह दिसत आहे. केंद्रातील सरकार हे उद्योगपतींना धार्जीन आहे. तर सर्व सामान्य जनतेसाठी घातक आहे. डॉ बाबा आढाव यांनी आपले आत्मक्लेष आंदोलन सुरू करून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. आढाव यांच्या आंदोलनास आता राज्यातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.



# उपमुख्याध्यापक एन. बी. बडवे यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० नोव्हेंबर-**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशाला व द. ह. कवठेकर प्रशाला तसेच अध्यापक विद्यालयामध्ये गेली तीस वर्षे कार्यरत असणारे उपमुख्याध्यापक एन. बी. बडवे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार समकरण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नानामालक कवठेकर, एस. पी. कुलकर्णी, डॉ.मिलिंद जोशी, संजय कुलकर्णी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक तरळगट्टी, बारसावडे, संजय रत्नपारखी उपस्थित होते. मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी स्वागत केले. बडवे यांनी संस्थेमध्ये सुमारे तीस वर्षे केलेल्या कार्याचा आढावा घेतला. एस. पी. कुलकर्णी यांनी बडवे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. एन. बी. बडवे यांनी सर्व सहकाऱ्यांचे व संस्थेचे ऋण व्यक्त केले. याप्रसंगी राजेश धोकटे, राजेश खिस्ते, नितीन अवताडे, शामराव उत्पात, श्रीरंग उत्पात, बारसावडे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार ज्येष्ठ शिक्षक आर. एस. कुलकर्णी यांनी मानले. सूत्रसंचालन एस. एम. कुलकर्णी यांनी केले.

# मोटरसायकलला कुत्रे आडवे आल्याने गाडी स्लीप होऊन एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० नोव्हेंबर-**

मोटर सायकलच्या आडवे कुत्रे आल्याने मोटर सायकल स्लीप होवून राजकुमार चंद्रकांत लंगोटे हा जखमी होवून स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याची नोंद मंगळवेढा पोलिसात झाली आहे. दरम्यान हा अपघात मंगळवेढा-सांगोला रोडवरील कचरेवाडी ब्रीजजवळ झाला होता.

यातील मयत राजकुमार लंगोटे याचा मुलगा मंजुनाथ सांगोला येथे शिक्षणासाठी होता.त्याला भेटण्यासाठी व खाऊ देण्यास ते अधून मधून सांगोला येथे जात असत.ते मुलास भेटून एम एच १३ सी.एक्स २८२६ या मोटर सायकलवरून परत येत असताना कचरेवाडी ब्रीजजवळ पेट्रोल पंपाच्या अलीकडे कुत्रे आडवे आल्याने गाडी घसरून पडून सदर मयत हे गंभीर जखमी झाले होते. हा अपघात होताच चंद्रकांत बसवे यांनी मयताचे भाऊ तथा फिर्यादी शिवकुमार लंगोटे यांना फोन करून सांगितले की तुमचा भाऊ गाडी घसरून जखमी अवस्थेत येथे पडला आहे.

तात्काळ फिर्यादी व त्याचा मित्र नितीन माळी व ते घटनास्थळी पोहोचल्यावर जखमी तथा मयत राजकुमार चंद्रकांत लंगोटे (वय ४१) यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# हनुमंत राऊत यांना कृतीशील शिक्षक पुरस्कार जाहीर

**मोहोळ, दि. ३० नोव्हेंबर-**



येथील भैरवनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सहशिक्षक हनुमंत पांडुरंग राऊत यांना महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने दिला जाणारा कृतिशील शिक्षक पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. हा पुरस्कार रविवारी दि.१ डिसेंबर रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत समारंभ पूर्वक दिला जाणार आहे. हनुमंत राऊत यांनी अंकोली येथील भैरवनाथ विद्यालयात राज्यातील पहिली गणित प्रयोगशाळा सुरू केली. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेचे बाळकडू या शाळेत रुजवले. एन एम एस (आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती), महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती या परीक्षेच्या माध्यमातून या शाळेतील मुलांना एक कोटी रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळत आहे. त्यांना आज पर्यंत रयत शिक्षण संस्थेचा कृतिशील पुरस्कार, मुख्याध्यापक संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, डॉ मार्डिकर पुरस्कार, त्याच बरोबर राज्य नवोपक्रम स्पर्धेत सलग चार वेळा पारितोषिक पटकवले आहे. राज्य गणित प्रशिक्षक म्हणून राज्यभरातील हजारो शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे. त्यांना हा पुरस्कार मिळाला म्हणून अंकोली शाळेचे प्राचार्य दुर्गादास मोहिते, शाळा समितीचे सदस्य बाबासाहेब क्षीरसागर,सज्जनराव पवार, संग्राम सिंह पवार, माजी सरपंच संदीप पवार , सरपंच पांडुरंग येळवे, विकास शिंदे, माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी अभिनंदन केले.

# परिस्थितीने केला घात; पोटासाठी राबतातहेत बालकांचे हात

**अनेकांकडून बालकामगारांच्या कष्टाला खतपाणी; कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई कधी होणार?**

**तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

झाडलोट करणे, स्वयंपाकपाणी, साफसफाई, लहान मुलांचा सांभाळ अशा विविध कामांसाठी १८ वर्षांखालील मुलांना जुंपणे बालकामगार कायद्यान्वये गुन्हा असताना, शहरातील अनेक मध्यम वर्गीय कुटुंबांकडून घरकामासाठी जाणते-अजाणतेपणी मुला-मुलींचा वापर होतो. त्यामुळे अनिष्ट अशा बालकामगार प्रथेला खतपाणी मिळत असून, बालकामगार कायद्याचे उल्लंघन होत आहे.

'घरात बालकामगार ठेवणार नाही' असे हमीपत्र कर्मचाऱ्यांकडून भरून घेतले जात आहे, तर बड्या व्यापारी संघटनांच्या बैठका घेऊन व्यापारी-व्यावसायिकांना बालकामगार प्रथेच्या समूळ उच्चाटनाला हातभार लावण्याची शपथ दिली जात आहे. बालदिनाचे औचित्य साधून अतिरिक्त कामगार आयुक्तालयाच्या वतीने बालकामगार प्रथेविरोधात जनजागृती मोहीम राबविली जाते. घरकामासाठी लहान मुलांचा वापर करणे हा बालकामगार कायद्यानुसार मोठा गुन्हा आहे. शहरातील अनेक दुकानांवर व हॉटेल्समध्ये बालकामगारांचा सर्रास वापर होत आहे. परंतु प्रशासन त्याकडे डोळेझाक करत असताना दिसत आहे. वीटभट्ट्यांवर व शेतामध्ये सुद्धा बालकामगारांचा उपयोग केला जातो. खेळण्या-बागडण्याच्या वयात काम करण्याची जबाबदारी पालकांकडून सोपवली जाते, अशा बालकांच्या शिक्षणाकडे सुद्धा पालक दुर्लक्ष करतात परिणामी बालकामगारांची समस्या गंभीर बनली आहे. बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा, १९८६ नुसार १४ वर्षांखालील मुलांना थोकादायक उद्योगांमध्ये आणि हानिकारक प्रक्रियांमध्ये कामावर ठेवण्यास सक्त मनाई आहे. बालकामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या दोषींवर नवीन कायद्यामध्ये कडक दंडात्मक कारवाई करण्याच्या किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्याच्या तरतुदी आहेत.



**अशी आहे कारवाईची तरतूद**

नियमभंग करणाऱ्यांना सहा महिन्यांपासून दोन वर्षांपर्यंत तुरुंगवासः तसेच त्याबरोबरच २० हजार ते ५० हजार रुपये दंड केला जातो. कामावर ठेवणाऱ्या मालकाबरोबर कामाला जाण्याची सक्ती करणाऱ्या पालकांवरदेखील कारवाई करून त्यांच्याकडून दंड वसूल करण्याची तरतूद आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माजी नगरसेवक अनंत जाधव यांच्याकडून फडणवीसांना शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीत भाजपाने मिळविलेल्या भरघोस यशाबद्दल माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोलापुरातील माजी नगरसेवक अनंत जाधव (नेता) यांनी मुंबईत सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना देखील अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील व अनंत जाधव जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.





### संक्षिप्त वृत्त...

## फुलवाडी येथील नागनाथ यात्रेला आजपासून सुरुवात



**अणदूर, दि. ३० नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथील जागृती देवस्थान म्हणून प्रसिद्ध व अनेकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री नागनाथ महाराज यात्रेस आज रविवारी (दि.१) पासून सुरुवात होत आहे.यानिमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक विधी व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात रविवारी (दि.१) पहाटे ४ ते ९ यावेळेत श्री च्या मूर्तीस अभिषेक,महापूजा,महाआरती.दिवसभर नवस फेडणे,दण्डवंत घेणे आदी कार्यक्रम असतील. सायंकाळी ६ ते १० यावेळेत 'श्री' ची पालखी मिरवणूक व मानाच्या नंदीध्वजची मिरवणूक तर रात्री १० वाजता भजनाचा व भारुडाचा कार्यक्रम होणार आहे.सोमवारी (दि.२) सकाळी ७ वाजता 'श्री' ची पालखी मिरवणूक,नंदीध्वज मिरवणूक व अग्नी प्रवेश कार्यक्रम होणार आहेत.यात्रेच्या दोन्ही दिवशी महाप्रसादाचे व्यवस्था करण्यात आली आहे.यात्रेनिमित्ताने मंदिर रंगरंगोटी व मंदिर परिसरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.यात्रेकरूंच्या सोयीसाठी ग्रामपंचायत कार्यालय, नागनाथ महाराज कमिटी व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.



## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळा परिसराची स्वच्छता

**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनाच्या दुसऱ्या दिवशी शहरातील सुपर मार्केट समोरील त्यांच्या पुतळा परिसराची स्वच्छता करून सामाजिक कार्यकर्त्यांनी अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनी विविध संघटना, संस्थांनी त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले होते. दुसऱ्या दिवशी महापालिका स्वच्छता विभागाने येथील पुतळा परिसराची स्वच्छता करणे आवश्यक होते मात्र तसे न केल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन येथील स्वच्छता केली. पुतळा परिसर स्वच्छ करून थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महापालिकेने शहरातील प्रत्येक महापुरुषाच्या पुतळा परिसराची स्वच्छता केली पाहिजे. पावित्र्य राखले गेले पाहिजे. याकडे महापालिकेचे लक्ष वेधले, अशी भावना मराठा क्रांती मोर्चाचे राज्यसमन्वयक राम जाधव यांनी व्यक्त केली. यावेळी अजिंक्य शिंदे, राहुल दहिहंडे, राजा गेजगे, वीरेश कलशेट्टी, अतुल खांडेकर आदी उपस्थित होते.



## केंद्रस्तरीय स्पर्धेत लक्ष्मीनगर शाळेचा ओम घड्याळे धावण्याच्या स्पर्धेत प्रथम

**पिलीव, दि. ३० नोव्हेंबर-**

जिल्हा परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून केंद्रस्तरावर कबड्डी, खो-खो, लंगडी हे सांघिक खेळ तर वैयक्तिक स्पर्धेत १०० व २०० मिटर धावणे, बुद्धीबळ अशा स्पर्धांचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. पिलीव केंद्राच्यावतीने या केंद्रस्तरीय स्पर्धेचे सुळेवाडी येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पिलीव केंद्रातील सर्वच शाळांनी सहभाग घेतला होता. यामध्ये कूसमोड येथील लक्ष्मीनगर शाळेचा विद्यार्थी ओम शशिकांत घड्याळे याने १०० मिटर व २०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत पिलीव केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला. ओम याच्या या यशाबद्दल कुसमोडच्या उपसरपंच स्वाती मदने, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घड्याळे, उपाध्यक्षा स्वाती गारुळे, माजी उपसरपंच संजय पाटील, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सुनिल डुरे यांनी अभिनंदन केले.

## दीपकआबा साळुंखे-पाटील पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेवर..?

**सांगोला,दि.३० नोव्हेंबर-**



माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी पुन्हा स्वगृही म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परत जावे यासाठी आता दीपकआबांप्रेमी कार्यकर्त्यांनी आग्रह धरला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार असूनही घटक पक्षांनी आपली फसवणूक केली. त्यामुळेच पराभव झाला. त्यामुळे आपण आता महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात न थांबता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा सक्रिय व्हावे, अशी मागणी पराभवाचे चिंतन करण्यासाठी झालेल्या बैठकीत कार्यकर्त्यांनी भूमिका व्यक्त केली. यावेळी दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करूनच पुढील राजकीय भूमिका ठरविणार असल्याचे सांगितले आहे.

# पाऊस कमी तरीही रब्बी पिके जोमात

## आंतरमशागतीची कामे सुरु; कांदा काढणीलाही मोठा वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० नोव्हेंबर-**

दक्षिण तालुक्यात रब्बी हंगामातील शेतीकामांना गती येऊ लागली आहे. मध्यंतरीच्या पावसाने रब्बीच्या कामांना काहीसा 'ब्रेक' लागला होता; मात्र आता पुन्हा एकदा शेतशिवार गजबजून जाऊ लागले आहे.

दिवाळीनंतर आता दक्षिणमध्ये रब्बी पिकांची पेरणी, आंतरमशागती या कामांना वेग येऊ लागला आहे. पूर्व भागातील कुंभारी, वळसंग व परिसरात रब्बी हंगामातील शेतीकामांना वेग आला आहे. गहू, हरभरा पिकांच्या पेरणीची लगबग सुरू झाली आहे. दक्षिण तालुक्यात रब्बी ज्वारीची पेरणी ९० टक्के झाली असल्याची माहिती कृषी विभागाने दिली. यंदा पावसाळ्यात जास्त पाऊस झाला. भूजल पातळीत चांगलीच वाढ झाली. मात्र परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने खरिपातील रखडलेल्या कांदा काढणीला वेग आला आहे. त्यातच ऑक्टोबरमध्ये वाढलेल्या उन्हाच्या चटक्यांमुळे जमिनीतील ओलावा काहीसा कमी होऊ लागला आहे. परतीचा पाऊस झाल्याने काही ठिकाणी शेतकरी चांगलेच अडचणीत आहेत. आता रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्यांसाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. मात्र, आर्थिक चणचण भासत असल्याने शेतकरी कर्ज काढून रब्बीची तयारी करू लागला आहे. कांद्याची काढणी सुरू असून ती अंतिम टप्प्यात आली आहे. नुकसानीमुळे कांदा पिकाच्या उत्पादनात ५० ते ६० टक्के घट येण्याची शक्यता आहे. मका पिकाची काढणी सुरू असून भुईमूग पिकाची काढणी पूर्ण झाली आहे.



### ज्वारीच्या क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता

रब्बी ज्वारी, गहू, हरभरा मका पिकांच्या पेरणीस वेग आला आहे. थंडीची चाहूल लागताच रब्बीतील गहू पेरणी करण्याच्या तयारीत शेतकरी आहे. चालूवर्षी झालेल्या चांगल्या पावसामुळे गहू, हरभरा, ज्वारी पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी होण्याची शक्यता आहे. यामध्ये ज्वारी व हरभरा पिकांच्या क्षेत्रात वाढ होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.



यंदा पाऊस काही भागात जास्त तर काही भागात कमी झाला आहे. अशात बी-बियाणे, पशुखाद्य, खतांचे भाव गगनाला भिडले आहेत. अशात जीएसटीही आकारण्यात येत आहे. कांद्याला व्यवस्थित भाव मिळत नाही. कांद्याचे अनुदानही मिळाले नाही. नव्या शासनाने शेतकऱ्यांच्या मनगुटीवरील भाववाढ आणि जीएसटी कमी करावी.

**- यशवंत कटारे, प्रगतशील शेतकरी, कुंभारी**

### गहू, हरभऱ्याची पेरणी सुरुच

काही शेतकऱ्यांनी ज्वारी पिकाच्या पेरण्या पूर्ण केल्या असून पेरणी झालेली ज्वारी उगवणीच्या व वाढीच्या अवस्थेत आहे. अनेक ठिकाणी ज्वारीची पेरणी संपत आली असून गहू, हरभरा पेरणी सुरू आहे.

# सांगोला तालुक्यासाठी मिळाल्या नवीन सहा रुग्णवाहिका

### माजी आ. शहाजीबापू पाटील यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० नोव्हेंबर-**

माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या मागणीला यश आले असून सांगोला तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन रुग्णवाहिकेची पूर्तता झाली आहे. त्यामुळे गावातील गरोदर महिला, नवजात शिशु, लहान मुले तसेच अपघातग्रस्त, सर्वसामान्य रुग्णांना गाव, घरापासून ते प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत तातडीने उपचारासाठी सोयीचे झाले आहे असे मत माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

सांगोला तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेना १० वर्षे पूर्ण झाल्यामुळे शासनाच्या नियमाप्रमाणे त्या आरोग्य विभागाकडे जमा होणार आहेत. सांगोला तालुक्याचे क्षेत्रफळ मोठे असल्याने गावे वाड्यावस्त्या चौहो बाजूंनी विखुरलेली आहेत. त्यामुळे त्या गावातील रुग्णांना वेळेत रुग्णसेवा मिळावी, वैद्यकीय उपचार मिळण्यास विलंब लागू नये या दृष्टीने नव्याने सर्व सोयी सुविधा अशा रुग्णवाहिका मिळाव्यात म्हणून तत्कालीन आ.शहाजीबापू पाटील यांनी दीड वर्षांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी शासनस्तरावरून नवीन सहा रुग्णवाहिका उपलब्ध झाल्या होत्या. परंतु आचारसंहितेमुळे त्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ताब्यात दिल्या नव्हत्या. शनिवारी सांगोला पंचायत समितीच्या आवारात त्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे सुपूर्द केल्या.



### माजी आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते पूजन

सांगोला तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नव्याने मिळालेल्या ६ रुग्णवाहिकेंचे पूजन शिवसेनेचे माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून श्रीफळ फोडून केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश खांडेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.कल्याण ढाळे, संजय मेटकरी, आरोग्य सहाय्यक जिलानी काझी, आरोग्य कर्मचारी तसेच रुग्णवाहिकेचे सर्व चालक उपस्थित होते.

## कस्तुरी पार्कातील रोहित्रातून ऑईलची चोरी

**नातेपुते, दि. ३० नोव्हेंबर-**

मजरेवाडी परिसरातील कस्तुरी पार्क या रहिवाशी भागात असलेल्या रोहित्रातील ऑईलची चोरी करण्यात आली. हा प्रकार २७ ते २८ नोव्हेंबरच्या दरम्यान घडली.

याबाबत स्वागत नगर शाखा कार्यालयातील सदानंद भगवान रणझुंजारे (वय ४५) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात ऑईल चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कस्तुरी पार्क येथे महावितरण कंपनीचा रोहित्र आहे. येथे असेलल्या दोन्ही रोहित्रामधील ऑईल २७ नोव्हेंबरच्या रात्री साडेआकारा ते २८ नोव्हेंबरच्या सकाळी साडेदहाच्या यादरम्यान अज्ञाताने चोरून नेले. या ऑईलची किमत सुमारे १५ हजार असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# अक्कलकोट विधानसभेला मंत्रीपद कधी मिळणार?

### भाजपाचे कट्टर समर्थक विश्वनाथ मोटगी यांच्यासह कार्यकर्त्यांची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २९ नोव्हेंबर-**

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून आलेल्या आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना यंदा मंत्री पद मिळणार का? याकडे लक्ष असेल तर अक्कलकोट तालुक्यातील जनसामान्य कार्यकर्त्यांची अपेक्षा वेगळीच दिशा पकडत आहे. अक्कलकोट विधानसभेला कधीच मंत्रीपद मिळाले नाही. मंत्रीपद कधी मिळणार? अशी जनतेमध्ये चर्चा चालू आहे.



**आ. सचिन कल्याणशेट्टी**



**विश्वनाथ मोटगी**

या तालुक्याला गृहराज्य मंत्रीपद एकदाच मिळाले. या तालुक्याला एकदा तरी मंत्रीपद मिळावे. यंदाच्या राजकारणामध्ये आ. सचिन कल्याणशेट्टी उच्चांक गाठत भरघोस मताने निवडून आले आहेत. आ. कल्याणशेट्टी हे मंत्री पदाची वाट पाहत असेल तर आम्ही कार्यकर्ते मुख्यमंत्रीपदाची आशा करत आहोत, असे कट्टर कार्यकर्ते विश्वनाथ मोटगी यांनी मुलाखतीत सांगितले. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्याचा भरपूर विकास झाला. भरपूर निधी मिळाल्याने रस्ते काम उत्कृष्ट झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री बनवून देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना साथ दिली. तसेच आ. सचिन कल्याणशेट्टी यांना मुख्यमंत्री बनवून अक्कलकोटवाशियांची आशा सार्थ करावी, अशी अपेक्षा कट्टर भाजप कार्यकर्ते विश्वनाथ मोटगी यांच्यासह कार्यकर्त्यांची आहे.

# ईव्हीएमला दोष देण्यापेक्षा आत्मचिंतन करा : अक्षय भांड

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ३० नोव्हेंबर-**

विधनसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं आहे. त्यामुळं राज्यात पुन्हा एकदा महायुतीचंच सरकार स्थापन होणार आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विरोधकांकडून ईव्हीएमबाबत संशय व्यक्त केला आहे. या मुद्यावरुन भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावरही टीका होत असल्याची राष्ट्रवादी सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांनी तरुण भारतशी बोलताना सांगितले.



ते पुढे म्हणाले माळशिरस तालुक्यातील लोकांनी विकासाला मतदान केले आहे माळशिरस तालुक्यातील जनता ही दोन्ही गटांना कंटाळली आहे म्हणून त्यांनी तिसरा पर्याय निवडला आणि महायुतीचे उमेदवाराच्या पाठीशी उभी राहीली आम्ही सर्व महायुतीचे नेते, पदाधिकारी,कार्यकर्ते प्रामाणिक पणे लढलो, पण थोड्या मतांनी आमचा पराभव झाला तो पराभव आम्ही नम्रपणे मान्य करून आज राज्या मध्ये आमचे सरकार आहे माळशिरस तालुक्यासाठी जे काही करता येईल तेवढे करण्याचा आमचा प्रयत्न आहे पण काही लोकांना विजय होऊन ही तो पचवता येत नाही याची मोठी खंत आहे. माळशिरस तालुक्याच्या विकासा चा विचार केला पाहिजे पण काही लोक फक्त ईव्हीएम करत सुटले आहे त कदाचित त्यांची पाच वर्षे ईव्हीएमला दोष देण्यात जातील असे मला वाटते. पण आम्ही मात्र राज्याचे नेते अजितदादांच्या माध्यमातून मोठा निधी तालुक्यासाठी आणार आहे.

# पंढरपुरातील आर्य वैश्य कोमटी समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सामुदायिक वाढदिवस साजरा

### दोन वर्षांपासून उपक्रम सुरु; अन्य समाजांनीदेखील अनुकरण करण्याची गरज

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. ३० नोव्हेंबर-**

रोजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे. जीवनात एकीकडे दु:खाचा, काळजीचा, आरोग्याच्या समस्यांचा प्रत्येक जण सामना करीत असतोच पण जीवन जगत असताना दु:खा बरोबरच आनंदाचे काही क्षण देखील प्रत्येकाच्या जीवना मध्ये येत असतात. येथील आर्य वैश्य कोमटी समाजातील ज्येष्ठ नागरिक समितीच्या वतीने देखील गेल्या काही महिन्यांपासून आपल्यातील प्रेमाची ही विण सामुदायिक वाढदिवसांचा उपक्रम राबवुन काहीसा घट्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेष म्हणजे समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचा सामुदायिक वाढदिवस याच समाजातील इतर ज्येष्ठ व्यक्तीं एकत्रित येवून साजरा करतात. खरोखरच ही कौतूकास्पद अशी बाब आहे.

येथील आर्य वैश्य कोमटी ज्येष्ठ नागरिक समितीचे वतीने आर्य वैश्य कोमटी समाजातील जेष्ठ व्यक्तींचा सामुदायिक वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला. या सामुदायिक वाढदिवसा निमित्तच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून येथील ज्येष्ठ पत्रकार रमेश घळसासी हे आवर्जुन उपस्थित होते. पंढरपूर येथील आर्य वैश्य कोमटी समाजाचे शहरातील अर्थकारणात देखील मोठे योगदान आहे. गेल्या पंच्याहत्तर वर्षांपासून या समाजातील अनेक थोर व्यक्ती राजकीय व सामाजिक क्षेत्रातही अग्रेसर राहिल्या आहेत. यावेळी समितीचे अध्यक्ष शरदराव नलबिलवार, उपाध्यक्ष प्रफ्फुल सातारकर-गडम, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रभाकरराव कौलवार आवर्जुन उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी असलेल्या रमेश घळसासी यांनी देखील ज्येष्ठ नागरिकांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतूक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ कार्यकर्ते शिरीष पारसवार यांनी तर समितीचे सेक्रेटरी प्रमोद पारसवार यांनी भूमिका विषद केली. आभार प्रदर्शन सुभाष गुज्जलवार यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरेंद्र कवठेकर यांनी केले.




### एकीच्या बळाचे कौतुक

आजच्या धकाधकीच्या जीवनात इतर समाजाने देखील या मंडळींची प्रेरणा घेऊन आपआपल्या समाजाप्रती थोडासा वेळ देवून आपआपल्या समाजातील महिला, मुली, तरुण, ज्येष्ठ नागरिकांचे एकत्रित वाढदिवस तसेच इतर विविध समाजोपयोगी कार्यक्रम साजरे करुन आपल्या समाजबांधवांचे सुख, दु:ख, अडीअडचणी जाणून घेवून, आपला समाज एकत्रित ठेवण्यासाठी, पर्यायाने आपला गाव, राज्य, देश आणि धर्म एकसंघ राखण्यासाठी खरोखरच प्रयत्न करण्याची गरज आहे. या बरोबरच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीं सांगतात एक रहोंगे तो सेफ रहोंगेची खऱ्या अर्थाने पुर्तता होण्यास मदत होईल.

कार्यक्रमात कोमटी समाजातील प्रतिष्ठान जेष्ठ व्यापारी लादे, गुंडेवार, गडम, द.सि.संत, माऊली कौलवार, पल्लेवार, बाळासाहेब कोंडेवार, बाळासाहेब सातारकर यांचेसह इतर समाजबांधव उपस्थित होते. हा कार्यक्रम चंद्रभागेच्यातिरी कासार घाटावर असलेल्या प्राचीन शिवमंदिर अर्थात कोमटी समाजाचेच श्री नगरेश्वर मंदिर येथे संपन्न झाला. महाप्रसादाने या सामुदायिक वाढदिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

विशेष म्हणजे एकीकडे ज्येष्ठ असल्यामुळे कुटुंब किंवा परिवार तसेच समाज यातून नकळत थोडासे बाजूला पडलेले असताना देखील सामुदायिक वाढदिवसाच्या निमित्ताने जीवनातील आनंदाच्या क्षणाचे साक्षीदार होण्याचा या ज्येष्ठ मंडळींनी राबविलेला हा उपक्रम खरोखरच कौतूकास्पद तर आहेच पण त्याहून तो स्तुत्य देखील आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तेजज्ञान फाउंडेशनतर्फे धाराशिवात आज रजत जयंती ध्यान महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
'हॅपी थॉट्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशन या आध्यात्मिक सेवाभावी संस्थेच्या स्थापना दिनाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त रविवारी, १ डिसेंबर २०२४ रोजी, रजत जयंती ध्यान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मेघमल्हार फंक्शन हॉल, बसस्टँडजवळ, धाराशिव येथे हा महोत्सव होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन धनाजी दत्तात्रय आनंदे (सचिव, मराठवाडा कॉमर्स अँड इंजिनियर असोसिएशन) आणि युवराज नळे यांच्या हस्ते होणार आहे. तेजज्ञान फाउंडेशनच्या माध्यमातून जगभर ध्यान साधना आणि आध्यात्मिकतेच्या प्रचार-प्रसाराचे कार्य केले जाते. ध्यानाच्या माध्यमातून शांती आणि आनंद पसरविण्याचा उद्देश या महोत्सवाच्या माध्यमातून साधला जाणार आहे. कार्यक्रम रविवारी दुपारी १२ ते २ या वेळेत होईल. ११.३० वाजेपर्यंत आपले स्थान ग्रहण करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### महाराष्ट्र संत विद्यालयात पालक मेळावा संपन्न

**तेर, दि.३० नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालयात पालक मेळावा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र संत विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.के. बेदरे होते. तर हभप रघुनंदन महाराज पुजारी, नवनाथ नाईकवाडी, महीला गट प्रवर्तक पूजा चव्हाण, विश्वनाथ आबदारे, पवण भंडारे, मनोज हेगडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्याध्यापक जे.के. बेदरे, हभप रघुनंदन महाराज पुजारी, विश्वनाथ आबदारे, एस.टी. कोळी, पूजा चव्हाण, तानाजी देवकर, अविनाश पाडुळे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन एल.टी. चव्हाण यांनी केले तर आभार एस.एस.बळवंतराव यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.



### आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्काराने दीपक करदूरे सन्मानित

**जळकोट, दि.३० नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील मूळ रहिवासी व सध्या पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात तलाठी या पदावर कार्यरत असलेले दीपक यशवंत करदुरे यांना महसूल क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल नालंदा ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्याचा सन २०२४ सालासाठीचा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नालंदा ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य या प्रतिष्ठित संस्थेकडून विविध स्तरावरील मान्यवरांना व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना नालंदा ग्राम समृद्धी पुरस्कार सोहळा हा कार्यक्रम वर्षाला घेण्यात येत असतो. यावर्षीचे पुरस्कार पुणे येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. यात जळकोट (ता. तुळजापूर) या गावचे मूळ रहिवासी असलेले व महसूल क्षेत्रात सध्या कार्यरत असलेले दीपक करदुरे यांचा आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्काराने सहकुटुंब गौरवण्यात आले.



### व्यापारी महासंघातर्फे संविधान रॅलीत विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून आणि भारतीय संविधान स्विकृतीला ७५ वर्ष पुर्ण झाल्याबद्दल शहरातुन संविधान रॅली काढण्यात आली. संविधानाचा गौरव म्हणुन दरवर्षी मतदार जनजागरण समितीच्या वतीने संविधान जनजागरण रॅली काढण्यात येते. रॅलीत व्यापारी महासंघातर्फे विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी एम.डी. देशमुख, अब्दुल लतिफ, कार्याध्यक्ष गणेश वाघमारे, शेख रऊफ, अमर आगळे, सय्यद, लक्ष्मीकांत जाधव, संजय मंत्री, आयुब पठाण उपस्थित होते.

### उमरग्यात दोन गटात हाणामारी

**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
उमरगा तालुक्यातील कदेर येथील गोपाळ मठपती यांना बाळू आणि अमोल चौधरी या दोघा भावांना शेत रस्त्याच्या कारणावरून हाणामार करून जखमी करण्यात आली. याप्रकरणी आरोपी विरोधात उमरगा पोलिसात गुन्ह दाखल करण्यात आला आहे.

# धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्गाचे २५ टक्के काम पूर्णत्वाकडे

## राष्ट्रीय महामार्गावर असणार सर्वात मोठा १०६ मीटर लांबीचा पूल : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
ठाकरे सरकारने राज्याच्या हिश्शयाचा वाटा न दिल्यामुळे रखडलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या कामाला आता मोठी गती आली आहे. धाराशिव-तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर कामापैकी साधारणपणे आठ किलोमीटर अंतराचे काम मोठ्या वेगात सुरू आहे. जवळपास २५ टक्के काम पूर्णत्वाकडे आले असून या मार्गावर एकूण लहान-मोठे एकूण ५० पूल असणार आहेत. त्यापैकी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल साकारला जाणार असल्याची माहिती आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या पहिल्या टप्प्यातील २५ टक्के काम पूर्णत्वाच्या दिशेने आले आहे. सध्या तीन टप्प्यात काम सुरू आहे. त्यानुसार खोदकाम, भराव आणि पुलांच्या कामांना हाती घेण्यात आले आहे. धाराशिव ते तुळजापूर या ३० किलोमीटर अंतरावर एकूण १७ मोठे पूल असणार आहेत. तर ३३ छोटे पूल साकारले जाणार आहेत. एकूण ५० छोटे-मोठे पूल ३० किलोमीटर अंतरावर आहेत. त्यात रेल्वे स्थानकाजवळ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल उभारण्यात येणार आहे. या पुलाच्या नकाशांचे काम अंतिम टप्प्यात आहे. पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटरच्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी ५४४ कोटी रूपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. या मार्गावरील अन्य पुलांच्या कामांना डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच हाती घेतले जाणार असल्याचेही आ. पाटील यांनी सांगितले. रखडलेल्या कामांना महायुती सरकारकडून निधीची उपलब्धता करून देण्यात आल्यानंतर मोठी गती आली आहे. उपळा ते सांजा आणि पुढे पळसवाडीपर्यंत साधारणपणे आठ किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचे खोदकाम आणि भरावाचे काम पूर्णत्वाच्या टप्प्यात आले आहे. त्यामुळे ठरविलेल्या उद्दिष्टाप्रमाणे दोन वर्षांच्या आत रेल्वेमार्ग तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्रापर्यंत पोहोचेल असा विश्वासही आ. पाटील यांनी व्यक्त केला.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यात धाराशिव जिल्ह्यातील कामाचे दोन स्वतंत्र टप्पे केले आहेत. या रेल्वेमार्गावर एकूण ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल असणार आहेत. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ३२ गावांतील एक हजार ३७५ एकर जमीन त्यासाठी भूसंपादीत करण्यात आली आहे. संपादीत जमिनीच्या वाढीव मावेजासाठी दोन्ही जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर रेल्वेमार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानके उभारली जाणार आहेत. धाराशिव ते सांजा या १० किलोमीटर अंतरावर सांजा येथे पहिले रेल्वे स्थानक असणार आहे. सांजा ते वडगाव या १२ किलोमीटर अंतराच्या टप्प्यावर दुसरे रेल्वेस्थानक तर वडगाव ते तुळजापूर या आठ किलोमीटर अंतरावर तिसरे स्थानक उभारले जाणार आहे.

या रेल्वेमार्गावर एकूण चार स्थानके असणार आहेत. त्यात धाराशिव येथील सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रेल्वेस्थानकाचाही समावेश आहे. मुख्य रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी नुकतेच नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २१ कोटी रुपयांचा निधी सुपूर्द केला असल्याचेही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

### युध्द पातळीवर काम सुरु...

सध्या खोदकाम आणि भरावाचे काम वेगात सुरू आहे.



नियोजित उद्दिष्टानुसार युध्द पातळीवर काम सुरू असल्याने पुढील आठवड्यापासून या मार्गावरील पुलांच्या कामांना सुरूवात होणार आहे. भरावानंतर ब्लँकेटींग त्यानंतर बलास म्हणजेच खडी अंथरण्याचे कामही हाती घेतले जाणार आहे. ते पूर्ण होताच स्लीपरच्या कामाला सुरूवात होईल. स्लीपरचे काम जसजसे पुढे जाईल, तसतसे रेल्वेची मुख्य पटरी अंथरण्याचे काम हाती घेतले जाणार असल्याची माहिती आ. पाटील यांनी दिली.

# तुळजापुरात हॅलो मेडिकल फाउंडेशनचे युवा जागर अभियान

## छेडछाड, बालविवाह, व्यसन आणि ताणतणावावर विद्यार्थ्यांना तज्ञांचे मार्गदर्शन...




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० नोव्हेंबर -**
शालेय महाविद्यालयीन जीवनातील तरुण-तरुणी मधील छेडछाड ताणतणाव व्यसन यांना जुगारून देत सकस सशक्त समतावादी न्यायप्रिय समाज व्यवस्थेला अभिप्रेत असलेल्या व्यक्तिमत्व विकासासाठी हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या वतीने कुलस्वामिनी विद्यालय आणि जिजामाता कन्या प्रशाळेमध्ये दि.२९ नोव्हेंबर रोजी युवा जागर अभियान राबविण्यात आले यामध्ये छेडछाडीला विरोध निकळ मैत्रीला प्रोत्साहन व्यसनाचे दुष्परिणाम ओळखून त्यापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन शिक्षण नोकरी करियर नातेसंबंधातून येणाऱ्या ताणतणावाची व्यवस्थापन यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक भैरवनाथ कानडे आणि पंचायत समितीचे माजी सभापती शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना वासंती मुळे यांनी केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलस्वामिनी शाळेचे मुख्याध्यापक आरएस ठोंबरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ प्राध्यापिका हराळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. छेडछाड एक सामाजिक समस्या नाहीतर ती कायद्यानेही गुन्हा आहे आणि छेडछाड करणाऱ्या या गुन्ह्याचा शिकार बनला तर त्याचेही आयुष्य उध्वस्त होत जाते आणि समाज व्यवस्थेचे गणित बिघडत जाते म्हणून या छेडछाडीच्या मानसिकतेला हद्दपार करण्यासाठी हॅलो फाउंडेशन संपूर्ण तालुक्यात युवा जागर अभियान राबवत आहे.

यावेळी कुलस्वामिनी शाळेचे शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुनाच्या प्रकरणात आरोपीला अजीवन कारावासाची शिक्षा

## जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
खुनाच्या प्रकरणात केशव श्रीराम केंद्रे या आरोपीला जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एस. गुप्ता यांनी अजिवन कारावास



आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

आरोपी केशव श्रीराम केंद्रे (रा. फुलवळ ता. कंधार, जि. नांदेड) आणि मृत संजय गायकवाड (रा. आळण ता. जि. परभणी) हे दोघेही हर्मूल जेलमध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना त्यांची ओळख झाली होती. लॉकडाऊनमध्ये दोघेही पॅरोलवर बाहेर आले होते. त्यानंतर आरोपीने गायकवाडला ड्रायव्हरच्या कामाचे आमिष दाखवून बोलावून घेतले आणि त्याचा लोखंडी व्हील स्पॅनरने मारहाण करून खून केला. त्यानंतर त्याचे प्रेत तेर शिवारात तेरणा धरणाजवळ उसाच्या शेतात टाकून दिले.

याप्रकरणी आकाश गायकवाड यांनी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षाच्या वतीने १८ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपी व मयताच्या मोबाईल फोनचे टावर लोकेशन एकाच ठिकाणी असल्याचे आढळून आले. साक्षीदारांच्या साक्षी आणि पुराव्यांवरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले.

या खटल्यात महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल एस.व्ही. दसवंत आणि पोलीस कॉन्स्टेबल एस.एन. शेळके यांनी काम पाहिले. अभियोग पक्षाच्या वतीने एम.एस. जोशी आणि सचिन एस. सुर्यवंशी यांनी बाजू मांडली.

# वाशी तालुक्यात थंडीची कमाल; चहाची धमाल

## थंडीच्या हुडहुडीमुळे चहा प्रेमी वाढले...

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.३० नोव्हेंबर -**
राज्यात थंडीची मोठी लाट उसळली आहे. किमान व कमाल तापमानात घसरण झाल्याने हुडहुडी भरत आहे. दिवसभर वातावरणात गारवा असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून थंडीने कमाल केली आहे.

यात वाशी तालुक्यातील तेरखेडकरांनी थंडीच्या दिवसात मॉर्निंग वॉकला जात व्यायाम आणि योगासन करण्यावर भर दिला आहे.



तर अनेक नागरिक थंडीचा ऋतू आहे. आणि प्रत्येक ऋतूचा आनंद घेतला पाहिजे म्हणत मनसोक्तपणे गुलाबी, बोचऱ्या थंडीचा आनंद लुटत आहेत. तर थंडीने केलेली कमला आणि त्यात चहाने मोठी धमाल उडवून दिली आहे. उबदार म्हणून हॉटेल देखील होत थंडीच्या दिवसात तेरखेडा येथील नागरिकांनी गरम चहा पिण्यावर भर दिला आहे.

यामुळे चहा प्रेमींची संख्या देखील वाढत आहे.

पहाटेच्या या गुलाबी थंडीमुळे वाशी तालुक्यातील व्यवसायकांची आर्थिक उलाढाल आहे.

# अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी युवकांनी पुढे यावे : माटे

**लोहारा, दि.३० नोव्हेंबर -**
समाजातील वाईट प्रवृत्तीला आवर घालण्यासाठी षंढ नव्हे तर दंड थोपटून बंड करणार्या युवकांची आवश्यकता आहे. त्यामुळे समाजात घडत असलेल्या वाईट घडामोडी रोखण्यासाठी युवकांनी पुढे यावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते तानाजी माटे यांनी केले आहे.

हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या वतीने हिंसा मुक्त समाजासाठी युवा जागर अभियान अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ विद्यालय हिप्परगा (रवा) (ता. लोहारा) येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संजय भोईटे होते. यावेळी बसय्या स्वामी, गोपीनाथ मैंदाड,बी. जे. मनोहर, एस.के. जाधव, ए. व्ही. जाधव, तालुका समन्वयक सतिश कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सीईओ डॉ. मैनक घोष यांच्याकडे जिल्हाधिकारी पदाचा पदभार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे हे २ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी येथे प्रशिक्षणासाठी जात आहे.

त्यामुळे जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार डॉ.ओंबासे यांनी आज २९ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष यांच्याकडे सोपविला.

# धाराशिवच्या जिल्हाधिकारी कार्यालयात खासगी गाडीचा गैरवापर?

## महिला उपजिल्हाधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात खासगी गाडीचा गैरवापर होत असल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यात बेकायदेशीर वाळू उपसा आणि वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गौण खनिज अधिकाऱ्यांना पूर्वी स्वतःची खासगी गाडी वापरावी लागत होती किंवा भाड्याने गाडी घ्यावी लागत होती. यासाठी त्यांना 'सुझुकी एर्टिगा' ही खासगी गाडी भाड्याने घेण्यात आली होती. मात्र, काही महिन्यांपूर्वी गौण खनिज अधिकाऱ्यांना महिंद्रा बोलेरो ही नवीन सरकारी गाडी मिळाली.

नवीन सरकारी गाडी उपलब्ध झाल्यानंतर 'सुझुकी एर्टिगा' (क्र. एमएच २५/बी १६३९) ही खासगी गाडीचा वापर बंद करणे अपेक्षित होते. परंतु, एका महिला निवासी उपजिल्हाधिकाऱ्याने ही गाडी अजूनही वापरात ठेवल्याचे आढळून आले आहे. ही महिला अधिकारी सुट्टीच्या दिवशी याच गाडीने लातूर, सोलापूर अशा शहरांना जाताना दिसत असल्याने सरकारी निधीचा गैरवापर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी हे क्षेत्रीय अधिकारी नसल्यामुळे त्यांना शासकीय किंवा भाडेतत्त्वावरील वाहन अनुज्ञय नाही.

तरीसुद्धा बेकायदेशीररित्या स्वतःच्या वैयक्तिक गरजा भागवण्यासाठी उपजिल्हाधिकाऱ्याकडून शासनाच्या निधीचा गैरवापर करणे सुरू आहे. याशिवाय, या महिला उपजिल्हाधिकाऱ्यांवर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्या उमरग्यात तहसीलदार असताना सरकारी जमीन खासगी व्यक्तीला विकल्याप्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आले होते.

सदरील महिला उपजिल्हाधिकारी ह्यांची पहिल्यांदा शासन सेवेत नियुक्ती नायब तहसीलदार म्हणून झाली. त्यावेळी त्यांनी विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यानंतर त्यांची एमपीएससीमार्फत पुन्हा परिक्षा देऊन सरळसेवेने तहसीलदारपदी निवड झाली.



मात्र त्यांनी तहसीलदार पदावर निवड झाल्यानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण न करता उपजिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती मिळवली. त्यामुळे त्यांची उपजिल्हाधिकारीपदी झालेली पदोन्नती ही बेकायदेशीर आहे.

या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

या प्रकरणात दोषी आढळल्यास संबंधित महिला अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# मोबाईल शॉपी फोडणारे दोन आरोपी गजाआड; ५ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**

भूम शहरातील एका मोबाईल शॉपीच्या दुकानाचे शटर तोडून विविध कंपन्यांचे मोबाईल चोरून नेणाऱ्या दोघा आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने गजाआड केले आहे. त्यांच्याकडून २५ मोबाईल असा एकूण ५ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी भूम पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १८ ते १९ नोव्हेंबरच्या दरम्यान घडली होती.

याबाबत माहिती अशी की, मोहन रामचंद्र बागडे (वय ४१, रा. शिवाजी नगर भुम, जि. धाराशिव) यांचे वेताळ रोड भुम येथील जय म्युझीकल अॅण्ड मोबाईल शॉपी नावाचे मोबाईलचे दुकानाचे शटरचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.१८ नोव्हेंबर रोजी ९ ते दि.१९ नोव्हेंबर रोजी २.३० वाजेच्या सुमारास तोडून आत प्रवेश करुन दुकानातील वेगवेगळ्या कंपनीचे टेक्नो एच.एम.डी. विवो, सॅमसंग झेड फोल्ड ६, वन प्लस १० आर, रेडमी कंपनीचे एआर बडस, रेडमी कंपनीचे स्मार्ट वॉच असे एकुण ६ लाख ८९ हजार ८६६ रूपये किंमतीचा माल चोरुन नेला. अशी तक्रारी मोहन बागडे यांनी दि.१९ नोव्हेंबर रोजी भुम पोलीस ठाणे दिली. त्यावरून गुन्हा नोंदवला होता.

गुन्हा तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांचे मार्गदर्शनाखाली कौशल्यपुर्ण तपास करुन तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पथकाने कांही मोबाईल फोनचे लोकेशन धाराशिव, भुम, मोहा, ढोकी, माळकरंजा असे वेगवेगळ्या ठिकाणी येत असल्याने पथकाने नमुद ठिकाणी जावून शोध घेतला.

मोबाईल सिमचा धरक यास त्याच्या ताब्यात असलेल्या मोबाईल फोन बाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, मागील चार दिवसापुर्वी भिमा काळे (रा. सांजा रोड धाराशिव) याच्याकडून पावती नंतर देतो अशा अटीवर ५ हजाराला विकत घेतला आहे असे सांगीतले.

त्यानंतर संशईत सिम ९३५६३६४३१९ चे लोकेशन भुम येथे येत असल्याने पथकाने नमुद ठिकाणी जावून तेथे एक महिला मिळून आली. तिस तिच्या ताब्यात असलेल्या मोबाईल बाबत विचारपुस केली असता तिने सांगितले की माझा मुलगा राजु अर्जुन काळे याने आणुन घरी ठेवला आहे, असे सांगितल्याने राजा अर्जुन काळे याचा शोध घेतला असता तो गोलेगाव (ता. भुम, जि.धाराशिव) येथे मिळून आला.



त्यास ताब्यात घेवून नमुद गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याने सांगितले की, मी व माझा साथीदार सुभाष श्रीरंग चव्हाण (रा. ढोकी ता.जि. धाराशिव) असे आम्ही दोघांनी मिळून भुम येथील मोबाईल शॉपी दुकानाचे शटर तोडून दुकानातील बरेच मोबाईल चोरी केले आहेत, असे सागिंतल्यावरुन पथकाने ढोकी येथे जावून सुभाष श्रीरंग चव्हाण यास ताब्यात घेवून नमुद गुन्ह्या संबंधाने विचारपुस केली असता राजा काळे याने सांगितले.

त्यावर पथकाने त्या दोघांनी काढून दिलेले मोबाईल हस्तगत केले.

नमूद चोरीतील २५ मोबाईल फोन असा एकुण ५ लाख ३५ हजार २०६ रूपये किंमतीचा माल हस्तगत करुन पुढील कारवाईस्तव नमूद दोघांना चोरीच्या मोबाईल फोनसह पुढील तपासासाठी भुम पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

# फिरत्या वस्तुसंग्रहालयाचा 'एकलव्य'च्या विद्यार्थ्यांनी घेतला आनंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय च्या म्युझियम ऑन व्हील्स या उपक्रमांतर्गत आज म्युझियम बसने दि.२८ नोव्हेंबर रोजी यमगरवाडी सेवा प्रकल्पातील एकलव्य विद्या संकुलास भेट दिली.

डॉ. शहापूरकर यांच्या खास आग्रहामुळे रोटरी क्लब उस्मानाबाद यांच्या माध्यमातून फिरत्या वस्तू संग्रहालयाची भेट पार पडली. मुंबई येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयास ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना भेट देणे शक्य नाही. ही अडचण ओळखून संग्रहालयाने बसवर म्युझियम मधील प्रदर्शनीय वस्तू ठेवून त्या वस्तू खेड्यापाड्यातील शाळांच्या



माध्यमातून विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करून दिली. संकुलाच्यावतीने वस्तू संग्रहालयाचे सर्व कर्मचाऱ्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी वस्तू संग्रहालयाचे चिन्मय वैशाली यांनी विद्यार्थ्यांना पुराण वस्तू ऐतिहासिक वारसा यांच्या विषयी सविस्तर मार्गदर्शन करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. यावेळी युरोपमध्ये कशाप्रकारे कागदाच्या अधिक प्रती छापल्या जात होत्या याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक ही सादर करण्यात आले.

सदरील उपक्रमाचा लाभ एकलव्य विद्या संकुलातील २७० विद्यार्थ्यांनी घेतला. याप्रसंगी मुख्याध्यापक म्हेत्रे व्ही.के., कोल्हटकर ए.आर. आणि सर्व कर्मचारी गण उपस्थित होते.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अभय शहापूरकर, रोटरीचे सुरज चव्हाण, संस्थेचे कार्यवाह विवेक आयाचीत यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी सर्व विद्यार्थी तसेच विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, अण्णासाहेब मगर, महादेव शेंडगे, अशोक बनकर, अनिल घुगे, हरीश मगदूम, दयानंद भडांगे, संतोष बनसोडे, निर्मलाताई हुगे, प्रणिता शेटकार, संगीता पाचंगे, फुलाजी ताटी कुंडलवार, मयूर अंतरेड्डी, यशवंत निंबाळकर, कोंडीबा देवकर, रमाकांत पवार, किरण चव्हाण, माऊली भुतेकर, सुजाता गणवीर, मुंबईचे चिन्मय वैशाली उपस्थित होते.

# मुख्यमंत्री निवडी आधीच लागले नळदुर्गमध्ये पालकमंत्रीपदी पदाचे होर्डिंग

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचीत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणुन निवड होण्यापुर्वीच नळदुर्ग शहरात त्यांची पालकमंत्री म्हणुन निवड झाल्याचे पोष्टर झळकत आहेत. माजी नगरसेवक संजय बताले यांच्याकडुन हे बॅनर लावण्यात आले आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सलग दुसऱ्यांदा तुळजापुर विधानसभा मतदार संघावर भाजपचा झेंडा फडकविला आहे. त्यामुळे भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये सध्या उत्साहाचे वातावरण आहे. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची राज्य मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणुन वर्णी लागण्याबरोबरच त्यांची धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणुन निवड व्हावी यासाठी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते सध्या देवाला साकडे घालत आहेत. तर काहीजणांना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची कॅबिनेट मंत्री म्हणुन निवड होण्याबरोबरच त्यांची धाराशिव जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड निश्चित असल्याचे वाटत आहे. त्यामुळे नळदुर्ग शहरात त्यांची पालकमंत्री म्हणुन नियुक्ती होण्यापुर्वीच त्यांच्या निवडीचे बॅनर लागले आहेत.

सध्या हे बॅनर सर्वांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदु झाले आहे. या बॅनरवरून भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची धाराशिव जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड निश्चित असल्याचे वाटत आहे हेच या बॅनरवरून लक्षात येते.

# मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे आज तुळजापूरात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा आरक्षणासाठी लढा सुरू करण्याच्या तयारीत आहेत. यासाठी त्यांनी पुन्हा एकदा संवाद दौऱ्याच्या माध्यमातून मराठा समाजाचे संघटन करण्यास सुरुवात केली आहे. १ डिसेंबर रोजी पाटील हे आंतरवली सराटी येथून तुळजापूर आणि पंढरपूरकडे देवदर्शनासाठी जाणार आहेत. या दौऱ्यात जरांगे पाटील हे धाराशिववरून जाणार आहेत.



धाराशिवच्या सकल मराठा समाजातर्फे धाराशिव शहरात जरांगे पाटील यांच्यासोबत बैठक घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. जरांगे पाटील यांनी वेळ दिला तर शहरात ही बैठक होऊ शकते. मनोज जरांगे आरक्षणासंबंधी कोणती भूमिका घेतात, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन पुढे ते पंढरपूरकडे जाणार आहेत. या दरम्यान ते धाराशिव किंवा तुळजापूर शहरात एखादी बैठक घेऊ शकतात.

### आणीबाणीच्या काळातही धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांच्या कामाला यश...

# लोकसभा व विधानसभा निवडणुकीतही शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाची सरशी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.३० नोव्हेंबर -**

भूमःशिवसेना फुटीच्या वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांच्या प्रयत्नातून धाराशिव जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये ऊर्जा निर्माण होऊन लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी यश आल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक केले जात आहे.

शिवसेना या पक्षाचे दोन गट तयार होऊन शिवसेना पक्षामध्ये फुट निर्माण झाली होती. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून सुनील काटमोरे यांची निवड केली होती. धाराशिव जिल्ह्यातील उमरगा लोहारा विधानसभा मतदारसंघातून ज्ञानराज चौगुले व भूम, परंडा, वाशी विधानसभा मतदारसंघातून मंत्री तानाजी सावंत यांनी बंडखोरी करून वेगळा गट तयार केला होता.

यावेळी यांना शह देण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्ष बांधणीसाठी निष्ठावंत शिवसैनिकांची फौज तयार करून धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांच्यावर जबाबदारी सोपवून दिली. यावेळी पक्षाच्या वेगवेगळ्या योजना संघटना वाढीसंबंधी मोर्चे बांधणी पदाधिकारी निवडी सामाजिक कार्य यावर भर देत होऊ द्या चर्चा गाव भेट दौरे भगवा सप्ताह यासह धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक गावात हा कार्यक्रम राबवून धाराशिव लोकसभा मतदार संघाचे विद्यमान खासदार ओम राजे निंबाळकर यांना साडेतीन लाखाच्या जवळपास लीड देण्याचे काम जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांनी केले.



तदनंतर विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी सुनील काटमोरे यांचे कौतुकही केले. त्यानंतर विधानसभाची मोर्चे बांधणी करण्यासाठी जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांनी पदाधिकारी बैठका गाव बैठका सर्कल बैठका मजबूत बूथ मतदार यादी वाचन यास कामे केली. यामुळेही धाराशिव जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे उमेदवार चारपैकी दोन ठिकाणी धाराशिव कळम विधानसभा मतदारसंघातून कैलास पाटील व उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघातून प्रवीण स्वामी मशाल चिन्हावर निवडून आणण्यासाठी जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांनी गनिमी काव्याने प्रयत्न करून निवडून आणले. तसेच महाविकास आघाडीचे भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राहुल मोटे यांना ही निवडून आणण्यासाठी गनिमी काव्याने काम केले.

परंतु अगदी थोड्या मताने मोठे यांचा पराभव झाला आहे.

# जयप्रकाश विद्यालयात शुभम जगताप यांचा सत्कार कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे विद्यालयाचे माजी विद्यार्थी शुभम हनुमंत जगताप यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

शुभम जगताप यांचे उठझ्क्र ( केंद्रीय राखीव पोलीस दल) यात नियुक्ती झाल्यामुळे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शुभम जगताप हे जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे बारावी पर्यंतचे शिक्षण घेऊन श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय रुईभर येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत त्यांनी बी.ए. पदवी पूर्ण केली म्हणजे एकाच शिक्षण संकुलात पहिली ते पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांनी शुभम जगताप यांच्या यशाबद्दल व पुढील कर्तव्य पार पाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक डोंगरे के.ए., शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# सर्व ग्रामपंचायत शासकीय कार्यालयामध्ये दिव्यांग दिन साजरा करावा; दिव्यांग उद्योग समूहाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० नोव्हेंबर -**

दिव्यांग उद्योगसमूह महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तानाजी घोडके यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालय परंडामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, ३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

या हा दिन सर्व ग्रामपंचायत शासकीय कार्यालय या ठिकाणी विविध कार्यक्रम घेऊन आयोजित करावे जेणेकरून दिव्यांग व्यक्तीच्या अधिकाराची व त्यांना त्यांच्या कायद्याची जनजागृती होईल आणि त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना सन्मानाची वागणूक मिळेल.

या निवेदनाच्या गांभीर्यपूर्वक विचार करून तात्काळ सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात यावे अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. ज्या कार्यालयात व ग्रामपंचायतमध्ये दिव्यांग दिन साजरा होणार नाही. अशा ठिकाणी दिव्यांग बांधवांच्या वतीने शोले स्टाईलने आंदोलन केले जाईल याची संबंधित अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना कळवावे अशी मागणी दिव्यांग उद्योग समूहाच्या वतीने करण्यात येत आहे.

निवेदनावर दिव्यांग उद्योग समूहाचे अध्यक्ष जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, शहराध्यक्ष गोरख देशमाने, तानाजी सांगडे, आदिवासी विकास तालुकाध्यक्ष सतीश पवार, अशोक भराडे, संतोष कुलकर्णी, वसुदेव मोटे, अर्शद काझी, मोहम्मद तुटके, हनुमंत राऊत, गणेश जाधव, दादा माने आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्री खंडोबा यात्रेनिमित्त मैलारपूर येथे १२ जानेवारीपासून रंगणार कुस्त्यांची दंगल

### खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून आखाड्याच्या दुरुस्तीची पाहणी...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० नोव्हेंबर -**

नळदुर्ग (मैलारपुर) येथील श्री खंडोबा यात्रेत याहीवर्षी श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या वतीने भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असुन त्याची जय्यत तयारी समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

सालाबादाप्रमाणे याहीवर्षी नळदुर्ग (मैलारपुर) येथील श्री खंडोबा यात्रेनिमित्त श्रीक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या वतीने भव्य अशा व लाखो रुपये बक्षिसांच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष रणजितसिंह ठाकुर व कार्याध्यक्ष बंडु पुदाले यांनी दिली आहे.

या आखाड्यामध्ये पहिली कुस्ती स्पर्धा जानेवारी २०१८ मध्ये श्री खंडोबा यात्रेनिमित्त घेण्यात आली तेंव्हापासुन दरवर्षी याठिकाणी कोरोनाचा कालावधी वगळता श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या वतीने भव्य अशा लाखो रुपये बक्षीसांच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी झालेल्या सर्व कुस्ती स्पर्धेमध्ये महाराष्ट्र केसरी विजेत्या पहेलवानांनी भाग घेतला आहे. अनेक नामवंत पहेलवानांच्या कुस्त्या या आखाड्यामध्ये झालेल्या आहेत. या कुस्ती स्पर्ध्येला प्रेक्षकांचा प्रचंड मोठा प्रतिसाद आजपर्यंत मिळाला आहे.

याहीवर्षी दि.१२, १३ आणि १४ जानेवारी रोजी संपन्न होणाऱ्या श्री खंडोबा यात्रेनिमित्त श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या वतीने भव्य



कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. यावर्षाची कुस्ती स्पर्धा दि.१४ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे या स्पर्धेची जय्यत तयारी आतापासुनच सुरु करण्यात आली आहे.

दि.३० नोव्हेंबर रोजी श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी मैलारपुर येथील कुस्ती आखाड्याची पाहणी करुन आखाड्याच्या दुरुस्ती तसेच साफसफाईच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष रणजितसिंह ठाकुर, सेवानिवृत्त परिवहन अधिकारी नंदकुमार डुकरे, कार्याध्यक्ष बंडु पुदाले, उपाध्यक्ष अनिल पुदाले, कार्याध्यक्ष संजय मोरे, दत्तात्रय कोरे, सुधाकर चव्हाण, रमेश जाधव, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, रमेश जाधव, सुहास येडगे, तानाजी जाधव, विलास येडगे, उत्तम बनजगोळे व अमर भाळे आदिजण उपस्थित होते.

# राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत श्रीपतराव भोसले हायस्कूलचा दबदबा कायम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० नोव्हेंबर -**

दि.२५ ते २९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान अलीगड, उत्तर प्रदेश या ठिकाणी संपन्न झालेल्या ४३ वी जूनियर गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या कुमार व मुली अशा दोन्ही संघांनी सुवर्णपदक प्राप्त केले.



या सुवर्णपदक विजेत्या संघामध्ये श्रीपतराव भोसले हायस्कूलचे खेळाडू भरतसिंग वसावे (कर्णधार), राज जाधव, जितेंद्र वसावे, सोत्या वळवी, विलास वळवी तर मुली गटात सुहानी धोत्रे (कर्णधार), अश्विनी शिंदे, तन्वी भोसले, प्रणाली काळे यांचा समावेश होता. देशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा वीर अभिमन्यू पुरस्कार जितेंद्र वसावे तर जानकी पुरस्कार कु सुहानी धोत्रे या खेळाडूंना मिळाला आहे. वरील सर्व सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंना राष्ट्रीय प्रशिक्षक प्रविण बागल, अभिजीत पाटील, प्रभाकर काळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या यशाबद्दल आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, महाराष्ट्र खो खो संघटनेचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव, आ.शि. प्रसारक मंडळाच्या सरचिटणीस प्रेमाताई पाटील, कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, प्राचार्य नन्नवरे सर्व पर्यवेक्षक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# मौलवीला पाच दिवसांची पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

दरसामध्ये अल्पवयीन बालकासोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या शिक्षकाला नांदेड येथील अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांनी पाच दिवस पोलीस कोठडीत पाठविले आहे.

दि.२७ नोव्हेंबर रोजी वजिराबाद पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीनुसार मदरसा जामियाँ इस्लामियाँ दारे अरकम हस्सापूर वाघी वळण रस्ता येथे वसतिगृहात राहणाऱ्या एका १० वर्षीय बालकासोबत त्याच शाळेत शिक्षक असलेल्या महम्मद शाहनवाज अब्दुल रकीब (२६) रा.बिहार याने लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार दाखल झाली होती. त्यानुसार वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास वजिराबादचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्याकडे आहे. वजिराबाद पोलिसांच्या पथकाने दि.२९ नोव्हेंबर रोजी बालकावर अत्याचार करणारा शिक्षक महम्मद शाहनवाज अब्दुल रकीबला अटक केली. आज पोलीस निरीक्षक कदम आणि त्यांच्या सहकार्यांनी शाहनवाजला न्यायालयात हजर करुन झालेल्या घटनेसंदर्भात तपासासाठी पोलीस कोठडीची आवश्यकता असल्याचे सांगितले. न्यायाधीशांनी पोलिसांची विनंती मान्य करत महम्मद शाहनवाजला पाच दिवस पोलीस कोठडीत पाठविले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### वाढत्या थंडीमुळे ग्रामीण भागात शेकोट्या पेटल्या

**आदमपूर**-आदमपूर ग्राम परिसरातील गावोगावी वाढत्या थंडीमुळे गल्लोगल्ली,रोडवर,राना शिवारातील जागलीवर शेकोट्या पेटल्या आहेत. नीचांकी तापमान घटल्याने गुलाबी थंडीचा जोर वाढल्याचे सद्यस्थितीत चित्र आहे. अंगात कडाक्याची हुडहुडी भरल्याने नागरिकांकडून उबदार कपड्यांची मागणीही गाव व तालुकास्तरावर वाढताना दिसून येत आहे.या थंडीमुळे मोठ्यांसह लहान मुलांमध्ये सर्दी,ताप,खोकला वाढल्याचेही दिसून येत आहे. सकाळी अगदी थंडगार वातावरण निर्मिती नित्य होत असल्याने नागरिकांनी शेकोट्यांचा आधार घेतलेला आहे.थंडीत आजारी वृध्द नागरिकांना हाडांचा त्रास, गुडघेदुखी आदिंचाही सामना करावा लागत आहे. शेकोटीभोवती मनोरंजन करीता राजकीय उलथापालथीची म्हणजे सरकार स्थापनेची फुकाची चर्चाही रंगताना दिसत आहे.आगामी सरकारची वैकासिक भाकिते नागरिक वर्तवित आहेत.



### व्हॉईस ऑफ मिडियाची लोकशाही पध्दतीने निवडणुक प्रक्रिया संपन्न

**हदगाव**-काही दिवसापूर्वी जिल्हा कार्यकारणीची निवडणुक व्हॉईस ऑफ मिडियाचे संस्थापक अध्यक्ष संदिप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही पध्दतीने संपन्न झाली. ज्या मध्ये प्रत्येक तालुक्यातील तालुकाध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिवांनी मतदान करून जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात महत्वाचा हातभार लावला. हिच प्रक्रिया प्रत्येक तालुक्यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच इतर पदाधिकारी नेमण्यासाठी लोकशाही पध्दतीने निवडणुक घेण्याचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी व कमिटीकडून घोषित करण्यात आले होते. त्यांचीच प्रक्रिया म्हणुन हदगाव तालुक्यातील व्हॉईस ऑफ मिडियाची निवडणुक प्रक्रिया लोकशाही प्रमाणे संपन्न होऊन हदगाव व्हॉइस ऑफ मिडियाच्या तालुकाध्यक्षपदी विशाल घोडेकर तर गजानन सुकापुरे यांची तालुका उपाध्यक्षपदी लोकशाही पध्दतीने निवड झाली. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन तुकाराम सावंत, सुनिल जोशी यांनी काम पाहिले. मतमोजणीनुसार अध्यक्षपदासाठी सर्वाधिक मते ही विशाल घोडेकर यांना मिळाली तर उपाध्यक्षपदासाठी गजानन सुकापुरे यांना मते मिळाली. त्यानुसार निवडणुक निर्णय अधिकारी यानी विशाल घोडेकर यांची व्हॉईस ऑफ मिडियाच्या तालुकाध्यक्षपदी तर गजानन सुकापुरे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. दोन्ही पदाधिकाऱ्यांचे निवडणुक निर्णय अधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांनी अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित जेष्ठ पत्रकार श्याम लाहोटी, कायदेविषयक सल्लागार ॲड. अविनाश कोंडमंगल, विशेष सल्लागार ॲड. अतुल चौरे, प्रा. गजानन गिरी, सदानंद सोनाळे, शेख अतिक, पंकज खंदारे, रवि चव्हाण, रामेश्वर गिरी, लक्ष्मीकांत कोठोळे, सचिन शिंदे, संदिप सोनूले उपस्थित इतर पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन केले.

### आ. बोंढारकर यांच्याकडून जाधव, टेंभुरवार आणि सोळंके कुटुंबीयांचे सांत्वन



**नांदेड**-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित शेतकरी पुत्र आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी वांगी येथील जाधव , वाजेगाव येथील टेंभुरवार आणि सोळंके कुटुंबियांचे भेट घेऊन सांत्वन केले. वांगी येथील संभाजी चांदोजी जाधव यांचे नुकतेच निधन झाले होते. संभाजी जाधव यांच्या पश्चात आ. बोंढारकर यांनी वांगी येथे जाऊन चांदोजी जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन जाधव कुटुंबियांचे सांत्वन केले. याचवेळी वाजेगाव येथील पांडुरंग टेंभुरवार यांच्या मातोश्री सुंदरबाई काशिनाथ यांचे दुखद निधन झाल्याची माहिती मिळाल्यानंतर आ. बोंढारकर यांनी वाजेगाव येथे जाऊन पांडुरंग टेंभुरवार यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. त्यांचे सांत्वन केले. सुभाष सोळंके यांचे वडील तुकाराम सोळंके यांचे नुकतेच निधन झाले होते. तुकाराम सोळंके यांच्या पश्चात आ. बोंढारकर यांनी सुभाष सोळंके यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. आम्ही आपल्या दुःखात सहभागी आहोत असा धीर देत ईश्वर दिवंगत तुकाराम सोळंके , संभाजी जाधव आणि श्रीमती सुंदर बाई टेंभूरवार यांच्या आत्म्यास शांती देवो अशी प्रार्थना केली. यावेळी केली. यावेळी उद्धव पाटील शिंदे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

### शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा : बालाजी मुंडे

**माहूर**-कृषि विभागामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत अनु. जाती व अनु. जमाती संवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरावर ३० नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा ! असे आवाहन तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे यांनी केले आहे. या मेळाव्यामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या ठिंबक व तुषार सिंचनाबाबत तालुकास्तरावर, मंडळस्तरावर व तसेच गावोगावी माहिती देण्यात येणार आहे. माहूर तालुक्यास अनु. जाती व अनु. जमाती संवर्गातील शेतकऱ्यांसाठी लक्षांक उपलब्ध असून लक्षांकापेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत. विशेष मोहीम करून अर्ज घेणे असून, अशी योजना वर्ष भर सुरू आहे.तरी माहूर तालुक्यातील अनु. जाती व अनु. जमातीच्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व अधिकच्या माहितीसाठी माहूर,तालुका कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक तालुका कृषि अधिकारी बालाजी मुंडे यांनी केले आहे.

# श्री दशमेश ज्योत शाळेत महाराजा रणजीतसिंघजी यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

नांदेड दि. २८ नोव्हेंबर : जवळपास चाळीस वर्षे एकछत्र साम्राज्य करीत परकीय आक्रमणाचा सामना करणारे शेर - ए - पंजाब महाराजा रणजीतसिंघजी हे प्रजेसाठी न्यायप्रिय चक्रवर्ती महाराजा होते असे प्रतिपादन गुरुद्वारा तख्त सचखंड हजुर साहिबचे मीत ग्रंथी सिंघ भाई गुरमीत सिंघजी यांनी गुरुवारी दशमेशज्योत इंग्लिश मिडियम शाळा व निष्काम सेवा प्रतिष्ठाण यांच्या संयुक्तरित्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून बोलतांना केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गुरुद्वाराचे मीत जत्थेदार संतबाबा ज्योतिंदरसिंघजी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून राजकमलसिंघ गाडीवाले, इंदरजीतसिंघ गडगज, दिलीपसिंघ रागी, जगजीवनसिंघ रिसालदार, हरबंससिंघ वासरीकर, खेमसिंघ पुजारी, प्राचार्य गुरबचनसिंघ सिलेदार, हुकूमसिंघ कराबीन, रविंदरसिंघ मोदी, कमलजीतकौर गाडीवाले, गुरप्रसादकौर, स. मानसिंघ, स. हरजीतसिंघ यांची उपस्थिती होती.

महाराजा रणजीतसिंघजी यांची जयंती साजरी करण्यामागे देशाला, समाजाला आणी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी असा उद्देश स्पष्ट करतांना भाई गुरमीतसिंघजी पुढे म्हणाले, वयाच्या दहा बाराव्या वर्षी राजा म्हणून पद संभाळणारे रणजीतसिंघ यांनी पुढे चक्रवर्ती (महाराजा) म्हणून ओळख कायम केली. त्यांनी बारा सैन्य समुहात एकता घडवून आणली. प्रजेसाठी निष्पक्ष सेवा केली.

संतबाबा ज्योतिंदरसिंघजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाराजा रणजीत सिंघजी यांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या ऐतहासिक प्रसंगाचा उल्लेख केला. राजकमलसिंघ गाडीवाले यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर केले आणी मागणी केली की महाराजा रणजीतसिंघजी यांच्या स्मरणार्थ नांदेड ते लाहौर पर्यंत यात्रेचे आयोजन करण्यात यावे. तसेच महाराजा रणजीतसिंघजी यांच्या नावाने हॉल किंवा इमारत तयार करावी. कार्यक्रमात निबंध स्पर्धेच्या विजेयतांना पारितोषिक वितरित करण्यात आली. कार्यक्रमानंतर लंगरप्रसाद कार्यक्रम झाले.

# रब्बी हंगामासाठी विष्णुपूरी धरणातून शेतकऱ्यांना मिळणार पाणी

## आमदार बोंढारकर यांचा पहिल्याच बैठकीतून शेतकरी हिताचा निर्णय




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

रब्बी हंगामासाठी विष्णुपुरी धरणातून पाणी पली सोडण्यात यावी यासाठी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित शेतकरी पुत्र आमदार आनंदराव बोंढारकर यांनी पाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांशी बैठक घेतली. यावेळी रब्बी हंगामासाठी तातडीने पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या. येत्या दोन दिवसात रब्बी हंगामासाठी पाणी सोडले जाईल अशी माहिती यावेळी पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी दिली आहे. आमदार म्हणून निवडून आल्यानंतर पहिल्याच बैठकीत शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचे काम शेतकरी पुत्र आमदार आनंदराव बोंढाराकर यांनी केले आहे. यावेळी कार्यकारी अभियंता गलधर, उपअभियंता संतोष नाईक, उप अभियंता शिवाजी नरमिटवार शाखा अभियंता उपस्थित होते

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील रब्बी हंगाम घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी विष्णुपुरी प्रकल्पातून पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडे विनंती केली होती. या अनुषंगाने आ. आनंदराव बोंढारकर यांनी आज शासकीय विश्रामगृह येथे पाटबंधारे विभागाच्या अभियंत्यांची आणि अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत पाणी पाळी सोडण्याचे अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली . कोणत्याही शेतकऱ्याला पाणी देण्यास पैसेसाठी अडवणूक करण्यात येऊ नये अशा सूचनाही यावेळी आ. आनंदराव बोंढारकर यांनी संबंधित विभागाचे अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. शेतकऱ्यांची हित लक्षात घेता महाराष्ट्र राज्य सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे .त्यामुळे अधिकाऱ्यांनी कोणत्याही बाबतीत शेतकऱ्यांची अडवणूक करू नये अन्यथा कुणाचीही गय केली जाणार नाही असा इशाराही आ. बोंढारकर यांनी यावेळी दिला. शिवाय रब्बी हंगामासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पाणी पाळ्या वेळेत सोडाव्यात अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये रब्बी हंगामासाठी पाणी पाळी सोडली जाईल अशी माहिती यावेळी पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंताने आयोजित बैठकीत दिली.दरम्यान आमदार म्हणून निवडून आल्यानंतर आनंदराव बोंढारकर यांची आजची पहिलीच बैठक शेतकरी हितासाठी पार पडली. शेतकरी पुत्र आमदार म्हणून आपल्या कार्याचा श्रीगणेशा शेतकऱ्यांच्या हिताच्या कामाने करता आला याबाबत आ. बोंढाराकर यांनी समधान व्यक्त केले.

# बंजारा समाजाचे नेते संजय राठोड यांना उपमुख्यमंत्री पद द्या : बंजारा समाजाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ३० नोव्हेंबर**



महाराष्ट्रातील समस्त बंजारा समाजाचे नेते तसेच दिग्रस विधानसभा मतदार संघाचे विध्यमान आमदार संजय राठोड यांना राज्याचे उपमुख्यमंत्री पद देण्यात यावे अशी मागणी नांदेड जिल्ह्यातील समस्त बंजारा समाजांनी केली आहे. विशेष म्हणजे, संजय राठोड हे बंजारा समाजाचे एकमेव नेतृत्व राज्यात असून यांना उपमुख्यमंत्री पद मिळावे, याकरिता समाज बांधव मंदिरात जाऊन देवाला साकडे घालणार आहे. संजय राठोड हे गेल्या तीस - वर्षांपासून सामाजिक तसेच शिवसेनेच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. गेल्या वीस वर्षांपासून ते दिग्रस विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करीत आहे. त्यांनी युती सरकारमध्ये कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद भूषविले आहे. महसूल, जलसंधारण, वन यासह अनेक खाती त्यांनी सांभाळली आहेत. संजय राठोड यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळविला आहे,आता ते मंत्रिपदाच्या शर्यतीत असून त्यांना उपमुख्यमंत्री पद देण्याची मागणी करण्यात येत आहे. बंजारा बंजारा समाजात त्यांना मानाचे स्थान असून राज्यभर त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. बंजारा समाजाची काशी समजल्या जाणाऱ्या पोहरादेवी येथे त्यांनी प्रयत्न करुन भव्यदिव्य बंजारा नंगारा भवन उभारले आहे. समाजातील वसंतराव नाईक तसेच सुधाकरराव नाईक यांनी यापूर्व महाराष्ट्रात मुख्यमंत्री पद भूषविले आहे. आता संजय राठोड यांना उपमुख्यमंत्री पद देण्याची मागणी समस्त गोर बंजारा बांधवांकडून केली जात आहे. विशाल पवार, बालाजी जाधव, सतीश चव्हाण कपिल चव्हाण, गणेश पवार, संजय राठोड, विजय राठोड, विनोद पवार, करण राठोड, संदीप चव्हाण, सचिन जाधव, अनिल राठोड, दिनेश राठोड सुभाष राठोड, रामराव चव्हाण यांच्यासह हजरो बांधवानी मागणी लावून धरली आहे.

# पळवून नेलेली अल्पवीन मुलगी सोलापूर येथून ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

हरातील कोनाळे कोचिंग क्लासेसमधून एका अल्पवयीन बालिकेला अल्पवयीन मुलानेच पळवून नेल्याची घटना घडली होती. या घटनेतील अल्पवयीन बालिकेला पोलिसांनी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस येथून ताब्यात घेतले.

शहरातील एक अल्पवयीन मुलगी दि.२२ ऑक्टोबर रोजी कोनाळे कोचिंग क्लासेसमध्ये शिकवणीसाठी गेली होती. परंतु क्लास सुटल्यानंतरही ती उशिरापर्यंत परत न आल्याने तिच्या घरच्या मंडळींनी नातेवाईकांकडे शोधाशोध केली. परंतु सापडून न आल्याने या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे, सुरज गुरव, सहायक पोलीस अधीक्षक किरीतीका यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप साखरे, पोलीस अंमलदार डोईफोडे यांनी शोध घेतला असता अल्पवयीन बालक व बालिका सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस येथे असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिसांनी सोलापूर येथे जावून दोघांनाही ताब्यात घेतले. या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु होती.

# 'मोटिवेशनल स्पीकर' नाटकाने समाजाला दिला सजगतेचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेत संकल्प प्रतिष्ठान, नांदेड निर्मित मोटिवेशनल स्पीकर हे दोन अंकी नाटक सादर झाले. लेखक आणि दिग्दर्शक श्री. संकल्प सूर्यवंशी यांनी या नाटकाच्या माध्यमातून एक आगळावेगळा विषय मांडला आहे. आजकाल मोठ्या प्रमाणावर मोटिवेशनल स्पीकर्सचा धंदा फोफावला आहे, परंतु अनेकदा ते सर्वसामान्य माणसांना भावनिक करून खोटी स्वप्ने दाखवतात, अशी स्थिती सादर केली आहे.

नाटकाने मोटिवेशनल स्पीकर्सच्या कॉर्पोरेट जगतातील काळ्या बाजूला उत्तम पद्धतीने उजागर केले आहे. आजच्या काळात मोटिवेशनल स्पीकर्स हे समाजसेवक न राहता व्यावसायिक म्हणून उदयास आले आहेत. या नाटकात दाखवले गेले आहे की, कसे काही स्पीकर्स फक्त पैशासाठी आणि प्रतिष्ठेसाठी समाजाच्या भावनांशी खेळतात. त्यांच्यामुळे सर्वसामान्य माणसांना आशा आणि स्वप्ने दाखवली जातात, मात्र त्या स्वप्नांना वास्तवात बदलणे कठीण होते.







नाटकातील कलाकारांनी आपल्या भूमिका अत्यंत प्रभावीपणे सादर केल्या आहेत. गणेश अशोक यादव यांनी सूत्रधाराची भूमिका सक्षमतेने केली, तर ज्ञानेश्वर भाऊराव गव्हाणे यांनी मॅनेजरच्या भूमिका साकारली. उषा प्रकाश पुजारी यांनी रचनाची भूमिका साकारली, ज्यात त्यांनी दर्शवलेल्या संघर्षाने नाटकात एक चांगली दिशा दिली. आदित्य मारुती कुंदेकरने बिझनेसमन म्हणून साकारलेले पात्र अत्यंत रंगबाज होते, तर पुष्पा दिलीप राऊत यांची सासुबाई आणि श्रावणी शंकर जठार यांची मुलगी यांच्या भूमिकांनी नाटकात अनेक रंग भरले. नाटकाचे आशय स्पष्ट करण्यासाठी आणि प्रेक्षकांपर्यंत त्याचा प्रभावी पोहोचवण्यासाठी सर्व कलाकारांनी आपली भूमिका समर्थपणे निभावली. यामध्ये दाखवले गेले की, मोटिवेशनल स्पीकर्सच्या भूमिकेत असलेले व्यक्तिमत्व आणि त्यांच्या धोरणांची पुन्हा एकदा पुनरावलोकन करण्याची आवश्यकता आहे.यामध्ये विशेष आभार व्यक्त केले गेले ते चार्ल्स रिबेलो यांचे, ज्यांच्या मदतीने नाटकाला एक वेगळा आकार मिळाला. नाटकाच्या प्रदर्शनामुळे प्रेक्षकांमध्ये मोटिवेशनल स्पीकर्सच्या वास्तविकतेबाबत चर्चा सुरु झाली आहे, आणि या नाटकाने एक गंभीर संदेश दिला आहे. प्रेक्षकांनी या नाटकाला प्रतिसाद दिला.

नाटकास रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला. ६ डिसेंबर पर्यंत होणारी ही प्राथमिक फेरीतील नाट्यस्पर्धा यशस्वी होण्यासाठी समन्वयक किरण चौधरी व त्यांची टीम परिश्रम घेत आहे.

# कुलगुरूंची शहरातील परीक्षा केंद्रांना अचानक भेटी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. मधील द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. २६ नोव्हेंबर पासून चालू झालेल्या आहेत. दि. २६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी काही परीक्षा केंद्रावर अचानक भेटी दिल्या आणि तेथील सोयी-सुविधेबद्दल नाराजी व्यक्त केली. व त्याबरोबरच उपस्थित कर्मचाऱ्यांना तुमच्या महाविद्यालयाचे संलग्निकरण का रद्द करण्यात येऊ नये? अशी तंबी दिली.

दि. २६ नोव्हेंबर पासून विद्यापीठाशी संलग्नित सर्वच महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा चालू आहेत. यातील काही महाविद्यालयातील परीक्षा केंद्रांना मा. कुलगुरू महोदयांनी भेट दिली. तेव्हा त्यांना अनियमितता आणि सोयी-सुविधांचा अभाव आढळला. यावर त्यांनी अतिशय नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार परीक्षा केंद्र घेणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे असे आहे. परंतु कुलगुरू महोदयांच्या भेटीदरम्यान याबाबत अनियमितता दिसून आली.

यापुढे कोणत्याही संलग्नित महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावर अनियमितता अथवा विद्यार्थ्यांची गैरसोय आढळून आल्यास अशा महाविद्यालयावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी दिला.

# ३४ बौद्ध उपासक उपासिका श्रीलंका दौऱ्यावर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

शहर व परिसरातील ३४ बौद्ध उपासक उपासिका बौद्ध राष्ट्र श्रीलंका येथे रवाना झाले आहेत. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने श्रीलंका येथे धम्म पर्यटनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने दरवर्षी विविध बौद्ध राष्ट्रांना भेटी दिल्या जातात. केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष भदंत पंयाबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीलंका येथील ऐतिहासिक पर्यटन स्थळे, तेथील लोकजीवन आणि धम्मसंस्कृती यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी ३४ बौद्ध उपासक उपासिकांचा जत्था येथून श्रीलंकेकडे रवाना झाला. यावेळी अनुरत्न वाघमारे, ॲड. सांगवीकर, इंजि. प्रशांत इंगोले, एस.एच.हिंगोले, विनायक लोणे, उप प्राचार्य साहेबराव इंगोले, प्रज्ञाधर ढवळे यांची उपस्थिती होती.

ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित या धम्मसहलीत भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह बाबुराव वाघमारे, सुनंदा वाघमारे, कविता हिंगोले, जिजाबाई केळकर, किशन कांबळे, विमलबाई कांबळे, रत्नप्रभा जाधव, श्रीराम जाधव, सतीश हटकर, कविता हटकर, शांता सोनसळे, सुधाकर सोनसळे, शोभा हटकर, अशोक हटकर, उत्तम शिवभगत, चंद्रकला शिवभगत, मारोतराव उबारे, वंदना उबारे, चंद्रप्रकाश हनमंतकर, पुंडलिक कसबे, सरोजा कसबे, द्रौपदी कांबळे, रेखा सावते, रोहिदास सोनवणे, सुरेखा सोनवणे, लक्ष्मण डुमणे, रंजना डुमणे, राजू वाघमारे, जीवक वाघमारे, छाया सुर्यवंशी, अशोक कांबळे, कल्पना कांबळे, श्रुती जवळगेकर यांचा समावेश आहे.

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल


## मसाप बालकुमार साहित्य समितीच्या सदस्यपदी रामदास केदार, रसूल पठाण

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ३० नोव्हेंबर-**

वेगवेगळ्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रात कार्यरत असलेले रामदास केदार व रसूल पठाण यांच्या कार्याची दखल घेत छ. संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्या बालकुमार साहित्य उपक्रम समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. तसे पत्र अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी दिले आहे.

रामदास केदार तालुक्यातील वाढवणा बु येथील शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयात तर रसूल पठाण हे एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत आहेत. बाल साहित्यात दोघांचेही विशेष योगदान असून अनेक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. या निवडीबद्दल ना. संजय बनसोडे, मसाप केंद्रीय कार्यकारिणीचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील, उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, प्राचार्य प्रमोद चौधरी, चंदन




नागरगोजे पाटील, विलास सिंदगीकर, जळकोट मसाप चे अध्यक्ष एम. जी. मोमीन, प्रा. महादेव स्वामी, प्रा. चंद्रशेखर मलकमपट्टे, धनंजय गुडसूरकर, अनिता यलमटे, प्रा. बिभीषण मद्देवाड, प्रा. चंद्रशेखर कळसे, लक्ष्मण बेंबडे, सिद्धार्थ सुर्यवंशी, अंबादास केदार, निता मोरे, ॲड. महेश मळगे आदींनी अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### आ. रमेश कराड यांचा दसरा महोत्सव टीमच्या वतीने सत्कार

**लातूर, दि. ३० नोव्हेंबर-**

लातूर ग्रामीणचे आ. रमेश कराड यांचे लातूर ग्रामीण मतदार संघातून विजयी झाल्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा विविध संघटना कडून वर्षाव करण्यात येत आहे. सामुदायिक दसरा टीमच्या वतीनेही, त्यांचा लातूर येथील संवाद कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी ईश्वर बाहेती, प्रदीप पाटील खंडापूरकर, विष्णू भुतडा, व्यंकटेश हालिंगे, रघुनंदन भुतडा यांची उपस्थिती होती.



### चाकूर येथील पीएम विद्यालयात आजी-आजोबा दिवस साजरा

**चाकूर, दि. ३० नोव्हेंबर-**

चाकूर शहरातील पीएम श्री केन्द्रीय विद्यालय येथे आजी आजोबा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे आजी आजोबा उपस्थित होते. आजी आजोबा दिवस प्राथमिक विभागामार्फत आयोजीत करण्यात आले होते. यात बालवाटिका -३ ते इयत्ता ५ वी पर्यंतच्या मुलांना यांच्या आजी -आजोबांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती देवीचे पूजन करुन करण्यात आली.तसेच विद्यालय मार्फत विविध संस्कृतीक संगीत, नृत्य,भाषण व नाटकाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मनीषा कटारिया उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोविंद सूर्यवंशी यांनी आपल्या अभिभाषणात आजच्या समाजातील कुटुंब पद्धती, आजी -आजोबा यांचे स्थान व त्यांचे महत्त्व पटवून दिले. सूत्रसंचालन राजेश्वरी इंगले व राजेंद्र अंधारे यांनी केले. कार्यक्रमास आजी-आजोबा प्रमुख म्हणून मधुकर नरहरे व पुष्पा गौताळकर यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमात आजी -आजोबासाठी वेगवेगळे खेळ व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय प्राप्त आजी-आजोबांना विद्यालयाच्या वतीने बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्राथमिक शिक्षक गौतम अवसरमोल, कुशाल सिंघ हजारी, दीपा शरणार्थ, देशमुख हनमंत,शेख रियाज, गजानन माने, अशोक बड़े, शिवाजी रामपुरकर, सचिन गित्ते, कुलकुले खुदबोद्दीन, हीना शेख, राजेश्वरी जाधव आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.



### मुख्याध्यापक गणपत राठोड यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**देवणी, दि. ३० नोव्हेंबर-**

तालुक्यातील बोरोळ येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक गणपत रामा राठोड नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. शुक्रवारी सेवानिवृत्तनिमित्त त्यांचा शाळेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक गणपत रामा राठोड हे बोरोळ येथील जिल्हा परिषद शाळेत १५ वर्ष ४ महिने सेवा केली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सत्यदेव गरड तर गटशिक्षण अधिकारी संजय शिंदाळकर, माजी पंचायत समिती सभापती अरूणा भोसले, सत्यवान कांबळे,आदर्श शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष शिवाजी साखरे, केंद्रप्रमुख सदाशिव साबणे, छात्र शिक्षक कृती समितीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष अंगद भोसले ग्रामविकास अधिकारी आनंदा कुटे तानाजी बालुरे, सरपंच कृष्णा पाटील, उसरपंच प्रमोद पाटील, देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक माधव बालुरे, माजी उपसरपंच दिपक पाटील उपस्थित होते.

### रब्बी हंगामातही १ रुपयात पीक विमा योजना राबविण्यात येणार

**वलांडी, दि. ३० नोव्हेंबर-**

खरीप हंगामाप्रमाणे राज्यात रब्बी हंगामातही १ रुपयात पीक विमा योजना राबवण्यात येणार असल्याची माहिती माहिती देवणी तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे व पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी रामदास पुंडे यांनी दिली आहे. रब्बी पीक विमा योजना मध्ये रब्बी हंगामातील हरभरा, गहू पिकाचा पिक विमा १५ डिसेंबर पर्यंत तर रब्बी ज्वारीच्या पिक विमा ३० नोव्हेंबर पर्यंत भरून घेण्यात येणार आहे. रब्बी ज्वारी, गहू, हरभरा या पिकांचा समावेश करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. सदर योजनेअंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रब्बीचा विमा भरून घेण्यात यावा असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. यासाठी पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी सात बारा उतारा आणि होल्डिंग, आधार, बँक खाते पासबूक, पीक पेरा स्वयंघोषणा पत्र सदरील पिक विमा ऑनलाईन पद्धतीने भरून घेण्यात येणार असून कुठल्याही सेतु सुविधा केंद्रातून भरून घेण्यात येत आहे तरी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मनपाची प्लास्टिक जप्ती मोहीम

**तीन दिवसात ७८ किलो कॅरीबॅगची जप्ती**

**७१ हजारांचा दंड**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० नोव्हेंबर-**

केंद्र शासनाच्या वतीने प्रतिबंधित करण्यात आलेल्या कॅरीबॅग जप्त करण्याची मोहीम मनपाच्या वतीने मागील तीन दिवसांपासून राबविण्यात येत आहे. या तीन दिवसात ७८ किलो कॅरीबॅग जप्त करून संबंधितांकडून ७१ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने प्लास्टिक कचरा व्यवस्थापन सुधारणा अधिसूचना २०२१ मध्ये जारी केली आहे. त्यानुसार १२० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक वापरावर बंदी घालण्यात आली आहे.असे प्लास्टिक वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले तर दंड करण्याची तरतूदही त्यात आहे.



शहरात १२० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरीबॅग वापरल्या जात असल्याचे लक्षात आल्याने मनपाने प्लास्टिक जप्ती मोहीम सुरू केली आहे.स्वच्छता विभागाच्या वतीने ही मोहीम राबविण्यात येत आहे.आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेल्या आदेशान्वयेमंगळवार दि. २६ नोव्हेंबर पासून ही मोहीम सुरू आहे. मंगळवारी शहरातील चारही झोन मधून ३७ किलो ५०० ग्रॅम कॅरीबॅग जप्त करण्यात आल्या. संबंधितांना कॅरीबॅग जप्त केल्यानंतर २७ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. बुधवार दि.२७ रोजी या मोहिमेंतर्गत २१ किलो कॅरीबॅग जप्त करण्यात आल्या. संबंधितांकडून २४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. गुरुवारी २० किलो कॅरीबॅग जप्त करत २० हजार ९०० रुपये दंड घेण्यात आला. मनपाने प्लास्टिक कॅरीबॅग जप्तीची मोहीम अशीच चालू ठेवणार असल्याचे कळविले आहे. संबंधितांनी प्लास्टिक कॅरीबॅग ऐवजी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा.

आपल्याकडील कॅरीबॅग मनपाकडे जमा करून सहकार्य करावे, होणारी कारवाई टाळावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांनी केले आहे.

## नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० नोव्हेंबर-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय ( नाट्यशास्त्र विभाग ) लातूरच्या वतीने लातूर शहरात लातुरात नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नाट्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर व प्रमुख कार्यवाह धनंजय बेबडे यांनी दिली. या स्पर्धेत मुंबई, हैदराबादसह राज्याच्या विविध भागातील कलाकार आपले कलाविष्कार सादर करणार आहेत. या स्पर्धा दयानंद सभागृहात पार पडणार आहेत.

या स्पर्धेचा उदघाटन सोहळा रविवार, दि. १ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता अ . भा. नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबईचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्या शुभ हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बालरंगभूमी, मुंबईच्या उपाध्यक्षा सौ. दीपाताई क्षीरसागर, लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, माउली ग्रुपचे चेअरमन सीए व्ही. पी. पाटील, पोलाद स्टील जालना चे अध्यक्ष जयेश कांतीलाल मेहता यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत हैद्राबाद, मुंबई, छत्रपती संभाजीनगर,अहमदनगर सह राज्याच्या विविध भागातील कलावंत आपले कलाविष्कार सादर करणार आहेत. या स्पर्धेचे मुख्य आकर्षण १९७१ साली नटवर्य श्रीराम गोजमगुंडे यांच्या रसबहार नाट्यसंस्था निर्मित व दिग्दर्शित आणि अभिनित ' पुन्हा.. पुन्हा मोहोजोंदारो.. ' हे दोन अंकी नाटक उद्घाटना दिवशी सायंकाळी सादर होणार आहे. या नाटकाने त्यावेळी राज्य स्तरीय उत्कृष्ट नाटकाचा राज्य नाट्य पुरस्कारही पटकावला होता. आता तेच नाटक श्रीराम गोजमगुंडे यांचे सुपुत्र अविष्कार गोजमगुंडे आपल्या सहकाऱ्यांसह नाट्य रसिक प्रेक्षकांसमोर सादर करणार आहेत.

या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या निमित्ताने लातूरच्या नाट्य रसिकांना दर्जेदार नाट्याभिनयाचा आस्वाद घेण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. नाट्य रसिकांनी या एकांकिका स्पर्धेचा अवश्य लाभ घ्यावा,असे आवाहन स्पर्धेचे निमंत्रक विक्रांत गोजमगुंडे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर ( बाबा ), प्रमुख कार्यवाह धनंजय बेंबडे, उपाध्यक्ष अजय गोजमगुंडे, कोषाध्यक्ष अमोल नानजकर , संघटक उमाकांत हुरदुडे, अविष्कार गोजमगुंडे, अनिल कांबळे, कल्याण वाघमारे, डॉ.अशोक आरदवाड, बाळकृष्ण धायगुडे, प्रदीप भोकरे, संजय अयाचित, अपर्णा गोवंडे, सुरेखा मदने, डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. मुकुंद भिसे, श्रुतिकांत ठाकूर, दीपरत्न निलंगेकर, ॲड. राणीताई स्वामी, सुधन्वा पत्की आदी मान्यवरांनी केले आहे.

## कार्यकर्त्याने पण केला... उमेदवाराने पूर्ण केला

**चप्पल सोडलेल्या कार्यकर्त्याला नेत्यांनी घातली चप्पल**

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ३० नोव्हेंबर-**

कार्यकर्ता आणि नेता यांचे एक वेगळचं नातं असतं. तेवढ्या विश्वासाचं आणि प्रेमाचं हे नातं असतं. या प्रेमापोटी कार्यकर्ते काही करण्यास तयार असतात. अशा कार्यकर्त्यांची नेतेही खास काळजी घेतात. एक असा कार्यकर्ता आहे ज्याने आपला नेता जोपर्यंत विधानसभेवर निवडून जात नाही तोपर्यंत पायात चप्पल घालणार नाही असा पण केला होता. तो पण पूर्ण होण्यासाठी त्याला आणखीन वाट पाहावी लागली. जेव्हा त्याची माहिती नेत्याला समजली तेव्हा नेत्यानेही मोठ्या मनाने या कार्यकर्त्याची भेट घेतली. त्याला स्वत:च्या हाताने चप्पल ही घातली. ही घटना घडली आहे लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यात.

औंदुबर पांचाळ होनाळीकर हे लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील होनाळी गावचे माजी सरपंच तथा विद्यमान उपसरपंच आहेत. तो राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस उमेदवार अभय साळुंके यांचे ते कार्यकर्ता आहेत. अभय साळुंके यांच्यासाठी त्याने सुरूवातीपासूनच जीवाचे रान केले आहे. याच निलंगा मतदारसंघातून साळुंके यांचा पराभव झाला. याच औदुंबर पांचाळ होनाळीकर यांने शपथ घेतली होती. मतदारसंघातून जोपर्यंत अभय साळुंके हे आमदार होत नाही तोपर्यंत पायात चप्पल घालणार नाही. ही शपथ घेतली होती.

ही शपथ पूर्ण होण्यासाठी त्याला आणखीन वाट पहावी लागली. अभय साळुंके हे राजकारणात सक्रीय आहेतच. त्यांना निलंगा मतदार संघातून उमेदवारीही मिळाली होती. पण जिंकण्यासाठी त्यांच्या समोर तगडे आव्हान होते. स्वकियां बरोबरच मित्र ही विरोधात उभे ठाकले होते. शिवाय विरोधकांचे आव्हान तर होतेच. अशा वेळी विजय मिळविणे थोडा अवघड झाले. पण त्यांनी तगडी झुंज दिली. मेहनत घेतली. शेवटी निलंगा मतदार संघातून त्यांनी ९८ हजार एवढे मोठे मते मिळविले.

हा कार्यक्रम दि.२६ नोव्हेंबर रोजी संगमेश्वर मंगल कार्यालय देवणी उदगीर रोड येथे संपन्न झाला. यावेळी देवणी तालुक्याचे आधारस्तंभ श्री मल्लिकार्जुन मानकरी सावकार, ज्येष्ठ नेते काँग्रेस देवणी, दिलीप पाटील नागराळकर संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लातूर, ॲड.अजित बेळकोणे विळेगावकर तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी देवणी, जावेद तांबोळी शहराध्यक्ष, अजित माने,



पंकज शेळके, कुशावर्ता बेळे, बालाजी कारभारी, अमर मुर्के, मुकेश सुडे, शरण लुल्ले, बालाजी वळसांगवीकर, वैजनाथ लुल्ले सावकार, रामभाऊ भंडारे, संजय घोरपडे, योगेश ढगे उपस्थित होते.

## उदगीरमध्ये पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ३० नोव्हेंबर-**

मराठी परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त मराठी पत्रकार परिषद मुंबई व इंडियन मेडीकल असोसिएशन उदगीरच्यावतीने मंगळवारी (ता.३) सकाळी ९ ते १२ वाजे पर्यत मातृभूमी महाविद्यालय, देगलूर रोड उदगीर येथे पत्रकार व त्यांच्या कुटुंबियासाठी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

पत्रकारांचं आयुष्य दगदगीचं असतं. जागरण, अवेळी जेवण, तणाव या सर्वांचा पत्रकारांच्या प्रकृतीवर परिणाम होत असतो.मात्र हे दुखणे अनेकदा अंगावर काढले जाते.. विषय हाताबाहेर जातो तेव्हा वेळ निघून गेलेली असते.. अशी वेळ कोणत्याच पत्रकारावर येऊ नये यासाठी अखिल भारतीय मराठी परिषदेचा वर्धापन दिन राज्यभरात ३ डिसेंबर रोजीपत्रकार आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. या शिबीरात प्रकारच्या तपासण्या करण्यात येणार आहे. शिबीरात रुग्णांची तपासणीकरण्यासाठी बालरोगतज्ञ डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. महेश जाधव, जनरल फिजीशियन डॉ. संगमेश्वर दाचावार, सर्जन माधव चंबुले , हृदय रोग तज्ञ डॉ. प्रशांत चोले जनरल फिजीशन डॉ.अनुप चिकमुर्गे, स्त्रीरोगतज्ञ डॉ. स्वाती पाटील, डॉ. सोनल मोरे, सर्जन डॉ. संजय चिल्लरगे, अस्थिरोगतज्ञ डॉ.अजय महिंद्रकर, नेत्रतज्ञ डॉ. ज्योती सोमवंशी, मधुमेहतज्ञ डॉ. प्रशांत नवटक्के इत्यादी तज्ञ डॉक्टरची टिम तपासणी करणार आहे. तालुक्यातील पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांनी शिबीराचा लाभ घ्यावा. असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेट्टे, इंडियन मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पाटील, सचिव डॉ. महेश जाधव, उदगीर जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष श्रीनिवास सोनी, सचिव सुनिल हवा, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. बिभीषन मद्देवाड, सचिव सिद्धार्थ सुर्यवंशी, प्रेस मिडीया असोसिएशनचे अध्यक्ष प्रभुदास गायकवाड, सचिव बसवेश्वर डावळे यांच्यासह सर्व पत्रकाराच्यावतीने करण्यात आले आहे.

## लातूरमधील दोन पीडितांची सुटका

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० नोव्हेंबर-**

शहरातील बार्शी रोड परिसरामध्ये एक महिला बाहेरून स्त्रियांना बोलावून डायमंड स्पाच्या नावाखाली त्यांच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत होती. ही बाब खरी असल्याचे निदर्शनास येताच २७ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक बबीता वाकडकर यांच्या नेतृत्वात एएचटीयु पथकाने बनावट ग्राहक पाठवून घटनेची माहिती पडताळली ती खरी असल्याचे निदर्शनास आली. त्यानंतर डायमंड स्पा वर छापा मारला त्याठिकाणी देहविक्री करीत असताना दोन पिडीत महिला वेश्या व्यवसाय करून घेणारी एक महिला आढळून आले. पीडीत महिलांकडून देहविक्रय व्यवसाय करून घेणारे, स्वतःच्या फायद्यासाठी बाहेर गावाच्या महिलांना स्वतःचे स्पा मध्ये ठेवून त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून स्पा च्या नावाखाली वेश्या व्यवसाय करून घेतात व आम्हाला काही रक्कम देऊन आमची राहण्याची खाण्यापिण्याची व्यवस्था करतात असे पीडित महिलांनी सांगितले.

याबाबत पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . कुंटणखाना चालवणाऱ्या महिलेला अटक करण्यात आली आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक बबिता वाकडकर, पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, सुभाष सूर्यवंशी, पोह. सदानंद योगी, प्रकाश जाधव, महिला पोह. सुधामती यादव आणि निहाल मनियार यांनी सहभाग घेतला. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे करीत आहेत.

## लातूर ग्रामीणची भाजपाचा बालेकिल्ला अशीच ओळख निर्माण व्हावी

**पोहरेगाव जि.प. सर्कलच्या कार्यक्रमात आ. रमेश कराड यांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० नोव्हेंबर-**

विधानसभेची निवडणूक जिंकली एवढ्यावरच न थांबता येणाऱ्या काळात होणाऱ्या ग्रामपंचायत सोसायटीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका आपल्याला जिंकायच्या आहेत आणि लातूर ग्रामीण मतदारसंघाची भाजपाचा बालेकिल्ला म्हणून ओळख निर्माण करायची आहे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आजपासूनच कामाला लागावे, अशी सूचना आमदार रमेश कराड यांनी दिल्या.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेश कराड यांचा घवघवीत यश संपादन केल्यानंतर लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपासह महायुती कार्यकर्त्यांच्या वतीने जाहीर सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, शिवसेनेचे युवा जिल्हाध्यक्ष कुलदीप सूर्यवंशी, अध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक ज्ञानोबा भिसे, माजी तालुकाध्यक्ष रामराव मोरे, विठ्ठल कस्पटे, श्रीकृष्ण पवार, सुभाष वाघ, संगमेश्वर स्वामी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून काम केले. केलेल्या प्रयत्नाला यश आले. याबद्दल सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करून यावेळी बोलताना आ. रमेश कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघातून देशमुख पराभूत होतील असे




कोणालाच वाटत नव्हते. मात्र ही लढाई आपण जिंकणार याचा मला आत्मविश्वास होता. कार्यकर्त्याच्या मेहनतीमुळेच हे शक्य झाले. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होती देशमुख यांनी अनेकांना विकत घेण्याचा प्रयत्न केला. माझा गरीब कार्यकर्ताच काय तर सामान्य मतदारही विकला गेला नाही. सत्ता आणि पैशाच्या मागे जनता जात नाही. विकास कामामागे जनता असते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. काँग्रेस पुढार्याच्या अनेक गावात सामान्य कार्यकर्त्यांनी भाजपाला मताची आघाडी मिळवून दिली याचा मला अभिमान आहे. विधान परिषदेचा आमदार या नात्याने काम करत असताना मतदारसंघात शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आणि गावातील विकास कामांना गती दिली आपण केलेल्या कामामुळेच गावा गावात कार्यकर्त्यांच्या शब्दाला मतदारांनी मान दिला आणि भाजपाच्या पाठीशी राहून भरभरून मतदानरुपी आशीर्वाद दिले. आता विधानसभा आमदारकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचं सोनं करून दाखवू असे सांगून आ. रमेश कराड म्हणाले की, मतदार संघात गेल्या पंधरा वर्षातील विकासाचा मोठा बॅकलॉग भरून काढायचा आहे यासाठी विकासाचा आराखडा तयार करून विविध कामांना निश्चितपणे मंजुरी मिळून घेऊ. कार्यकर्त्यांनीही सर्व समाज घटकांना सोबत घेऊन गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत कोणाचीही अनुरूप होणार नाही याची काळजी घ्यावी पर्यायाने आपल्या गावचा तालुक्याचा आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधू असेही त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून भविष्यातील कार्याला शुभेच्छा दिल्या.